सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

# कार्यक्रम अंदाजपत्रक

# २०२३-२०२४

## पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग

मध्यवर्ती कारागृह मुद्रणालय, नागपूर

२०२३

# कार्यक्रम अंदाजपत्रक

**२०२३-२०२४**

**पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग**

(एच-१०६२)-१-अ

# पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग

## अनुक्रमणिका


| प्रकरण | | | | | | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|---|---|---|---|
| १. प्रस्तावना | ... | ... | ... | ... | | १ |
| २. समग्र कार्यक्रम | ... | ... | ... | ... | | २ |
| ३. कार्यक्रम– | | | | | | |
| (१) पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग (आस्थापना) | ... | ... | ... | ... | | ८ |
| (२) जल जीवन मिशन | ... | ... | ... | ... | | ११ |
| (३) ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रम | ... | ... | ... | ... | | १५ |
| (४) स्वच्छ भारत अभियान (ग्रामीण) | ... | ... | ... | ... | | ३२ |
| (५) नागरी पाणी पुरवठा, मलनिःसारण व स्वच्छता कार्यक्रम | | ... | ... | ... | | ३६ |
| (६) भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा | ... | ... | ... | ... | | ५२ |

## प्रस्तावना–

राज्यात सर्व शहरांना व गावांना स्वच्छ पिण्याचे पाणी पुरवठ्याचा कार्यक्रम परिणामकारकरित्या राबविण्यासाठी शासन अधिसूचना, सामान्य प्रशासन विभाग, क्र. शाकानि-१०९५/सीआर-२८९/१८ (रवका), दिनांक ९ नोव्हेंबर, १९९५ अन्वये "पाणी पुरवठा व स्वच्छता" या स्वतंत्र विभागाची निर्मिती करण्यात आलेली आहे. सन १९९७-९८ या आर्थिक वर्षापासून या विभागाचे स्वतंत्र कार्यक्रम अंदाजपत्रक प्रकाशित करण्यात येत आहे.

२. पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाचे सन २०२३-२०२४ चे कार्यक्रम अंदाजपत्रकामध्ये खालील पाच प्रकरणांचा समावेश केला आहे.

(१) पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग (आस्थापना),

(२) ग्रामीण पाणी पुरवठा,

(३) ग्रामीण स्वच्छता,

(४) नागरी पाणी पुरवठा, मलनिःसारण व स्वच्छता कार्यक्रम;

(५) भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा.

३. कार्यक्रम अंदाजपत्रक म्हणजे मूल्यमापन अहवाल नव्हे. तरी पण, पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाकडून कार्यान्वित करण्यात येणाऱ्या कार्यक्रमाचे स्वरूप लक्षात घेऊन उपलब्ध असलेल्या माहितीच्या आधारे सर्व कार्यक्रमांची अद्ययावत माहिती प्रकाशनात देण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

# समग्र कार्यक्रम

**१. पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग :-**

संपूर्ण महाराष्ट्र स्वच्छ बनविण्यासाठी "घरात शौचालय दारात पाणी" हे उद्दिष्ट साध्य करण्याचा निर्धार शासनाने केलेला आहे. स्थानिक स्वराज्य संस्थामार्फत लोकसहभागातून गुणवत्तापूर्ण सेवा उपलब्ध करून देवून किफायतशीर खर्चात आणि पर्यावरणात्मकदृष्ट्या शाश्वत पद्धतीने ग्रामीण व नागरी भागातील रहिवाश्यांना सुरक्षित पिण्याचे पाणी व स्वच्छता सेवा पुरविणे आणि पाण्याच्या पुनर्भरण उपाययोजनांवर भर देण्यात आलेला आहे.

१.१ पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाच्या नियंत्रणाखाली महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा व राज्य पाणी व स्वच्छता मिशन ही क्षेत्रीय कार्यालये कार्यरत आहेत. मा. प्रधान सचिव विभागाचे प्रमुख आहेत. त्यांचे मदतीस एक मुख्य अभियंता तथा विशेष कार्य अधिकारी, दोन सह सचिव व दोन उपसचिव तसेच अवर सचिव आणि कक्ष अधिकारी असे वर्ग-१ व वर्ग-२ चे राजपत्रित अधिकारी व अन्य कर्मचारी आहेत.

१.२ पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाची कार्ये स्थूलमानाने पुढीलप्रमाणे आहेत–

(१) पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग (खुद्द) ची आस्थापना, विभागाच्या नियंत्रणाखालील भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणेची व जिल्हा परिषदांच्या पाणी पुरवठा विभागाची आस्थापना.

(२) पिण्याच्या पाण्याचा पुरवठा व स्वच्छता कार्यक्रमांबाबत धोरण ठरविणे, तसेच पाणी पुरवठा व स्वच्छता कार्यक्रमाची अंमलबजावणी.

(३) महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या वैधानिक, घटनात्मक, धोरणविषयक आणि आस्थापना संबंधीच्या प्रकरणांबाबत कार्यवाही करणे; आणि

(४) पाणी पुरवठा व स्वच्छता कार्यक्रम राबविण्यासंबंधात महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, जिल्हा परिषदा आणि भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा यांच्या कामाचे समन्वयन व संनियंत्रण करणे.

**२. महाराष्ट्र जीवन प्राधिकरण :–**

राज्यातील पाणी पुरवठा कार्यक्रमाचे योजनाबद्ध रीतीने नियोजन, जलद विकास व उचित संनियंत्रण करण्याच्या दृष्टीने औपचारिकरित्या सन १९७६ मध्ये अधिनियमान्वये महाराष्ट्र पाणी पुरवठा व जलनिःसारण मंडळाची स्थापना करण्यात आली. राज्यातील पाणी पुरवठा व मलनिःसारण क्षेत्रातील योजनांसंदर्भात संकल्पनेपासून प्रत्यक्ष अंमलबजावणीपर्यंत तसेच आर्थिक नियोजन आणि योजनांची दैनंदिन देखभाल व दुरुस्ती या सर्व बाबींमध्ये संपूर्णतः महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचा एकात्मिक सहभाग होता. प्रस्तुत योजना राबविण्याप्रित्यर्थ योजनेवरील आस्थापना, अवजारे आणि अंमलबजावणीच्या खर्चापोटी सर्वसाधारणतः १७.५० टक्के एवढी रक्कम महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास मिळत असे. यातून महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचा दैनंदिन खर्च/वेतन व अन्य प्रशासकीय खर्च भागविला जात असे. सन १९९७ मध्ये उपरोक्त अधिनियमांत सुधारणा करण्यात येऊन, ''महाराष्ट्र पाणी पुरवठा व जलनिःसारण मंडळाचे'' ''**महाराष्ट्र जीवन प्राधिकरण**'' असे नामकरण करण्यात आले. तथापि, ७३ व्या व ७४ व्या घटना दुरूस्तीनुसार शासनाच्या विविध कार्यक्रमांतर्गत पाणी पुरवठा योजना राबविण्याचे संपूर्ण अधिकार शासनाने संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांना बहाल केल्यामुळे बव्हंशी स्थानिक स्वराज्य संस्थांचा कल योजना स्वतः राबविण्याकडे असल्याने, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाला मिळणारा महसूल कमी झाला आहे. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या उत्पन्नवाढीच्या दृष्टीने उपाययोजना करण्यात येत आहेत.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या कर्मचारी संख्येत एकूण ५०३८ पैकी ११९३ एवढे अभियंते आहेत. त्यांच्यापैकी बहुतेकांना किमान २० वर्षांचा प्रत्यक्ष कामाचा/अंमलबजावणीचा अनुभव आहे. यामुळे महाराष्ट्र जीवन प्राधिकरण पाणी पुरवठा व मलनिःसारण क्षेत्रातील अभियांत्रिकीदृष्ट्या तंत्रज्ञान संपन्न व अनुभव संपन्न अभियंते असलेली देशातील अग्रगण्य संस्था आहे. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने आतापर्यंत ४८० नागरी योजना पूर्ण केल्या असून, ११४८४ ग्रामीण पाणी पुरवठा योजना देखील पूर्ण केल्या आहेत.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत ११७ नागरी योजना आणि ५१४ ग्रामीण अशा एकूण ६३१ योजनांची कामे प्रगतीपथावर आहेत. २५ नागरी पाणी पुरवठा केंद्रे व २२ ग्रामीण पाणी पुरवठा योजनांची देखभाल व दुरुस्ती करण्यात येत आहे.

**महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची पुनर्रचना :–**

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची सध्याच्या व्हर्टीकल संरचनेत मुख्य अभियंत्यांची कार्यालये ठाणे, पुणे व नाशिक येथे स्थित असल्यामुळे क्षेत्रीय कार्यालयामार्फत राबविण्यात येत असलेल्या विविध नागरी व ग्रामीण पाणी पुरवठा योजनांच्या व नागरी पाणी पुरवठा केंद्रांच्या कामाच्या संदर्भात स्थानिक पातळीवरील विधानमंडळ सदस्य व नागरिक, पदाधिकारी व अधिकारी यांना, मुख्य अभियंता यांना भेटण्यासाठी ठाणे, पुणे व नाशिक येथे यावे लागते. त्यामुळे व्हर्टीकल्सची रचना अभिप्रेत असलेल्या कार्यपद्धतीप्रमाणे कामे करण्यास अडचणी येत आहेत. एखाद्या कामासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या नेमक्या कोणत्या कार्यालयाशी संपर्क साधावयाचा याबाबत सर्वसामान्य नागरिक व पदाधिकारी यांच्यामध्ये संभ्रम निर्माण झाला आहे. व्हर्टीकल संरचनेत सद्यःस्थितीत येत असलेल्या अनुभवानुसार व लोकप्रतिनिधी, स्थानिक स्वराज्य संस्था, मा. मंत्री महोदयांकडून होत असलेल्या मागणीनुसार पूर्वीप्रमाणेच प्रादेशिक मुख्य अभियंता स्वरूपाची संरचना अस्तित्वात आणण्याबाबतची बाब विचाराधीन होती. त्या अनुषंगाने सध्याची पुनर्रचना संपुष्टात आणून महाराष्ट्र जीवन प्राधिकरण दिनांक २९ एप्रिल, २०१५ च्या आदेशांनुसार ६ प्रादेशिक विभाग, मुख्य अभियंता कार्यालये, दिनांक १ मे, २०१५ पासून अस्तित्वात आणण्यात आली आहेत.

नागरी व ग्रामीण पाणी पुरवठा योजनांची अंमलबजावणी, योजनांचे दैनंदिन परिचलन व देखभाल दुरुस्ती, प्रकल्प सल्लागार सेवा, खाजगी सहभागाचे प्रकल्प संनियंत्रण व संशोधन विकास आणि प्रशिक्षण, इत्यादी कामे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे सोपविण्यात आलेली असल्याने, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या आस्थापनेवरील खर्च देखील महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या उत्पन्नातून करण्यात येत आहे. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास प्राप्त होत असलेले 'ई' ॲण्ड 'पी' शुल्क वारंवार कमी होत असल्याने, प्राधिकरणातील अधिकारी/कर्मचारी यांचे वेतन व भत्ते तसेच निवृत्तीवेतन यावरील खर्च कसा भागवावा हा गंभीर प्रश्न महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे निर्माण झाला आहे. महाराष्ट्र जीवन प्राधिकरण अधिनियमातील कलम २७ व २८ मध्ये शासनाने महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाला आर्थिक सहाय्य करण्याची तरतूद आहे.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातील अधिकारी/कर्मचारी यांच्या नियमित वेतन भत्त्यांचे दायित्व तसेच सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचारी यांच्या निवृत्तीवेतनाचे दायित्व राज्य शासनामार्फत स्वीकारण्याचा धोरणात्मक निर्णय घेण्यात आला असून, त्या अनुषंगाने दिनांक २३ मार्च, २०१७ रोजीचा शासन निर्णय, क्रमांक : मजीप्रा-२०१४/प्र.क्र. ३३ (अ)/पापु-२३, निर्गमित करण्यात आला आहे. कर्मचाऱ्यांचे वेतन, भत्ते व सेवानिवृत्तीवेतन यांचे दायित्व शासनाने स्वीकारल्यामुळे, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास ईटीपी व तांत्रिक सेवा शुल्कापोटी प्राप्त होणारे उत्पन्न शासनाकडे दरमहा जमा होणार आहे.

**१. मध्यवर्ती कार्यालय :–**

मध्यवर्ती कार्यालयामध्ये सदस्य सचिवांचे कार्यालय व त्या अंतर्गत मुख्य प्रशासकीय अधिकारी, संचालक (वित्त), मुख्य अभियंता (म. नि.), अधीक्षक अभियंता, मुख्यालय/समन्वय/गुणवत्ता परीक्षण पथक/मध्यवर्ती नियोजन संनियंत्रण व संकल्पचित्र कक्ष व अधीक्षक अभियंता (यांत्रिकी - ठाणे व नागपूर) कार्यकारी अभियंता, गुणवत्ता परीक्षण पथक (यांत्रिकी - पुणे, औरंगाबाद व नागपूर) ही कार्यालये समाविष्ट आहेत.

**१. क्षेत्रीय कार्यालये :–**

**जोडपत्र—२ (अ)**

महाराट्र जीवन प्राधिकरणाच्या क्षेत्रीय कार्यालयांची रचना

| अ.क्र. | प्रादेशिक विभाग | कार्यालये | | | | एकूण कार्यालये |
|---|---|---|---|---|---|---|
| | | मुख्य अभियंता | मंडळ | विभाग | उपविभाग | |
| १. | मुख्य अभियंता, ठाणे | १ | २ | ७ | २२ | ३२ |
| २. | मुख्य अभियंता, पुणे | १ | २ | ७ | ३१ | ४१ |
| ३. | मुख्य अभियंता, नाशिक | १ | ३ | ५ | १९ | २८ |
| ४. | मुख्य अभियंता, औरंगाबाद | १ | ३ | ७ | २२ | ३३ |
| ५. | मुख्य अभियंता, अमरावती | १ | २ | ६ | २१ | ३० |
| ६. | मुख्य अभियंता, नागपूर | १ | २ | ५ | १५ | २३ |
| | एकूण ... | ६ | १४ | ३७ | १३० | १८७ |

**मित्रा : महाराष्ट्र पर्यावरण अभियांत्रिकी प्रशिक्षण आणि संशोधन संस्था, मित्रा, नाशिक :–**

महाराष्ट्र शासन, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, शासन निर्णय क्रमांक मजीप्रा-२०१२/प्र. क्र. १४३/पापु-२३, दिनांक २१ मे, २०१२ चे आदेशान्वये (संशोधन व प्रशिक्षण केंद्र, नाशिक) स्वायत्त संस्था करण्यात आलेली आहे.

**जोडपत्र—२ (ब)**

सन २०२२-२०२३ या वर्षातील महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचा पदांचा गोषवारा.

| वर्ग | महाराष्ट्र जीवन प्राधिकरण एकूण मंजूर पदे | कार्यरत कर्मचारी | | | एकूण कार्यरत कर्मचारी |
|---|---|---|---|---|---|
| | | महाराष्ट्र जीवन प्राधिकरण | जिल्हा परिषद (प्रतिनियुक्ती) | इतर (प्रतिनियुक्ती) | |
| अ | ८१५ | २३३ | १०८ | १३ | ३५४ |
| ब | ११५५ | ५६० | १०७ | २१ | ६८८ |
| क | २३२४ | ८१० | २ | ... | ८१२ |
| ड | ७४४ | ४१४ | ५ | ... | ४१९ |
| एकूण ... | ५०३८ | २०१७ | २२२ | ३४ | २२७३ |

सन २०१९-२०२० या कालावधीत मजीप्राच्या आस्थापनेवर एकूण ५०५० पदे दर्शविण्यात आली होती. त्यापैकी शासन निर्णय क्र. मजीप्रा-१११७/प्र.क्र. २४७/पापु-२३, दि. २८ मार्च, २०१९ च्या शासन निर्णयानुसार वर्ग ड पदावरील पदे २५ टक्के निरसित करणेबाबत कळविण्यात आले होते. त्यानुसार मध्यवर्ती कार्यालयाचे परिपत्रक क्र. मजीप्रा ईएसटी २०१८/सीआर-४३/आस्था-७, दि. २१ मे, २०१९ अन्वये वर्ग ड मधील एकूण १९४ पदे निरसित करण्यात आली आहेत. त्यामुळे एकूण ५०५० पदामधून १९४ पदे रद्द केल्यामुळे सद्यःस्थितीत मजीप्राच्या आस्थापनेवर एकूण ४८५६ एवढी पदे शिल्लक होती. त्यापैकी मजीप्राच्या आस्थापनेवर जिल्हापरिषदेवरील ३४ कार्यकारी अभियंता व २०७ उप अभियंता पदे अशी एकूण २४१ पदे दर्शविण्यात आली होती. आता जिल्हा परिषदांतर्गत ग्रामीण पाणीपुरवठा विभागातल पदांचा सुधारित आकृतीबंध दिनांक २८-१२-२०२२ च्या शासन निर्णयान्वये निश्चित करण्यात आला आहे. त्यानुसार जिल्हा परिषदेवरील ३४ कार्यकारी अभियंता व ३८९ उप अभियंता पदे अशी एकूण ४२३ पदे दर्शविण्यात येत आहेत. सदर पदे एकूण मंजूर पदातून वगळून सद्यःस्थितीत मजीप्राच्या आस्थापनेवर एकूण ४६१५ (५०३८–४२३) एवढी पदे मंजूर आहेत.

**STATEMENT 2 (B)**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 1. | Central Office, CIDCO Bhavan. | ... | ... | 1 |
| 2. | C.P.D.M. Circle. | ... | ... | 1 |
| 3. | Superintending Engineer (Mech.) | ... | ... | 2 |
| 4. | Executive Engineer (Mech.) | ... | ... | 1 |
| 5. | Research and Training Center, Nashik. | ... | ... | 1 |
| 6. | Internal Audit Center. | ... | ... | 6 |
| 7. | Zone Office. | ... | ... | 5 |

**३. पाणी पुरवठा व स्वच्छता कार्यक्रम :–**

१. "पिण्याचे पाणी" ही लोकांची मूलभूत गरज आहे, हे लक्षात घेऊन पेयजल पुरवठ्यास राज्य शासनाने तसेच केंद्र शासनानेही प्राधान्य दिले आहे.

२. राज्य शासनाच्या सुधारित धोरणानुसार, सन २०००-०१ पासून पाणी पुरवठा व स्वच्छता कार्यक्रम हा मागणी आधारित व समूहसहभाग या तत्वावर राबविला जातो.

३. केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनांनुसार जल जीवन मिशनची राज्यात अंमलबजावणी करणे आणि मिशन अधिकाधिक परिणामकारक होण्याकरिता सध्या अस्तित्वातील अंमलबजावणीसाठीच्या प्रचलित कार्यपध्दती व निकषांमध्ये सुधारणा करण्याबाबत शासन निर्णय क्र. जजीमि-२०१९/प्र.क्र. १३८/पापु-१० (०७), दिनांक ४ सप्टेंबर, २०२० अन्वये निर्णय घेण्यात आला आहे. राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत महाराष्ट्र राज्याकरीता मंजूर निधी व गत काही वर्षातील मंजूर पाणी पुरवठा योजनांचा आढावा घेतला असता असे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या निदर्शनास आले की, गत तीन वर्षापेक्षा अधिक कालावधीतील रखडलेल्या ग्रामीण पाणी पुरवठा योजनांपैकी बहुतांश योजना लोकवर्गणी अभावी व लोकवर्गणीशी निगडीत ग्रामीण पाणी पुरवठा व स्वच्छता समितीच्या प्रश्नांमुळे रखडलेल्या आहेत. त्यामुळे शासन निर्णय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, क्रमांक ग्रापाधो-१११४/प्र.क्र. २२/पापु-०७, दिनांक ९ जुलै, २०१७ अन्वये, ग्रामीण पाणी पुरवठा योजनांसाठी आकारण्यात येत असलेली लोकवर्गणी पूर्णतः रद्द करण्यात आली आहे. तथापि, या शासन निर्णयापूर्वी ज्या ग्रामीण पाणी पुरवठा योजनांसाठी पूर्णतः अथवा अंशतः लोकवर्गणीची रक्कम जमा करण्यात आलेली असेल तर अशी जमा केलेली लोकवर्गणीची रक्कम संबंधित संस्थेस अथवा अंमलबजावणी यंत्रणेस परत केली जाणार नाही व अशा पाणी पुरवठा योजनांमधील उर्वरित लोकवर्गणीची तरतूद पाणी पुरवठा योजनांच्या किंमतीमध्ये समाविष्ट करण्यात येईल, अशी तरतूद शासन निर्णयात करण्यात आलेली आहे.

४. ग्रामीण पाणी पुरवठा व स्वच्छता कार्यक्रमांतर्गत (१) सर्वसाधारण योजना, (२) मागासवर्गीयांसाठी विशेष घटक योजना, आणि (३) आदिवासी भागासाठी आदिवासी उपयोजना या प्रमाणे राज्य वार्षिक योजनेत जिल्हा नियोजन समितीच्या मान्यतेनुसार स्वतंत्र तरतूद करण्यात येते.

५. ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमांतर्गत नळ योजना (खास उपाय), साध्या विहिरी व विंधण विहिरी या उपाययोजना घेण्यात येतात. उच्च क्षमतेच्या विंधण विहिरीवर वीज पंप बसवून लघु नळ पाणी पुरवठा योजना राबविण्यात येतात. ज्या ठिकाणी साधी विहिर अथवा विंधण विहीरीद्वारे पाणी पुरवठा करणे शक्य नसते, अशा गावांसाठी नळ पाणी पुरवठा योजना राबविली जाते.

६. शासन निर्णय क्रमांक जजीमि-२०१९/प्र.क्र. १३८/पापु-१०, दिनांक १० मार्च, २०२१ व दिनांक २२ सप्टेंबर, २०२१ अन्वये जल जीवन मिशन अंतर्गत ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमाच्या तांत्रिक/प्रशासकीय अंमलबजावणीचे खालीलप्रमाणे अधिकार प्रदान करण्यात आले आहेत—

**१. तांत्रिक मान्यतेचे अधिकार :**

खालील तक्त्यात नमूद केल्याप्रमाणे तांत्रिक मान्यता देण्यास संबंधित अधिकारी सक्षम राहतील.

| अनु-क्रमांक | ग्रामीण पाणी पुरवठा योजनेचा प्रकार | तांत्रिक मान्यतेचे अधिकार | | |
|---|---|---|---|---|
| | | कार्यकारी अभियंता | अधीक्षक अभियंता | मुख्य अभियंता |
| १. | स्वतंत्र ग्रामीण पाणी पुरवठा योजना | रु. २.०० कोटीपर्यंत सर्व | रु. २.०० कोटी ते रु. ५.०० कोटी | रु. ५.०० कोटीवरील सर्व |
| २. | प्रादेशिक ग्रामीण पाणी पुरवठा योजना | रु. २.०० कोटीपर्यंत सर्व | रु. २.०० कोटी ते रु. ५.०० कोटी | रु. ५.०० कोटीवरील सर्व |

**२. प्रशासकीय मान्यतेचे अधिकार**

| अनु-क्रमांक | ग्रामीण पाणी पुरवठा योजनेचा प्रकार | | प्रशासकीय मान्यतेचे अधिकार (दरडोई खर्चाच्या निकषात बसणाऱ्या योजनांसाठी) | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | ग्रामपंचायत | जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन | शासनस्तरावर |
| १. | स्वतंत्र ग्रामीण पाणी पुरवठा योजना | ... | रु. १५ लक्ष पर्यंत *गावांतर्गत कामे | रु. १५.०० लक्ष ते रु. ५.०० कोटीपर्यंत | रु. ५.०० कोटीवरील सर्व |
| २. | प्रादेशिक ग्रामीण पाणी पुरवठा योजना | ... | निरंक | रु. ५.०० कोटीपर्यंत | रु. ५.०० कोटीवरील सर्व |

शासन निर्णय क्र. जजीमि २०१९/प्र.क्र. १३८/पापु-१०, दिनांक १० मार्च, २०२१ नुसार वरील तांत्रिक व प्रशासकीय मान्यता अधिकारांबाबत खालील सुचना नमूद आहेत.—

(i) *रु. १५ लक्ष पर्यंत गावांतर्गत घ्यावयाची कामे यामध्ये रु. १५.०० लक्ष पर्यंतची गावासाठी स्वतंत्र पाणी पुरवठा योजना त्याचप्रमाणे घरगुती नळ जोडणी (FHTC) तसेच सुधारणात्मक पुनर्जोडणीची कामे समाविष्ट असतील.

(ii) जल जीवन मिशन अंतर्गत राज्यस्तरीय योजना मंजुरी समितीची मान्यता प्राप्त वार्षिक कृती आराखड्यामध्ये समाविष्ट असलेल्या योजनाच जल जीवन मिशनमधून राबविण्यात येतील.

(iii) जिल्हा पाणी व स्वच्छता मिशनस्तरावरील जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील समिती रु. ५.०० कोटी मर्यादेपर्यंतच्या योजनांना प्रशासकीय मान्यता प्रदान करेल. प्रशासकीय मान्यतेचे आदेश सह अध्यक्ष, जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांच्या स्तरावरून निर्गमित करण्यात यावेत.

(iv) जल जीवन मिशनअंतर्गत पाणी पुरवठा योजनांना सक्षम प्राधिकाऱ्यांची तांत्रिक तपासणी व तांत्रिक मान्यता प्राप्त झाल्यानंतरच योजना प्रशासकीय मान्यतेसाठी पाठविण्यात याव्यात. प्रशासकीय मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करतांना त्यासोबत योजनांचा सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR), अंदाजपत्रक व तांत्रिक मान्यतेच्या आदेशाची प्रत सादर करावी.

(v) रु. ५.०० कोटीपेक्षा अधिक किंमतीच्या योजनांचे प्रस्ताव क्षेत्रीय कार्यालयांकडून राज्य पाणी व स्वच्छता मिशनकडे पाठविण्यात येतील.

(vi) रु. ५.०० कोटी ते रु. ३०.०० कोटी पर्यंतच्या योजनांची छाननी करण्यासाठी सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांच्या अध्यक्षतेखाली खालीलप्रमाणे राज्य पाणी व स्वच्छता मिशनची तांत्रिक छाननीसाठी उपसमिती राहील. (शासन निर्णय क्र. जजीमि २०१९/प्र.क्र. १३८/पापु-१०, दिनांक २२ सप्टेंबर, २०२१ नुसार)

(१) अध्यक्ष : सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण

(२) सदस्य : मिशन संचालक, राज्य पाणी व स्वच्छता मिशन

(३) सदस्य : मुख्य अभियंता तथा विशेष कार्य अधिकार, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग

(४) सदस्य : प्रकल्प संचालक (वित्त), जल जीवन मिशन

(५) सदस्य : कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग (संबंधित जिल्हा परिषद)

(६) सदस्य : उपसंचालक, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा (संबंधित प्रादेशिक विभाग)

(७) सदस्य सचिव : अधीक्षक अभियंता (मुख्यालय), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण

रु. ५.०० कोटी वरील योजनांना राज्य पाणी व स्वच्छता मिशनस्तरावरील समितीने शिफारस केल्यानंतर शासनामार्फत प्रशासकीय मान्यता देण्यात येईल.

(vii) दरडोई खर्चाच्या निकषात न बसणारे प्रस्ताव शासनाकडे मान्यतेसाठी आल्यानंतर या प्रस्तावांवर मा. मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता यांच्या स्तरावरील समितीमार्फत कार्यवाही करण्यात येईल.

**३. क्षेत्रीय स्तरावरील अंमलबजावणीचे अधिकार :**

(शासन निर्णय क्र. जजीमि २०१९/प्र.क्र. १३८/पापु-१०, दिनांक १० मार्च, २०२१ नुसार).

| अनु-क्रमांक | ग्रामीण पाणी पुरवठा योजनेचा प्रकार | | अंमलबजावणीचे अधिकार | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | ग्रामपंचायत | जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन | महाराष्ट्र जीवन प्राधिकरण |
| १. | स्वतंत्र ग्रामीण पाणी पुरवठा योजना | ... | रु. १५.०० लक्ष पर्यंत | रु. १५.०० लक्ष ते रु. ५.०० कोटीपर्यंत | रु. ५.०० कोटीवरील सर्व |
| २. | प्रादेशिक ग्रामीण पाणी पुरवठा योजना | ... | निरंक | रु. ५.०० कोटीपर्यंत | रु. ५.०० कोटीवरील सर्व |

**४. निविदा स्विकृतीचे अधिकार :**

खालील तक्त्यात नमूद केल्याप्रमाणे ग्रामीण पाणी पुरवठा योजनांच्या निविदा स्विकृतीचे अधिकार खालीलप्रमाणे संबंधीत सक्षम प्राधिकाऱ्यांना प्रदान करण्यात येत आहेत. (शासन निर्णय क्र. जजीमि २०१९/प्र.क्र. १३८/पापु-१०, दिनांक १० मार्च, २०२१ नुसार) :

| अनु-क्रमांक | ग्रामीण पाणी पुरवठा योजनेचा प्रकार | | निविदा स्विकृतीचे अधिकार (अंदाजपत्रकीय दराने प्राप्त होणाऱ्या निविदांसाठी) | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | ग्रामपंचायत | मुख्य कार्यकारी अधिकारी | महाराष्ट्र जीवन प्राधिकरण |
| १. | स्वतंत्र ग्रामीण पाणी पुरवठा योजना | ... | रु. १५.०० लक्ष | रु. १५.०० लक्ष ते रु. ५.०० कोटीपर्यंत | रु. ५.०० कोटीवरील सर्व |
| २. | प्रादेशिक ग्रामीण पाणी पुरवठा योजना | ... | निरंक | रु. ५.०० कोटीपर्यंत | रु. ५.०० कोटीवरील सर्व |

(i) अंदाजपत्रकीय दरापेक्षा अधिक रकमेच्या निविदा प्राप्त झाल्यास, अशा निविदा स्विकृतीसाठी, शासनाची पूर्व मान्यता घेणे आवश्यक राहील. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनांच्या निविदा स्विकृतीसाठी प्रचलित कार्यपध्दती कायम राहील.

(ii) जल जीवन मिशन अंतर्गत मंजूर झालेल्या पाणी पुरवठा योजनांसाठी सदर शासन निर्णय लागू राहील. तथापि, ज्या योजनांची निविदा स्विकृती या शासन निर्णयापूर्वीच झालेली असेल अशा योजनांसाठी या शासन निर्णयातील तरतुदी लागू राहणार नाहीत.

**परिचालन व देखभाल**

शासन निर्णय, दिनांक १७ मार्च, २०१० व दिनांक १७ ऑक्टोबर, २०१४ नुसार स्वतंत्र व प्रादेशिक पाणी पुरवठा योजना पूर्ण झाल्यानंतर किमान १ वर्ष ही योजना हाताळणे कंत्राटदारावर बंधनकारक आहे. त्यानंतर स्वतंत्र योजनेच्या परिचालन व देखभालीची जबाबदारी संबंधित ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समितीची आहे व प्रादेशिक पाणी पुरवठा योजनेच्या प्रचालनाची जबाबदारी शिखर समितीची आहे.

(अ) ग्रामीण पाणी पुरवठा योजना (स्वतंत्र/प्रादेशिक) संबंधित समितीकडे हस्तांतरित न झाल्यास योजनेच्या प्रचालनाची जबाबदारी अंमलबजावणी यंत्रणेची आहे.

(आ) योजना कार्यान्वित केल्याच्या तारखेपासून ज्या ग्रामपंचायतीस पाणी पुरवठा करण्यात येत असेल त्यांना देण्यात येणाऱ्या पाण्याच्या प्रमाणात व आवश्यक पाणीपट्टीनुसार देयक आकारणी योजनेची अंमलबजावणी करणाऱ्या यंत्रणेने (जिल्हा परिषद अथवा महाराष्ट्र जीवन प्राधिकरण) करून देयकांची वसुली संबंधित लाभार्थी ग्रामपंचायतकडून करावी.

(इ) स्वतंत्र व प्रादेशिक ग्रामीण पाणी पुरवठा योजनांच्या प्रचलना संदर्भात संबंधित कंत्राटदाराशी करारनामा करून योजना पूर्ण झाल्यानंतर ३ ते ५ वर्षे कालावधीसाठी देखभाल करण्याचा पर्याय अंमलबजावणी यंत्रणेस आहे.

कंत्राटदारामार्फत योजना पूर्णत्वानंतर करावयाच्या देखभाल दुरुस्तीचा खर्च पाणी पुरवठा योजनेच्या सविस्तर प्रकल्प अहवालात तसेच योजनेच्या भांडवली खर्चात समाविष्ट करता येणार नाही. ग्रामीण पाणी पुरवठा योजनांच्या देखभाल दुरुस्तीबाबत शासन निर्णय, क्रमांक ग्रापाधो-१११४/प्र.क्र. ५२/पापु-०७, दिनांक १७ ऑक्टोबर, २०१४ च्या शासन निर्णयातील तरतुदी लागू राहतील.

**त्रयस्थ तांत्रिक परीक्षण**

सर्व प्रकारच्या ग्रामीण पाणी पुरवठा योजनांचे त्रयस्थ तांत्रिक परीक्षण करणे अनिवार्य करण्यात आले आहे. त्रयस्थ तांत्रिक परीक्षणाबाबतचे सविस्तर निर्देश शासन निर्णय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, क्रमांक ग्रापाधो-१११४/प्र.क्र. ६१/पापु-०७, दिनांक १५ जून, २०१५ अन्वये देण्यात आले आहेत. ग्रामीण पाणी पुरवठा योजनांचे त्रयस्थ तांत्रिक परीक्षण करण्यासाठी शासकीय पदवी/पदविका अभियांत्रिकी महाविद्यालये व शासकीय आय. आय. टी. संस्था यांना मुभा देण्यात आलेली आहे. या निर्णयाद्वारे ग्रामीण पाणी पुरवठा योजनांचे दोन टप्प्यावर त्रयस्थ तांत्रिक परीक्षण करण्याचे बंधन घालण्यात आले आहे. त्रयस्थ तांत्रिक परीक्षणामुळे ग्रामीण पाणी पुरवठा योजना विहित मुदतीत, निश्चित केलेल्या तपशीलानुसार पूर्ण होणे अभिप्रेत आहे.

**देखभाल दुरुस्ती**

ग्रामीण पाणी पुरवठा योजना पूर्ण झाल्यानंतर ती योजना किमान एक वर्ष चालविणे कंत्राटदारावर बंधनकारक करण्यात आले असून, संबंधित कंत्राटदारामार्फत किमान तीन ते पाच वर्षाच्या कालावधीसाठी योजनेची देखभाल-दुरुस्ती करण्यासाठी करारनामा करण्याची मुभा अंमलबजावणी यंत्रणांना देण्यात आली आहे.

७. ग्रामीण व नागरी पाणी पुरवठ्याच्या नियमित कार्यक्रमाशिवाय, टंचाई परिस्थितीत पिण्याचे पाणी पुरवठा करण्यासाठी अनेक कायम, निमकायम व तात्पुरत्या उपाययोजना घेण्यात येतात.

८. ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमाच्या धोरणानुसार योजनेची निवड, आखणी व अंमलबजावणी ही संबंधित गावाच्या ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समितीने करावयाची असून, योजनेच्या देखभाल दुरुस्तीवरील १०० टक्के खर्च संबंधित लाभार्थ्यांनी करावयाचा आहे. ग्रामीण पाणी पुरवठा योजनांच्या देखभाल दुरुस्तीमधील शासन यंत्रणेचा सहभाग हा सहाय्यकर्त्याचा राहणार आहे. त्यामुळे शासन निर्णय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, क्रमांक ग्रापाधो-१११४/प्र.क्र. ५२/पापु-०७, दिनांक १७ ऑक्टोबर, २०१४ अन्वये ग्रामीण पाणी पुरवठा योजनांच्या देखभाल-दुरुस्तीबाबत सविस्तर मार्गदर्शक सूचना पारित करण्यात आल्या आहेत. या शासन निर्णयानुसार देखभाल दुरुस्तीसाठी खालील बाबींचा अवलंब करण्याची मुभा योजना अंमलबजावणी यंत्रणांना देण्यात आली आहे—

- ग्रामीण पाणी पुरवठा योजनांची देखभाल दुरुस्ती करण्याची मुख्य जबाबदारी स्थानिक स्वराज्य संस्था/अंमलबजावणी यंत्रणांची आहे.
- ग्रामीण पाणी पुरवठा योजनांच्या देखभाल दुरुस्तीसाठी शासन स्तरावरून दरवर्षी देखभाल दुरुस्ती प्रोत्साहन अनुदान वितरीत करण्यात येते.
- ग्रामीण पाणी पुरवठा योजनांची देखभाल दुरुस्ती सुरळीतपणे न होण्याचे महत्वाचे कारण म्हणजे योजना पूर्णत्वानंतर योजना चालविण्यासाठी दरवर्षी किती रकमेची आवश्यकता आहे, याचा आर्थिक ताळेबंद स्थानिक स्वराज्य संस्थांकडे/अंमलबजावणी यंत्रणांकडे नाही. त्यामुळे दरवर्षी किती पाणीपट्टी आकारण्यात यावी, याचे नियोजन नाही. (आकारण्यात येणारी पाणीपट्टी ही आवश्यकतेपेक्षा फारच कमी आहे) तसेच आकारण्यात येत असलेल्या पाणीपट्टीची वसुली देखील फार कमी आहे.
- दिनांक १७ ऑक्टोबर, २०१४ रोजीच्या शासन निर्णयान्वये ग्रामीण पाणी पुरवठा योजनांच्या देखभाल दुरुस्ती प्रक्रियेत आमुलाग्र बदल करण्यात आले असून, या संदर्भातील दिनांक १७ ऑगस्ट, २००९ व दिनांक २० एप्रिल, २०१२ रोजीचे शासन निर्णय रद्द करण्यात आले आहेत.

- **दिनांक १७ ऑक्टोबर, २०१४ रोजीच्या शासन निर्णयातील महत्वाच्या तरतुदी पुढीलप्रमाणे आहेत—**

(१) ग्रामीण पाणी पुरवठा योजनांची देखभाल-दुरुस्ती करण्यासाठी पारित केलेल्या सूचना अंमलबजावणी यंत्रणांना बंधनकारक नसून, त्या मार्गदर्शक स्वरुपाच्या ठेवण्यात आल्या आहेत. ग्राम पाणी पुरवठा योजनांच्या देखभाल-दुरुस्तीची मुख्य जबाबदारी अंमलबजावणी यंत्रणांची/समित्यांची असल्याने या यंत्रणा/समित्या त्यांची स्वतंत्र देखभाल-दुरुस्तीची प्रक्रिया राबवू शकतात.

(२) ग्राम पाणी पुरवठा योजना पूर्ण झाल्यानंतर किमान एक वर्ष ही योजना चालविणे कंत्राटदारावर बंधनकारक करण्यात आले आहे.

(३) योजना हस्तांतरित झाल्यानंतर योजनेच्या देखभाल-दुरुस्तीची जबाबदारी योजना हस्तांतरित करून घेणाऱ्या यंत्रणांवर सोपविण्यात आली आहे.

(४) ग्रामीण पाणी पुरवठा योजनांच्या देखभाल-दुरुस्तीसाठी जिल्हा परिषद स्तरावर स्थापन केलेल्या जिल्हा देखभाल दुरुस्ती निधीमध्ये शासनाकडून देय असलेल्या देखभाल-दुरुस्ती निधीचे वितरण सर्व जिल्हा परिषदांना मंजूर वार्षिक कृती आराखड्याच्या रकमेच्या प्रमाणात थेट करण्याचे निश्चित केले. (यापूर्वी जिल्हापरिषदांकडील मागणीनुसार निधीचे वितरण केले जात होते.)

(५) जिल्हा देखभाल-दुरुस्ती निधीमध्ये जिल्हा परिषदांनी त्यांच्या एकूण उत्पन्नाच्या किमान २० टक्के रक्कम जमा करणे बंधनकारक करण्यात आले आहे. ही २० टक्के रक्कम भरण्यासाठी पिण्याच्या पाण्यावरील पाणीपट्टी विचारात घेता येणार नाही.

(६) जिल्ह्यातील ग्रामीण पाणी पुरवठा योजनांच्या देखभाल-दुरुस्तीवर मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांचे नियंत्रण ठेवण्यात आले आहे.

(७) योजनांची देखभाल-दुरुस्ती नियमितपणे होण्यासाठी व स्थानिक पातळीवर होण्यासाठी यंत्रणा/समित्यांकडील कर्मचाऱ्यांना व अधिकृत नळजोडणीकारांना प्रशिक्षण देण्याचे निश्चित केले आहे.

(८) ग्रामीण पाणी पुरवठा योजनांची देखभाल-दुरुस्ती खाजगी यंत्रणा/कंत्राटदारांकडून करून घेण्यासही काही अटींच्या अधीन राहून मान्यता देण्यात आली आहे.

(९) ग्रामीण पाणी पुरवठा योजनांच्या देखभाल-दुरुस्तीकरिता पुरेसा निधी उपलब्ध होण्यासाठी व देखभाल-दुरुस्तीकडे काटेकोर लक्ष देता यावे यासाठी देखभाल-दुरुस्तीचा स्वतंत्र अर्थसंकल्प तयार करण्याचे बंधनकारक करण्यात आले आहे.

(१०) ग्रामीण पाणी पुरवठा योजनांच्या देखभाल-दुरुस्तीकरिता निधी वितरीत करण्याची जबाबदारी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांच्यावर सोपविण्यात आली आहे.

(११) दिनांक १७ ऑगस्ट, २००९ च्या शासन निर्णयान्वये निश्चित केलेले देखभाल-दुरुस्तीच्या निधी वितरणाचे निकष रद्द करण्यात आले असून, जिल्ह्यातील ग्रामीण पाणी पुरवठा योजनांच्या देखभाल-दुरुस्तीमध्ये प्राधान्यक्रम ठरवून देखभाल-दुरुस्तीची कामे हाती घेण्याचे अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांना देण्यात आले आहेत.

(१२) दिनांक २० एप्रिल, २०१२ च्या शासन निर्णयान्वये तयार केलेल्या योजना नुतनीकरण निधीची तरतूद रद्द करण्यात आली असून, योजना नुतनीकरण निधीमध्ये उपलब्ध असलेला सर्व निधी जिल्हा देखभाल-दुरुस्ती निधीमध्ये वर्ग करण्याच्या सूचना सर्व संबंधितांना देण्यात आल्या आहेत.

(१३) ग्रामीण पाणी पुरवठा योजनांच्या देखभाल-दुरूस्तीसाठी दिनांक १७-१०-२०१४ रोजीच्या शासन निर्णयान्वये निर्गमित केलेल्या सुधारित मार्गदर्शक सूचनांना दिनांक १० मार्च, २०१५ रोजी शुद्धीपत्रक निर्गमित करण्यात आले आहे. त्यानुसार दिनांक १७ ऑक्टोबर, २०१४ रोजीच्या शासन निर्णयातून महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास सूट देण्यात आली असून, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाला देखभाल-दुरुस्ती प्रोत्साहन अनुदानाची रक्कम शासन स्तरावरून थेट वितरीत करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

९. पाणी पुरवठा व स्वच्छता विभागातील शासन निर्णय क्रमांक-ग्रापाधो-२०१९/प्र. क्र. ४९/पापु-०७, दिनांक २१ ऑगस्ट, २०१९ अन्वये राज्यातील राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम व मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रम या कार्यक्रमांतर्गत प्रगतीपथावरील योजनांकरिता सौर उर्जा प्रकल्प राबविणे, त्याकरिता येणारा खर्च हा ज्या कार्यक्रमांतर्गत योजनांना मंजुरी मिळाली आहे, त्या योजनांच्या अंदाजपत्रकात समाविष्ट करण्यात यावा. सदर सौर उर्जा प्रकल्पांची निविदा प्रक्रिया एकत्रितपणे मध्यवर्ती कार्यालयाकडून महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून राबविण्यात यावी.

१०. राज्यात सन २०००-२००१ पासून संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियान राबविण्यात येत आहे.

# पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय (आस्थापना)

पाणी पुरवठा व स्वच्छता विभागातील पदांचा आढावा दिनांक ४ सप्टेंबर, २००२ च्या शासन निर्णयान्वये निश्चित केला असून, विभागातील एकूण १६१ पदांना मंजुरी देण्यात आली आहे. त्यानंतर विभागाच्या कामकाजात झालेली वाढ विचारात घेऊन, दिनांक २२ मार्च, २०१२ च्या शासन निर्णयान्वये २५ नवीन पदे निर्माण करण्यात आली आहेत. तसेच जागतिक बँक अर्थसहाय्यित प्रकल्पांतर्गत निर्माण करण्यात आलेली परंतु, विभागाच्या आकृतीबंधामध्ये समाविष्ट नसलेली ३ अस्थायी पदे, दिनांक २३ सप्टेंबर, २०१४ च्या शासन निर्णयान्वये विभागाच्या मंजूर आकृतीबंधात समाविष्ट करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

२. या विभागाचे प्रमुख प्रधान सचिव हे पद भारतीय प्रशासन सेवेतून भरण्यात येते. या विभागाकरीता १ सह सचिव व ३ उप सचिवांची पदे मंजूर असून, त्यापैकी किमान १ पद भारतीय प्रशासन सेवेतून भरण्यात येते. या व्यतिरिक्त, मुख्य अभियंता तथा विशेष कार्यकारी अधिकाऱ्याचे १ पद मंजूर असून हे पद महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातील मुख्य अभियंता दर्जाच्या अधिकाऱ्याची प्रतिनियुक्ती करून भरण्यात येते. विभागात अवर सचिवांची १० पदे, कक्ष अधिकारी गट 'ब' राजपत्रित अधिकाऱ्यांची १९ पदे असून त्यांच्या मदतीस सहायक कक्ष अधिकारी, लिपिक-टंकलेखक व अन्य गट-ड संवर्गातील कर्मचारीवृंद आहेत.

३. राज्यातील प्रत्येक नागरिकाला पिण्याचे शुद्ध पाणी उपलब्ध करून देणे व स्वच्छतेविषयी सर्व सोयीसुविधा उपलब्ध करून देणे हे या विभागाचे प्रमुख उद्दिष्ट आहे. या विभागामार्फत केंद्र पुरस्कृत जलजीवन मिशन, स्वच्छ भारत मिशन (ग्रा), अटल भूजल योजना, राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम, मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रम, शिवकालीन पाणी साठवण योजना, संत गाडगेबाबा नागरी ग्रामीण स्वच्छता अभियान, महाराष्ट्र जलक्षेत्र सुधार प्रकल्प, जलविज्ञान प्रकल्प, सुजल निर्मल अभियान व जलस्वराज्य टप्पा-२ अशा विविध महत्वाकांक्षी योजना राबविल्या जातात. केंद्र शासनाकडून या विभागास उपलब्ध होणाऱ्या अनुदानाचे संनियंत्रण राज्य पाणी व स्वच्छता मिशन यांच्यामार्फत केले जाते.

४. या विभागातील उप सचिव (अर्थसंकल्प) यांच्या अधिपत्त्याखालील कार्यासनांमार्फत, विभागास केंद्र व राज्य शासनाकडून प्राप्त होणाऱ्या सर्व निधींचे नियोजन, वाटप, तसेच नागरी दलित वस्तीविषयक प्रशासकीय बाबी व निधी वितरण, नागरी पाणी पुरवठा व स्वच्छता विषयक बाबी तसेच पाणी टंचाई उपाययोजना इत्यादी बाबी हाताळल्या जातात. उपसचिव (आस्थापना) यांच्या अधिपत्त्याखालील कार्यासनांमार्फत पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग (खुद्द) मधील अधिकारी/कर्मचारी यांच्या आस्थापनाविषयक व सेवाविषयक बाबी हाताळल्या जातात. तसेच विभागातील लेखा परीक्षण व खर्चमेळाच्या बाबी हाताळल्या जातात.

५. सह सचिव (भाप्रसे) यांच्या अधिपत्त्याखालील कार्यासनांकडून ग्रामीण स्वच्छतेशी संबंधित धोरणात्मक तसेच निधी वितरण विषयक बाबी, जलस्वराज्य टप्पा-२, पिण्याच्या पाण्याची गुणवत्ता राखण्याविषयी धोरणात्मक बाबी व निधी वितरण विषयक बाबी हाताळल्या जातात. तसेच महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा व ग्रामीण पाणी पुरवठा विभागातील अधिकारी/कर्मचारी यांच्या आस्थापनाविषयक व सेवाविषयक बाबी हाताळल्या जातात. मुख्य अभियंता तथा विशेष कार्य अधिकारी यांच्या अधिपत्त्याखालील कार्यासनांमार्फत ग्रामीण पाणी पुरवठा योजनांच्या प्रस्तावांची छाननी करून ग्रामीण पाणी पुरवठा योजनांना प्रशासकीय मान्यता देणे, मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत ग्रामीण पाणी पुरवठा योजनांच्या प्रस्तावांची छाननी करून ग्रामीण पाणी पुरवठा योजनांना प्रशासकीय मान्यता देणे तसेच निधी वितरण विषयक कामे हाताळली जातात.

६. या विभागाच्या अधिपत्त्याखाली महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, राज्य पाणी व स्वच्छता मिशन व जिल्हा परिषदेतील ग्रामीण पाणी पुरवठा अशा यंत्रणा कार्यरत आहेत. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत प्रादेशिक पाणी पुरवठा योजनांची कामे करण्यात येतात. भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणेमार्फत भूजलाशी निगडीत कामकाज हाताळले जाते व जिल्हा परिषदेतील ग्रामीण पाणी पुरवठा विभागामार्फत जिल्ह्यात कार्यरत असलेल्या पाणी पुरवठा योजनांशी संबंधित कामे हाताळली जातात. तसेच राज्य पाणी व स्वच्छता मिशन मार्फत राज्यामध्ये पाणी पुरवठा व स्वच्छता कार्यक्रमांची परिणामकारक अंमलबजावणी केली जाते.

७. या विभागाच्या अधिपत्त्याखाली राज्य पाणी व स्वच्छता मिशन ही यंत्रणा कार्यरत आहे. या अभियानाचे मिशन संचालक (भाप्रसे) यांच्यामार्फत जलजीवन मिशन या योजनेशी संबंधित कामे हाताळली जातात.

**तक्ता क्रमांक-१**

## पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाच्या आस्थापनेवर असलेली राजपत्रित/अराजपत्रित स्थायी/अस्थायी पदे

| अनुक्रमांक | पदाचे नाव | मंजूर वेतन श्रेणी (७ वा वेतन आयोग) (रुपयात) | स्थायी पदे | अस्थायी पदे | एकूण पदे |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| | **गट—अ राजपत्रित** | | | | |
| १. | प्रधान सचिव ... ... ... | संवर्ग पद | १ | ... | १ |
| २. | मुख्य अभियंता तथा विशेष कार्य अधिकारी ... | S-२७ : ११८५००-२१४१०० | १ | ... | १ |
| ३. | सह सचिव/उपसचिव ... ... ... | S-२७ : ११८५००-२१४१००/ S-२५ : ७८८००-२०९२०० | २ | १ | ३ |
| ४. | अपर सचिव तथा प्रकल्प संचालक... ... ... | ७ वा वेतन आयोग मॅट्रीक-४ लेव्हल-११ | ... | १ | १ |
| ५. | प्रकल्प व्यवस्थापक (प्रकल्प अधिकारी) ... ... ... | S-२३ : ६७७००-२०८७०० | ... | १ | १ |
| ६. | अवर सचिव ... ... ... | S-२३ : ६७७००-२०८७०० | ६ | ४ | १० |
| ७. | वरिष्ठ स्वीय सहायक/लघुलेखक (निवडश्रेणी)... | S-२३ : ६७७००-२०८७००/ S-१६ : ४४९००-१४२४०० | १ | ... | १ |
| ८. | तांत्रिक अधिकारी ... ... | S-२० : ५६१००-१७७५०० | ... | १ | १ |
| ९. | उप अभियंता ... ... ... | S-२० : ५६१००-१७७५०० | १ | ३ | ४ |
| १०. | क्षमता बांधणी तज्ज्ञ (प्रशिक्षण अधिकारी) (हे पद वगळले आहे) ... ... ... | S-२० : ५६१००-१७७५०० | ... | ... | ... |
| | | (अ) एकूण पदे ... | १२ | ११ | २३ |
| | **गट—ब राजपत्रित** | | | | |
| १. | कक्ष अधिकारी ... ... ... | S-१७ : ४७६००-१५११०० | १२ | ७ | १९ |
| २. | लेखा अधिकारी ... ... ... | S-१६ : ४४९००-१४२४०० | १ | १ | २ |
| ३. | सांख्यिकी अधिकारी ... ... ... | S-१५ : ४१८००-१३२३०० | १ | १ | २ |
| ४. | एमआयएस को-ऑर्डिनेटर ... ... ... | S-१५ : ४१८००-१३२३०० | १ | ... | १ |
| ५. | सहायक लेखाधिकारी ... ... ... | S-१५ : ४१८००-१३२३०० | १ | ... | १ |
| | | (ब) एकूण पदे ... | १६ | ९ | २५ |
| | **गट—ब अराजपत्रित** | | | | |
| १. | उच्चश्रेणी लघुलेखक ... ... ... | S-१५ : ४१८००-१३२३०० | २ | २ | ४ |
| २. | निम्नश्रेणी लघुलेखक ... ... ... | S-१४ : ३८६००-१२२८०० | ६ | ४ | १० |
| ३. | सहायक कक्ष अधिकारी/रोख लेखापाल... ... | S-१४ : ३८६००-१२२८०० | ३१ | १० | ४१ |
| ४. | संगणक यंत्रचालक ... ... ... | S-१४ : ३८६००-१२२८०० | ... | ... | (मृत संवर्ग) |
| | | गट—ब एकूण पदे ... | ३९ | १६ | ५५ |
| | **गट—क** | | | | |
| १. | लघुटंकलेखक ... ... ... | S-८ : २५५००-८११०० | १ | २ | ३ |
| २. | सांख्यिकी सहायक ... ... ... | S-१०: २९२००-९२३०० | १ | ... | १ |
| ३. | लिपिक-टंकलेखक ... ... ... | S-६ : १९९००-६३२०० | ३९ | १२ | ५१ |
| ४. | उपलेखापाल ... ... ... | S-१३ : ३५४००-११२४०० | ... | १ | १ |
| ५. | रोखपाल (हे पद वगळले आहे) ... ... ... | S-६ : १९९००-६३२०० | ... | ... | ... |
| ६. | वाहनचालक-नि-सर्वसाधारण सहायक ... ... | S-६ : १९९००-६३२०० | ... | १ | १ (मृत संवर्ग) |
| ७. | वाहनचालक ... ... ... | S-६ : १९९००-६३२०० | १ | ... | १ |
| | | गट—क एकूण पदे ... | ४२ | १६ | ५८ |
| | **गट—ड** | | | | |
| १. | हवालदार ... ... ... | S-३ : १६६००-५२४०० | १ | ... | १ |
| २. | आवेष्टक ... ... ... | S-३ : १६६००-५२४०० | १ | ... | १ |
| ३. | चक्रमुद्रक ... ... ... | S-३ : १६६००-५२४०० | १ | ... | १ |
| ४. | नाईक ... ... ... | S-३ : १६६००-५२४०० | ... | १ | १ |
| ५. | शिपाई ... ... ... | S-१ : १५०००-४७६०० | १३ | ६ | १९ |
| | | गट—ड एकूण पदे ... | १६ | ७ | २३ |
| | | **विभागातील एकूण पदे ...** | **१२५** | **५९** | **१८४** |

**तक्ता क्रमांक-१ (चालू)**

## पाणी पुरवठा व स्वच्छता विभागांतर्गत सुधारणा सहाय्य व प्रकल्प व्यवस्थापन कक्षासाठी दिनांक ३१-१२-२०२१ पर्यंत मंजूर असलेली राजपत्रित/अराजपत्रित स्थायी/अस्थायी पदे

| अनुक्रमांक | पदाचे नाव | मंजूर वेतन श्रेणी (७ वा वेतन आयोग) (रुपयात) | स्थायी पदे | अस्थायी पदे | एकूण पदे |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| | | **गट—अ राजपत्रित** | | | |
| १. | सह सचिव तथा प्रकल्प संचालक (सुसप्रव्यक)... | S-२५ : ७८८००-२०९२०० | ... | १ | १ |
| २. | प्रकल्प व्यवस्थापक (प्रकल्प अधिकारी) ... ... | S-२३ : ६७७००-२०८७०० | ... | १ | १ |
| ३. | तांत्रिक अधिकारी (उप अभियंता)... ... ... | S-२० : ५६१००-१७७५०० | ... | १ | १ |
| | | एकूण | ... | ३ | ३ |
| | | **गट—ब अराजपत्रित** | | | |
| १. | उच्च श्रेणी लघुलेखक ... ... ... | S-१५ : ४१८००-१३२३०० | ... | १ | १ |
| २. | उपलेखापाल ... ... ... | S-१३ : ३५४००-११२४०० | ... | १ | १ |
| | | एकूण | ... | २ | २ |
| | | **गट—क अराजपत्रित** | | | |
| १. | लिपिक-टंकलेखक ... ... ... | S-६ : १९९००-६३२०० | ... | १ | १ |
| २. | वाहन चालक-नि-सर्वसाधारण सहायक... | S-६ : १९९००-६३२०० | ... | २ | २ |
| | | एकूण | ... | ३ | ३ |
| | | **अराजपत्रित वर्ग—४** | | | |
| १. | शिपाई ... ... ... | S-१ : १५०००-४७६०० | ... | २ | २ |
| | | एकूण | ... | २ | २ |
| | | **सु. स. प्र. व्य. कक्ष एकूण पदे** | **...** | **१०** | **१०** |

**जागतिक बँक अर्थसहाय्यित जलस्वराज्य प्रकल्पांतर्गत निर्माण करण्यात आलेली परंतु, विभागाच्या आकृतीबंधामध्ये समाविष्ट नसलेली खालील २ अस्थायी पदे दिनांक २३ सप्टेंबर, २०१४ च्या शासन निर्णयान्वये विभागाच्या मंजूर आकृतीबंधात समाविष्ट करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे.**

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | **गट—अ राजपत्रित** | | | |
| १. | अवर सचिव ... ... | S-२३ : ६७७००-२०८७०० | ... | १ | १ |
| | | **गट—ब अराजपत्रित** | | | |
| २. | सहायक कक्ष अधिकारी ... ... | S-१४ : ३८६००-१२२८०० | ... | १ | १ |
| | | एकूण | ... | २ | २ |

# जल जीवन मिशन

**प्रस्तावना :—**

सन २००९-२०१० पासून केंद्र शासन पुरस्कृत सुरू असलेल्या राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमाची जल जीवन मिशनमध्ये समाविष्ट करून पुनर्रचना करण्याचे केंद्र शासनाने ठरविले आहे.

यापूर्वीच्या राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमाची पुनर्रचना करून सन २०१९ पासून जल जीवन मिशनची सुरुवात करण्यात आली आहे. जल जीवन मिशनबाबत केंद्र शासनाने, दिनांक २५ डिसेंबर, २०१९ रोजी मार्गदर्शक सूचना निर्गमित केल्या आहेत. केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनेस अनुसरुन राज्यात जल जीवन मिशन राबविण्याचा निर्णय राज्य मंत्रीमंडळाच्या दिनांक ८ जुलै, २०२० रोजीच्या बैठकीत घेण्यात आला असून त्याआधारे राज्यात जल जीवन मिशन राबविण्याकरिता दिनांक ४ सप्टेंबर, २०२० रोजीच्या शासन निर्णयान्वये मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत.

त्यानुसार राज्यातील जल जीवन मिशनच्या अंमलबजावणीकरिता यापूर्वीच्या पाणी व स्वच्छता सहाय्य संस्थेचे विलिनीकरण करून राज्य पाणी व स्वच्छता मिशनची स्थापना करण्यात आली आहे. त्यासोबतच जिल्हास्तरावर जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन व ग्रामपातळीवर ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समिती असणार आहे. जल जीवन मिशनचे मुख्यालय बेलापूर, नवी मुंबई येथे असून मिशन संचालक हे त्याचे प्रमुख आहेत.

**१. उद्दिष्ट :—**

ग्रामीण भागातील सर्व कुटुंबांना सन २०२४ पर्यंत "हर घर नल से जल" (FHTC–Functional Household Tap Connection) प्रमाणे पाणी पुरवठा करण्यास शासन कटिबध्द आहे. सन २०२४ पर्यंत राज्यातील ग्रामीण भागातील प्रत्येक घरात वैयक्तिक नळ जोडणीद्वारे दरडोई किमान ५५ लिटर प्रती दिन, गुणवत्तापूर्ण पाणी पुरवठा करणे हे जल जीवन मिशनचे प्रमुख उद्दिष्ट आहे. यात फक्त योजना पूर्ण करणे एवढाच उद्देश नसून कार्यक्षम पाणी पुरवठ्याची एक शाश्वत सेवा उपलब्ध करणे हा त्यामधील प्रमुख गाभा आहे. सदर जल जीवन मिशन योजना ५० : ५० टक्के केंद्र व राज्य हिश्श्याने राबविण्यात येते.

**२. जल जीवन मिशनसाठी संस्थात्मक यंत्रणा :—**

जल जीवन मिशनच्या मार्गदर्शक सूचना दिनांक २५ डिसेंबर, २०१९ रोजी केंद्र शासनाने निर्गमित केल्या असून हा एक कालमर्यादित कार्यक्रम आहे. विहित कालावधीत उद्दिष्टपूर्ती करण्याचे लक्ष्य असल्याने यासाठी मजबूत चार स्तरीय संस्थात्मक संरचना तयार करण्यात आली आहे :—

(१) राष्ट्रीय स्तरावर राष्ट्रीय जल जीवन मिशन (NJJM)

(२) राज्य स्तरावर राज्य पाणी व स्वच्छता मिशन (राज्य पाणी व स्वच्छता मिशन)

(३) जिल्हा स्तरावर जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन (DWSM)

(४) ग्राम पातळीवर ग्रामीण पाणी पुरवठा व स्वच्छता समिती (VWSC)

**३. कृती आराखडा :—**

जल जीवन मिशन अंतर्गत राज्यातील ग्रामीण भागातील प्रत्येक कुटुंबाला पिण्याच्या पाण्याची सुरक्षा (Drinking Water Security) देण्यासाठी प्रत्येक घरात कार्यात्मक नळ जोडणीद्वारे पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करण्यात येणार आहे. पिण्याच्या पाण्याची गुणवत्ता ही किमान भारतीय दर्जा – BIS : १०,५०० अशी असावी असे अपेक्षित केले आहे.

जल जीवन मिशन अंतर्गत प्रत्येक कुटुंबास सन २०२४ पर्यंत घरगुती नळ जोडणीद्वारे पाणी पुरवठा सुविधा उपलब्ध करून द्यावयाची आहे. यानुसार गाव कृती आराखडा (VAP), जिल्हा कृती आराखडा (DAP) व राज्य कृती आराखडा (SAP) तयार करण्यात येतात. सदर कृती आराखड्यामध्ये द्यावयाच्या नियोजित घरगुती नळ जोडण्याचे व त्याकरिता आवश्यक असणाऱ्या निधीचे त्रैमासिक व वार्षिक नियोजन असते. यामध्ये अंमलबजावणी सहाय्य संस्था (ISA), ग्रामीण पाणी पुरवठा विभाग/उपविभाग किंवा महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांच्या मदतीने सदर कार्यवाही पूर्ण करण्यात येते.

**४. जल जीवन मिशन अंतर्गत योजनांची अंमलबजावणी :—**

जल जीवन मिशनमध्ये पुढील प्रकारच्या योजनांचा समावेश करावा—

४.१ ज्या योजना राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम (NRDWP) अंतर्गत सुरू आहेत, अशा योजनांची सुधारणात्मक पुनर्जोडणी (Retrofitting) ५५ LPCD प्रमाणे करून कार्यात्मक नळ जोडणी करणे. तसेच गावांमध्ये स्टँड पोस्ट नळ पाणी योजना आहेत, अशा गावांमध्ये स्टँड पोस्टपासून प्रत्येक कुटुंबापर्यंत/घरापर्यंत कार्यात्मक नळजोडणी देण्यासाठी पूर्वीच्या योजनांची सुधारणात्मक पुनर्जोडणी (Retrofitting) करणे.

४.२ पूर्ण झालेल्या योजनांच्या बाबतीत ४० LPCD ऐवजी ५५ LPCD पाणी पुरवठा करण्याच्या अनुषंगाने अशा योजनांची सुधारणात्मक पुनर्जोडणी (Retrofitting) करणे.

४.३ ज्या गावांमध्ये पिण्यायोग्य मुबलक भूजल (किंवा अन्य पर्यायाद्वारे) उपलब्ध आहे, अशा गावांमध्ये स्वतंत्र योजना घेणे.

४.४ ज्या गावांमध्ये मुबलक भूजल (किंवा अन्य पर्यायाद्वारे) पाणीसाठा उपलब्ध आहे, मात्र पाण्याची गुणवत्ता योग्य नाही, अशा गावांमध्ये जल शुद्धीकरणाच्या प्रकल्पासह स्वतंत्र योजना घेणे.

४.५ ज्या गावांमध्ये पाण्याचे प्रमाण कमी आहे, अशा गावांसाठी प्रादेशिक/अनेक गाव योजना (Water Grid) घेणे.

४.६ आदिवासी भागात नळ पाणी पुरवठा सोय नसलेल्या आदिवासी गावे/वाड्या/पाडे यांना कायमस्वरुपी पाणी पुरवठा करून प्रत्येक घरात कार्यात्मक नळजोडणीद्वारे नळपाणी पुरवठा करणे, जल जीवन मिशनच्या मार्गदर्शक सूचनांनुसार शासकीय आश्रमशाळा, अनुदानित आश्रमशाळा, शासकीय वसतिगृहे, अंगणवाडी इत्यादी करिता सदर योजनेतून नळ जोडणी देणे. तसेच एकाकी/आदिवासी वाडी/पाड्याकरिता सौर ऊर्जा आधारित नळ पाणी पुरवठा योजना राबविणे.

४.७ दलित वस्तीमधील सर्व घरांना कार्यात्मक नळ जोडणीसह पाणी पुरवठा देणे व योजनेच्या लाभार्थ्यांची स्वतंत्र माहिती ठेवणे. स्वतंत्र योजनेसाठी जास्तीत जास्त १८ महिन्यांचा व अनेक गाव योजनांसाठी ३६ महिन्यांचा कालावधी अनुज्ञेय राहील.

जिल्ह्यातील पाणी पुरवठा योजनांसाठी प्रशासकीय मान्यता देण्यासंदर्भात राज्य पाणी व स्वच्छता मिशनकडून जिल्हा पाणी व स्वच्छता मिशनला वित्तीय मर्यादेचे अधिकार प्रदान केले जातात. पाणी पुरवठा योजनेच्या अंमलबजावणी दरम्यान आणि अंतिम देयक अदायगी करण्यापूर्वी जल जीवन मिशन च्या मार्गदर्शक सूचनांप्रमाणे त्रयस्थ संस्थेमार्फत तपासणी करण्यात येईल.

**५. राज्य पाणी व स्वच्छता मिशन (राज्य पाणी व स्वच्छता मिशन) :—**

पाणी पुरवठा व स्वच्छता विभागातील योजनांसाठी या विभागामार्फत दिनांक १० फेब्रुवारी, २०१० रोजी संस्था नोंदणी अधिनियम, १८६० अंतर्गत राज्य पाणी व स्वच्छता मिशनची नोंदणी करण्यात आली आहे. या मिशनमध्ये मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली शिखर समिती आहे. जल जीवन मिशन व स्वच्छता विषयक कार्यक्रमांचे राज्यातील नियोजन, अंमलबजावणी, संनियंत्रण याबाबत संपूर्ण जबाबदारी व अधिकार राज्य पाणी व स्वच्छता मिशनला आहेत. जल जीवन मिशनच्या मार्गदर्शक सूचनांप्रमाणे राज्य पाणी व स्वच्छता मिशनला कार्य करण्याचे संपूर्ण अधिकार आहेत. राज्य पाणी आणि स्वच्छता मिशनला (राज्य पाणी व स्वच्छता मिशन) जल जीवन मिशनसाठी कार्यान्वयन यंत्रणा म्हणून कार्य करण्यासाठी व केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार कार्यवाही करण्यासाठी प्राधिकृत करण्यात येत आहे.

राज्य पाणी आणि स्वच्छता मिशन साठी आवश्यक प्रतिनियुक्तीच्या पदांच्या वेतन व अनुषंगिक बाबींचा वार्षिक जल जीवन मिशनच्या मार्गदर्शक सूचनांनुसार राज्य शासनाला करावा लागणार असल्याने प्रतिनियुक्तीच्या पदांच्या वेतन व भत्त्यापोटी येणाऱ्या खर्चाकरिता राज्य हिश्श्याच्या निधीमध्ये आवश्यक ती वार्षिक तरतूद करण्यात येते. तसेच जल जीवन मिशनच्या मार्गदर्शक सूचनांनुसार केंद्र शासनाने सूचविलेल्या मनुष्यबळाव्यतिरिक्त आवश्यकतेप्रमाणे अन्य मनुष्यबळ बाह्य संस्थेद्वारे उपलब्ध संस्थेस करून घेता येईल. केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार, मिशनच्या कालावधीत मिशनसाठी आवश्यक असलेली राज्य/जिल्हा/तालुका स्तरावरील पदे बाह्ययंत्रणेमार्फत भरण्याबाबतचे अधिकार राज्य पाणी व स्वच्छता मिशनच्या शिखर समितीला आहेत. मात्र त्याचा खर्च हा जल जीवन मिशन मधून प्राप्त होणाऱ्या सहाय्यकृत बाबींसाठी असलेल्या प्रमाणाच्या मर्यादेत राहणे आवश्यक आहे.

**६. जिल्हा पाणी पुरवठा मिशन (DWSM) :—**

जिल्ह्यातील जल जीवन मिशनच्या संपूर्ण अंमलबजावणीसाठी जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन जबाबदार असेल. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ च्या कलम ७९ (अ) नुसार प्रत्येक जिल्हा परिषदेमध्ये स्थापन केलेल्या जिल्हा जल व्यवस्थापन व स्वच्छता समितीला जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन म्हणून कार्य करण्यास या विभागाच्या दिनांक ७ सप्टेंबर, २०११ च्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे.

(अ) जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन करिता १ उपमुख्य कार्यकारी अधिकारी, १ लेखाधिकारी, १ कार्यालय अधीक्षक व १ लिपिक याप्रमाणे जिल्हा परिषद स्तरावर प्रत्येकी ४ पदे (एकूण १३६) जल जीवन मिशन कालावधीसाठी कार्यरत आहेत. उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पाणी पुरवठा व स्वच्छता) हे जिल्हा प्रकल्प संचालक म्हणून काम पाहतील. या पदांच्या वेतन/भत्त्यापोटी येणारा वार्षिक खर्च जल जीवन मिशनच्या मार्गदर्शक सूचनांनुसार राज्य शासनाला करावा लागणार असल्याने प्रतिनियुक्तीच्या पदांच्या वेतन व भत्त्यापोटी येणाऱ्या आवश्यक त्या वार्षिक खर्चातून करण्यात येतो.

(ब) त्याचप्रमाणे जिल्हा स्तरावरील व तालुका स्तरावरील सद्यःस्थितीत कार्यरत असलेल्या कार्यकारी अभियंता (ग्रामीण पाणी पुरवठा) आणि उप अभियंता (ग्रामीण पाणी पुरवठा) यांच्या आस्थापनेवरील एकूण अधिकारी/कर्मचारी हे जल जीवन मिशनचा भाग म्हणून काम करतील. वरील अधिकारी/कर्मचाऱ्यांचे वेतन व अनुषंगिक भत्ते सद्यःस्थितीप्रमाणे विभागाच्या आस्थापनेवरच होईल.

**जिल्हा पाणी व स्वच्छता मिशनची नव्याने खालीलप्रमाणे पुनर्रचना करण्यात येत आहे.**

(१) जिल्हाधिकारी ... ... ... ... ... : अध्यक्ष

(२) मुख्य कार्यकारी अधिकारी ... ... ... ... ... : सह अध्यक्ष

(३) जिल्हा आरोग्य अधिकारी ... ... ... ... ... : सदस्य

(४) शिक्षणाधिकारी (प्राथमिक) ... ... ... ... ... : सदस्य

(५) प्रकल्प संचालक, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प ... ... ... : सदस्य

(६) अधीक्षक अभियंता/कार्यकारी अभियंता, जलसंपदा विभाग ... ... ... : सदस्य

(७) अधीक्षक कृषी अधिकारी, कृषी विभाग ... ... ... ... : सदस्य

(८) उप वन संरक्षक ... ... ... ... ... : सदस्य

(९) जिल्हा माहिती अधिकारी ... ... ... ... ... : सदस्य

(१०) कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण ... ... ... ... : सदस्य

(११) वरिष्ठ भूवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा प्रमुख ... ... ... : सदस्य

(१२) उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पाणी व स्वच्छता) तथा प्रकल्प संचालक, जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन कक्ष : सदस्य

(१३) कार्यकारी अभियंता, ग्रा. पा. पु. वि., जिल्हा परिषद... ... ... ... : सदस्य सचिव

**(ब) मा. पालकमंत्री यांच्या स्तरावरील समिती—**

| | | | |
|---|---|---|---|
| (१) | मा. जिल्हा पालकमंत्री ... ... | : | अध्यक्ष |
| (२) | जिल्ह्यातील मा. मंत्री (सर्व) ... ... | : | सदस्य |
| (३) | जिल्हा मा. खासदार ... ... | : | सदस्य |
| (४) | मा. पालकमंत्री यांनी नेमलेले जिल्ह्यातील ३ मा. आमदार | : | सदस्य |
| (५) | मा. जिल्हा परिषद अध्यक्ष ... ... | : | सदस्य |
| (६) | जिल्हाधिकारी ... ... | : | सदस्य |
| (७) | मुख्य कार्यकारी अधिकारी ... ... | : | सदस्य सचिव |

**७. राज्यस्तरीय समिती :—**

जल जीवन मिशनचे जिल्हास्तरीय आराखडे, जिल्हा पाणी व स्वच्छता मिशनच्या मान्यतेनंतर, त्या जिल्ह्याचे मा. पालकमंत्री यांच्या अध्यक्षतेखालील जिल्हास्तरीय समितीसमोर सादर करण्यात येतील. या समितीमध्ये त्या जिल्ह्यांमधील सर्व मंत्री, तसेच मा. पालकमंत्री यांनी नेमलेले ३ आमदार हे सदस्य असतील. या समितीच्या सहमतीनंतर सदर आराखडे हे राज्य स्तरावरील समितीपुढे मान्यतेसाठी ठेवण्यात येतील. राज्यपातळीवर मा. मंत्री (पाणी पुरवठा व स्वच्छता), मा. राज्यमंत्री (पाणी पुरवठा व स्वच्छता), अपर मुख्य सचिव (पाणी पुरवठा व स्वच्छता) व मिशन संचालक, राज्य पाणी व स्वच्छता मिशन यांची समिती (राज्यस्तरीय योजना मंजुरी समितीच्या मान्यतेनंतर) आराखड्यांना अंतिम मान्यता देईल.

**८. ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समिती (VWSC) :—**

ग्राम पंचायत अधिनियम, १९५९ अंतर्गत स्थापित ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समितीचे पदसिद्ध अध्यक्ष सरपंच असून ग्रामसेवक पदसिद्ध सदस्य सचिव आहेत. **ही समिती जल जीवन मिशनच्या मार्गदर्शक सूचनांप्रमाणे कार्यान्वित नळजोडणीद्वारे पाणी पुरवठा करण्यासाठी योजनांचे नियोजन, अंमलबजावणी आणि देखभाल दुरुस्ती करेल. हा या योजनेचा गाभा आहे.** याद्वारे गावातील सदस्यांनी पाणी पुरवठा योजनांच्या देखभाल दुरुस्तीची व ती प्रदिर्घ काळापर्यंत चालू राहील याची जबाबदारी आवश्यक आहे. ग्राम पाणी पुरवठा व्यवस्थापनासाठी ग्रामपंचायत स्तरावर जल जीवन मिशन आणि सार्वजनिक वित्तीय व्यवस्थापन प्रणाली (PFMS) च्या मार्गदर्शक सूचनांनुसार बँक खाते असेल आणि जल जीवन मिशन आणि सार्वजनिक वित्तीय व्यवस्थापन प्रणाली (PFMS) च्या मार्गदर्शक सूचना आणि ग्रामपंचायत लेखा संहितेनुसार त्याचे आर्थिक व्यवहार करण्यात येतील. ही समिती जल जीवन मिशनच्या मार्गदर्शक सूचनांप्रमाणे काम करेल.

**ग्राम पाणी पुरवठा समितीची कर्तव्ये व जबाबदाऱ्या ठळक बाबी पुढीलप्रमाणे आहेत :—**

(१) गावातील सर्व कुटुंबांना घरगुती नळ जोडणी देण्याची संपूर्ण जबाबदारी ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समितीची असेल.

(२) गाव कृती आराखडा तयार करणे, गावातील पाणी पुरवठा योजनांचे नियोजन, रचना, अंमलबजावणी, देखभाल-दुरुस्ती इ. ची जबाबदारी ही ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समितीची असेल.

(३) राज्य पाणी व स्वच्छता मिशकनडून मध्यवर्ती निविदा प्रक्रियेनुसार निवडण्यात आलेल्या संस्थांकडून/पुरवठादारांकडून बांधकाम सेवा/वस्तू/साहित्य प्राप्त करून घेणे व त्या संस्थेकडून योजना राबवून घेणे.

(४) त्रयस्थ संस्थेकडून होणाऱ्या योजनेच्या तपासणी व कार्यक्षमता मूल्यांकनाची व्यवस्था करणे.

(५) योजनांचे सामाजिक लेखापरीक्षण हाती घेणे.

(६) गावातील पाणी पुरवठा योजनेच्या पायाभूत सुविधाच्या भांडवली किंमतीच्या ५ टक्के किंवा १० टक्के लोकवर्गणी (आर्थिक/श्रमदान स्वरूपात) देण्याबाबत गावकऱ्यांना प्रोत्साहीत करणे. पाणीपट्टी आकारणे व वसुली करणे.

वरील ठळक बाबींसह केंद्र शासनाच्या इतर मार्गदर्शक सूचनेप्रमाणे ग्रामीण पाणी पुरवठा व स्वच्छता समिती इतरही कामे करतील.

**९. अंमलबजावणी सहाय्य संस्था (ISA) :—**

गावातील पाणी पुरवठा व स्वच्छता समितीला सहाय्य करण्यासाठी अंमलबजावणी सहाय्य संस्थांची (Inplementation Support Agencies-ISA) महत्वाची भूमिका राहणार आहे. या संस्थेची निवड केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांप्रमाणे राज्य पाणी व स्वच्छता मिशन करेल. ग्रामीण भागात प्रभावीपणे कार्यरत असणाऱ्या ग्रामीण संघटना (VO), महिला बचतगट (SHG), समुदाय आधारित संघटना (CBO), सार्वजनिक विश्वस्त मंडळ (Charitable Trust) किंवा इतर ग्रामीण भागात काम करणाऱ्या पायाभूत संस्था यांना (ISA) अंमलबजावणी सहाय्य संस्था म्हणून निवड करण्यात येईल. राज्य पाणी पुरवठा मिशनचे नियुक्त केलेल्या ISA कडून काम करून घेण्याची जबाबदारी DWSM व SWSM ची आहेत. अंमलबजावणी सहाय्य यंत्रणेच्या (ISA–Implementing Support Agency) सहकार्याने प्रत्येक गावाचा "गाव कृती आराखडा" (VAP) तयार करण्याचे व अंमलबजावणी करण्याचे काम ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समिती करेल.

**१०. आर्थिक बाबी :—**

या मिशनसाठी केंद्र राज्य हिस्सा ५०:५० याप्रमाणे राहणार आहे. अनुसूचित जाती/जमातीच्या लोकसंख्येप्रमाणे निधी राखीव ठेवण्यात येईल. राज्यामध्ये जल जीवन मिशन राबविण्यासाठी खालीलप्रमाणे एकूण रु. १३,६६८.५० कोटी इतका अंदाजित खर्च अपेक्षित आहे. हे अंदाज ढोबळ मानाने काढण्यात आले असून प्रत्यक्ष योजनेवरील खर्च त्या त्या योजनेच्या प्रशासकीय मान्यतेप्रमाणे खर्च करण्यात येईल.

उपरोक्त रकमेपैकी ५० टक्के हिस्सा व त्याचप्रमाणे प्रतिनियुक्तीवरील पदांच्या वेतन व भत्त्यांसाठी आवश्यक निधी राज्य शासनाकडून अर्थसंकल्पित करण्यात येतील. सन २०२४ पर्यंत जल जीवन मिशन अंतर्गत देखील राज्याला ५० टक्के वाटा उपलब्ध करून देणे अनिवार्य आहे. त्यामध्ये अनुसूचित जाती विशेष योजना व आदिवासी उपयोजना याकरिता निधीची तरतूद करण्यात येईल. याबाबतचे प्रस्ताव राज्य पाणी व स्वच्छता मिशन राज्य शासनास विहीत वेळेत सादर करेल.

एकूण निधीपैकी ५ टक्के निधी सहाय्यकृत बाबींसाठी व २ टक्के निधी पाणी गुणवत्ता व सर्वेक्षण कार्यक्रमासाठी पाणी नमुने प्रयोगशाळांमध्ये तपासणे व इतर अनुषंगिक बाबी राखीव असेल. प्रत्येक राज्याने सन २०२४ पर्यंत प्रत्येक वर्षात देण्यात येणाऱ्या नळजोडण्यांची संख्या व त्या अनुषंगाने येणारा खर्च यांची माहिती असणारा राज्य कृती आराखडा तयार करणे आवश्यक आहे.

राज्य पाणी व स्वच्छता मिशनकडून ग्रामपंचायतीला जल जीवन मिशन अंतर्गत आवश्यकतेप्रमाणे निधीची उपलब्धता करता येईल. यासाठी आमदार/खासदार (स्थानिक विकास कार्यक्रम) निधी, सीएसआर किंवा इतर सामाजिक संस्थांमार्फत निधी उपलब्ध करता येईल. पाणी पुरवठा योजनांकरिता खासदार निधीतून प्राप्त रक्कम केंद्र हिस्सा म्हणून तर आमदार निधीतून प्राप्त रक्कम राज्याचा हिस्सा ग्राह्य धरली जाईल.

**११. ग्रामपंचायतींचे १० टक्के सामुदायिक योगदान :—**

गावामध्ये नव्याने जल जीवन मिशन अंतर्गत पाणी पुरवठा योजना सुरू करण्यासाठी किमान ८० टक्के कुटुंबांकडून गावातील पायाभूत सुविधा प्रकल्पाच्या एकूण भांडवली खर्चापैकी १० टक्के (डोंगराळ/वन भागामध्ये किमान ५० टक्के व अनुसूचित जाती/जमाती लोकसंख्या असलेल्या क्षेत्रासाठी किमान ५ टक्के) लोकवर्गणी गोळा होणे अनिवार्य आहे. ही वर्गणी जल जीवन मिशनच्या मार्गदर्शक तत्वानुसार रोख रकमेमध्ये किंवा श्रमदानाद्वारे अदा करता येईल. योजना पूर्ण झाल्यानंतर योजना यशस्वीरित्या चालविणे आणि पाणीपट्टी वसूल करून या योजनेची देखभाल दुरुस्ती योग्य रीतीने करणाऱ्या ग्रामपंचायतीस पुढील ५ वर्षाच्या काळात टप्प्याटप्प्याने, जल जीवन मिशनच्या मार्गदर्शक तत्वानुसार, गावांतर्गत पाणी पुरवठा योजनेच्या पायाभूत प्रकल्पाच्या भांडवली खर्चाच्या १० टक्के रक्कम प्रोत्साहनपर मिळेल.

**१२. आर्थिक नियोजन व निधी व्यवस्थापन :—**

(१) जल जीवन योजना केंद्र व राज्य हिश्श्याने खालीलप्रमाणे राबविण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

(२) जल जीवन मिशन अंतर्गत समावेश घटक व उपघटक आणि त्यांचे निधीचे प्रमाण खालीलप्रमाणे आहे.

| अनु-क्रमांक | घटक | केंद्र : राज्य निधीचे प्रमाण | वापर |
|---|---|---|---|
| (अ) | ● व्याप्ती (Coverage) म्हणजे हर घर नल से जल याबाबत पायाभूत सुविधांसाठी (ग्रामीण कुटुंबांना कार्यरत घरगुती नळजोडणी देण्याच्या दृष्टीने). | ५० : ५० | घरगुती नळजोडणी देण्याच्या दृष्टिने करण्यात येणाऱ्या पाणी पुरवठा योजनांचे बांधकाम. |
| | ● सहाय्यकृत बाबी (Support Activities) | ६० : ४० | माहिती, शिक्षण व संवाद, मनुष्यबळ विकास, प्रशिक्षण व कौशल्य विकास, माहिती केंद्र, त्रयस्थ तपासणी यंत्रणा, संसाधन केंद्र, स्थानिक समुदाय एकत्रिकरण, कार्यशाळा, आढावा बैठक, अभ्यास दौरा, (IMIS) संबंधित सुविधा. |
| | ● पाणी गुणवत्ता संनियंत्रण आणि सर्वेक्षण कार्यक्रम (WQM and S). | ६० : ४० | पाणी नमुने तपासणी, प्रयोगशाळा इत्यादी च्या अनुषंगिक बाबी. |
| (ब) | पाणी गुणवत्ता उपमिशन (NWQSM) | ५० : ५० | फ्लोराईडबाधित गावे/वाड्यांच्या पाणी पुरवठा योजनांचे बांधकाम. |
| (क) | प्रतिनियुक्तीवरील अधिकारी/कर्मचारी यांचे वेतन | ० : १०० | राज्य हिस्सा. |

गावांतर्गत कामांसाठी योजनेसाठी लोकवर्गणी घेण्यात येऊन सदर लोकवर्गणी रोख रक्कम किंवा वस्तू किंवा श्रमदान या स्वरूपात घ्यावयाची आहे. यासाठी ग्रामपंचायत/ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समितीचे अध्यक्ष व सचिव यांनी संयुक्तिकरित्या स्वतंत्र बँक खाते उघडण्यात यावे.

(३) तसेच योजनेसाठी प्राप्त लोकवर्गणी व देखभाल दुरुस्तीसाठी केलेली पाणीपट्टी वसुली याबाबत स्वतंत्रपणे नोंदवही (Ledgers) ठेवण्यात यावी.

(४) योजनेचे व्यवस्थापन संपूर्णपणे सार्वजनिक वित्तीय व्यवस्थापन प्रणालीवर करण्यात येते.

(५) पाणी पुरवठा योजना पूर्ण झाल्यानंतर व परीक्षण पूर्ण झाल्यावर खर्चाचे वित्तीय लेखापरीक्षण करून योजना ग्रामपंचायतीस हस्तांतरण करण्यात येते.

(६) ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समिती कार्यान्वित नळजोडणीद्वारे पाणी पुरवठा करण्यासाठी योजनांचे नियोजन, अंमलबजावणी आणि देखभाल दुरुस्ती करेल. हा या योजनेचा गाभा आहे. याद्वारे गावातील सदस्यांनी पाणी पुरवठा योजनांच्या देखभाल दुरुस्तीची व ती प्रदिर्घ काळापर्यंत चालू राहील याची जबाबदारी घेणे आवश्यक आहे.

# ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रम

## १. फ्लॅगशिप योजना :—

फ्लॅगशिप योजना ही केंद्र शासनामार्फत राबविण्यात येत असून त्या अंतर्गत महाराष्ट्र राज्याच्या १६ योजनांचा समावेश करण्यात आलेला आहे. त्यामध्ये या विभागाच्या खालील **दोन योजनांचा** समावेश आहे.

१.१ **राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम** : सन २००९-२०१० पासून केंद्र शासन पुरस्कृत सुरु असलेला ''**राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम"** जल जीवन मिशनमध्ये समाविष्ट करून, पुनर्रचना करण्याचे केंद्र शासनाने ठरविले आहे. यानुसार ग्रामीण भागातील सर्व कुटुंबांना सन २०२४ पर्यंत "हर घर जल" (FHTC – Functional Household Tap Connection) प्रमाणे पाणी पुरवठा करण्यास शासन कटिबद्ध आहे. सन २०२४ पर्यंत राज्यातील ग्रामीण भागातील प्रत्येक घरात वैयक्तिक नळ जोडणीद्वारे दरडोई किमान ५५ लिटर प्रती दिन, गुणवत्तापूर्ण पाणी पुरवठा करणे हे जल जीवन मिशनचे प्रमुख उद्दिष्ट आहे.

या अंतर्गत प्रत्येक व्यक्तीस, स्वयंपाकासाठी आणि घरगुती वापरासाठी शुध्द व पुरेसा आणि शाश्वत पाणी पुरवठा सर्वकाळ आणि सर्व परिस्थितीत सोयीच्या ठिकाणी उपलब्ध करून देणे हे उद्दिष्ट आहे. या फक्त योजना पूर्ण करणे एवढाच उद्देश नसून कार्यक्षम पाणी पुरवठ्याची एक शाश्वत सेवा उपलब्ध करणे हा त्यामधील प्रमुख गाभा आहे. केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार जल जीवन मिशनची राज्यात अंमलबजावणी करणे आणि मिशन अधिकाधिक परिणामकारक होण्याकरिता सध्या अस्तित्वातील अंमलबजावणीसाठीच्या प्रचलित कार्यपध्दती व निकषांमध्ये सुधारणा करण्याबाबत शासन निर्णय क्र. जजीमि २०१९/प्र.क्र. १३८/पापु-१० (०७), दिनांक ४ सप्टेंबर २०२० अन्वये निर्णय घेण्यात आला आहे. विहित कालावधीत उद्दिष्टपूर्ती करण्याचे लक्ष्य असल्याने यासाठी मजबूत चार स्तरीय संस्थात्मक संरचना तयार करण्यात आली आहे, ती अशी—

(१) राष्ट्रीय स्तरावर "राष्टीय जल जीवन मिशन" (NJJM)

(२) राज्य स्तरावर राज्य पाणी व स्वच्छता मिशन (SWSM)

(३) जिल्हा स्तरावर जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन (DWSM)

(४) ग्राम पातळीवर ग्रामीण पाणी पुरवठा व स्वच्छता समिती (VWSC)

१.२ **स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण)** :

केंद्र शासनाच्या मार्गदर्शक तत्वानुसार केंद्र पुरस्कृत ग्रामीण स्वच्छता कार्यक्रम सन २०००-२००१ पासून राबविण्याचा राज्य शासनाने निर्णय घेतला आहे. दिनांक १ एप्रिल २०१२ पासून या कार्यक्रमाचे निर्मल भारत मिशन (ग्रामीण) व त्यानंतर दिनांक २ ऑक्टोबर २०१४ पासून स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) असे पुनर्नामांकन करण्यात आले आहे. दिनांक १८ एप्रिल २०१८ रोजी राज्यातील सर्व ३४ जिल्हे, ३५१ पंचायत समित्या व २७,६६७ ग्रामपंचायती हगणदारी मुक्त झाल्याबाबत घोषणा करण्यात आली आहे. केंद्र शासनाने जुलै २०२० मध्ये स्वच्छ भारत मिशन टप्पा -२ च्या (सन २०२०-२०२१ ते २०२४-२०२५) मार्गदर्शक सूचना निर्गमित केल्या आहेत. त्यानुसार संपूर्ण ग्रामीण स्वच्छता व शाश्वत स्वच्छता टिकविण्याच्या अनुषंगाने स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) दुसऱ्या टप्प्यांतर्गत ग्रामीण भागातील घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापनेचे नियोजन करण्यात येत आहे.

## २. ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमाचे स्वरूप :—

२.१ राज्यात एकूण १००४८८ गावे/वाड्या आहेत. सन २०११ च्या जनगणनेनुसार राज्यातील एकूण ११.२३ कोटी लोकसंख्येपैकी ग्रामीण लोकसंख्या ६.६१४ कोटी म्हणजेच ५५ टक्के आहे. राज्याचा १/३ भाग पर्जन्यछायेत येतो. परंतु याच भागात जास्त पाणी लागणारी पिके घेतली जातात. कोकण प्रदेश हा अति पावसाचा प्रदेश आहे. परंतु उतार व सच्छिद्र खडकामुळे पाण्याची साठवणूक होऊ शकत नाही. तसेच या भागात भरपूर व उथळ भूगर्भ साठे आहेत. सदर भाग नैसर्गिक, रासायनिक प्रदूषणग्रस्त आहे.

२.२ पाणी ही मूलभूत गरज असल्याने, केंद्र शासनाने व राज्य शासनाने ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमास प्रथम प्राधान्य दिलेले आहे.

२.३ साध्या विहिरी, विंधण विहिरी, लघु पाणी पुरवठा योजना, नळ पाणी पुरवठा योजना, अशा उपाययोजनांद्वारे ग्रामीण भागात पिण्याचे पाणी उपलब्ध करण्यात आले आहे. तथापि, प्रत्येक गावात पाणी पुरवठा योजना असूनही वाढती लोकसंख्या, प्रत्येक वर्षी पडणारा अपुरा पाऊस, शेतीसाठी भूगर्भातील व भूपृष्ठावरील पाण्याचा अनिर्बंध वापर, तसेच पिण्याच्या पाण्याचे स्त्रोत अनेक कारणांमुळे दूषित होवू लागल्याने, पिण्याच्या पाण्याच्या उपलब्धतेत घट झाली. यामुळे, पिण्यासाठी पुरेसे पाणी पुरविण्याबरोबरच ते शुध्द स्वरूपात पुरविण्यालाही प्राधान्य देण्यात आले आहे. पावसाळ्यानंतर पिण्याच्या पाण्याची टंचाई भासणाऱ्या गावांना पाणी पुरवठा करण्यासाठी विशेष उपाययोजना घेण्यात येतात. त्याचप्रमाणे दुषित पाणी पुरवठा असलेल्या भागाला शुद्ध पाणी पुरवठा करण्यासाठी उपाययोजना करण्यात येतात.

२.४ सुधारित धोरणानुसार आता हा कार्यक्रम मागणी आधारित व समूहसहभाग या तत्वानुसार राबविण्यात येत आहे. ग्रामीण भागातील जनतेला दरडोई दरदिवशी ४० लिटर या प्रमाणात शुद्ध स्वरुपात पिण्याचे पाणी या कार्यक्रमाद्वारे उपलब्ध केले जाते. नवीन पाणी पुरवठा योजना घेताना त्यामध्ये १०० टक्के घरगुती नळ जोडण्यांचा समावेश अनिवार्य करण्यात आला आहे.

२.५ राज्यामध्ये ग्रामीण पाणी पुरवठा योजनांच्या प्रभावी कार्यान्वयनासाठी राज्यातील सर्व प्रादेशिक व स्वतंत्र ग्रामीण पाणी पुरवठा योजनांद्वारे पुरविण्यात येणाऱ्या पाण्याचे वापरानुसार मोल अदा करण्याची संकल्पना प्रत्यक्षात आणण्यासाठी सर्व घरगुती व बिगर घरगुती नळ जोडणी धारकांसाठी मीटर पद्धती लागू करण्यात आली आहे.

**३. ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमाचे धोरण :—**

३.१ राज्य शासनाने ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमासंबंधात सन २०००–२००१ पासून सुधारित धोरण राबविण्यास सुरुवात केली. त्यापूर्वी पुरवठा आधारित धोरणात कार्यक्रम लोकाभिमुख नव्हता. त्यामुळे कार्यक्रम अपेक्षेप्रमाणे यशस्वी होऊ शकला नाही. मागील धोरणातील त्रुटी विचारात घेऊन त्यात आवश्यक सुधारणा करून केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार सुधारित धोरण आता राज्यात राबविले जात आहे.

३.२ सुधारित धोरणानुसार हा कार्यक्रम मागणी आधारित व समूह सहभाग या तत्वानुसार राबविला जात आहे. या धोरणानुसार योजना निश्चितीपासून ते योजनेच्या अंमलबजावणीच्या प्रत्येक टप्प्यात व व्यवस्थापनात लोकांचा सक्रीय सहभाग ग्रामसभेद्वारे अनिवार्य केला असून योजनेच्या भांडवली खर्चाचा १० टक्के भाग लाभार्थ्यांची लोकवर्गणी म्हणून खर्च होते. परंतु, ग्रामीण पाणी पुरवठा योजनांची किंमत पाहता, योजनेची लोकवर्गणी भरणे ग्रामस्थांना/स्थानिक स्वराज्य संस्थांना अवघड होऊ लागले आहे. ग्रामीण पाणी पुरवठा योजनांसाठी आकारली जाणारी लोकवर्गणी जमा करण्यामध्ये खूप अडचणी येत असल्याचे शासनाचे निदर्शनास आले. राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत महाराष्ट्र राज्याकरीता मंजूर निधी व गत काही वर्षातील मंजूर ग्रामीण पाणी पुरवठा योजनांचा आढावा घेण्यात आला असता असे निदर्शनास आले आहे की, गत तीन वर्षापेक्षा अधिक कालावधीतील रखडलेल्या योजनांपैकी बहुतांश योजना लोकवर्गणी अभावी व लोकवर्गणीशी निगडीत असलेल्या ग्रामीण पाणी पुरवठा व स्वच्छता समितीच्या प्रश्नांमुळे रखडलेल्या आहेत. लोकवर्गणीच्या अटीमुळे योजना राबविण्यास विलंब होत असून केंद्र शासनाकडून प्राप्त होणारा निधी पर्याप्त प्रमाणात खर्च होवू शकत नाही. त्यामुळे केंद्र व राज्य शासनाचा प्राप्त झालेला निधी मोठ्या प्रमाणावर अखर्चित राहत आहे. या बाबींचा विचार करून मंत्रीमंडळाच्या मान्यतेने दि. ९ जुलै, २०१४ रोजीच्या शासन निर्णयान्वये ग्रामीण पाणी पुरवठा योजनांसाठी आकारण्यात येत असलेली लोकवर्गणी पुर्णतः रद्द करण्यात आली आहे. तथापि, यापूर्वी ज्या ग्रामीण पाणी पुरवठा योजनांकरीता पूर्णतः अथवा अंशतः लोकवर्गणीची रक्कम जमा केलेली असेल अशी लोकवर्गणीची रक्कम संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेस अथवा अंमलबजावणी यंत्रणेस परत केली जाणार नाही व अशा पाणी पुरवठा योजनांमधील उर्वरित लोकवर्गणीची रक्कम योजनांच्या किंमतीमध्ये समाविष्ट करण्यात येईल, अशी तरतूद शासन निर्णयात करण्यात आलेली आहे.

३.३ **पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाच्या, शासन निर्णय क्रमांक जजीमि-२०१९/प्र.क्र. १३८/पापु-१०(०७), दिनांक ४ सप्टेंबर, २०२० अन्वये जल जीवन मिशन अभियानांतर्गत निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचनांमधील प्रमुख तरतुदी पुढीलप्रमाणे आहेत :-**

३.३.१ ज्या योजना राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम (NRDWP) अंतर्गत सुरु आहेत, अशा योजनांची सुधारणात्मक पुनर्जोडणी (Retrofitting) किमान ५५ LPCD प्रमाणे करून कार्यात्मक घरगुती नळ जोडणी करणे, तसेच ज्या गावांमध्ये स्टँड पोस्ट नळ पाणी पुरवठा योजना आहेत, अशा गावांमध्ये स्टँड पोस्टपासून प्रत्येक कुटुंबापर्यंत/घरापर्यंत घरगुती कार्यात्मक घरगुती नळ जोडणी देण्यासाठी पूर्वीच्या योजनांची सुधारणात्मक पुनर्जोडणी (Retrofitting) करणे.

३.३.२ पूर्ण झालेल्या योजनांच्या बाबतीत ४० LPCD ऐवजी किमान ५५ LPCD पाणी पुरवठा करण्याच्या अनुषंगाने अशा योजनांची सुधारणात्मक पुनर्जोडणी (Retrofitting) करणे.

३.३.३ ज्या गावांमध्ये पिण्यायोग्य मुबलक भूजल (किंवा अन्य पर्यायाद्वारे) उपलब्ध आहे, अशा गावांमध्ये स्वतंत्र योजना घेणे.

३.३.४ ज्या गावांमध्ये मुबलक भूजल (किंवा अन्य पर्यायाद्वारे) पाणीसाठा उपलब्ध आहे, मात्र पाण्याची गुणवत्ता योग्य नाही, अशा गावांमध्ये जल शुध्दीकरणाच्या प्रकल्पासह स्वतंत्र योजना घेणे.

३.३.५ ज्या गावांमध्ये पाण्याचे प्रमाण कमी आहे, अशा गावांसाठी प्रादेशिक/अनेक गाव योजना (Water Grid) घेणे.

३.३.६ आदिवासी भागात नळ पाणी पुरवठा सोय नसलेल्या आदिवासी गावे/वाड्या/पाडे यांना कायमस्वरूपी पाणी पुरवठा करून प्रत्येक घरात कार्यात्मक नळजोडणीद्वारे पाणी पुरवठा करणे, जल जीवन मिशनच्या मार्गदर्शक सूचनांनुसार शासकीय आश्रमशाळा, अनुदानित आश्रमशाळा, शासकीय वसतिगृहे, अंगणवाडी इत्यादी करिता सदर योजनेतून नळ जोडणी देणे. तसेच एकाकी/आदिवासी वाडी/पाड्यांकरिता सौर ऊर्जा आधारित नळ पाणी पुरवठा योजना राबविणे.

३.३.७ दलित वस्तीमधील सर्व घरांना कार्यात्मक नळ जोडणीद्वारे पाणी पुरवठा देणे व योजनेच्या लाभार्थ्यांची स्वतंत्र माहिती ठेवणे.

३.४ **ग्रामीण पाणी पुरवठा योजनांचा वार्षिक कृती आराखडा तयार करताना खालीलप्रमाणे गावांना प्राधान्य देण्यात येते.**

३.४.१ योजना मंजूर करताना मागील तीन वर्षात टँकर्सद्वारे पाणी पुरवठा केलेल्या गावांना प्राधान्य देणे.

३.४.२ १०० टक्के हागणदारी मुक्त झालेली गावे.

३.४.३ ४० लिटर प्रती दिन पेक्षा कमी पाणी पुरवठा होत असलेली गावे.

३.४.४ १० लिटर प्रती दिन पेक्षा कमी पाणी पुरवठा होत असलेल्या गावांना कृती आराखड्यात सर्वोच्च प्राधान्य देणे.

३.४.५ ज्या गावांमध्ये पाणी पुरवठा योजना नाहीत अशा गावांचा कृती आराखड्यात समावेश करणे.

३.४.६ अस्तित्वातील पाणी पुरवठा योजना वाढत्या लोकसंख्येमुळे अपुरी पडत असलेली गावे.

३.४.७ ज्या गावांमधील अस्तित्वातील पाणी पुरवठा योजना कालबाह्य झालेल्या आहेत, अशा गावांचा कृती आराखड्यात समावेश करणे.

३.५ **महाराष्ट्र राज्यात राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमाची अंमलबजावणी करतांना राज्य शासनामार्फत घेण्यात आलेल्या काही महत्वाच्या धोरणात्मक निर्णयांची तपशीलवार माहिती खालीलप्रमाणे आहे :–**

३.५.१ **ग्रामीण पाणी पुरवठा योजनांच्या दरडोई खर्चाच्या निकषात वाढ :—**

शासन निर्णय क्रमांक : ग्रापाधो-२०१८/प्र.क्र.१८१/पापु-०७, दि. २९/०६/२०२२ अन्वये, ग्रामीण पाणी पुरवठा योजनांच्या दरडोई खर्चाच्या निकषात सुधारणा करून खालीलप्रमाणे दरडोई खर्चाच्या दरास मान्यता देत आहे–

| अनुक्रमांक | योजनेचा प्रकार | | दरडोई खर्च GST वगळून |
|---|---|---|---|
| १. | प्रादेशिक पाणी पुरवठा योजना (MVS)-ज्यामध्ये भूपृष्ठावरील (Surface water) पाण्यावर प्रक्रिया करुन शुद्ध पाणी पुरवठा करणे प्रस्तावित आहे. | ... | रु. ८१११ |
| २. | स्वतंत्र पाणी पुरवठा योजना(SVS)-ज्यामध्ये भूपृष्ठावरील (Surface water) पाण्यावर प्रक्रिया करुन शुद्ध पाणी पुरवठा करणे प्रस्तावित आहे. | ... | रु. ५८२१ |
| ३. | स्वतंत्र पाणी पुरवठा योजना(SVS)-भूजल (Ground water) वर पाणी पुरवठा करणे प्रस्तावित आहे. | ... | रु. ४३९० |

(SVS : Single Village Scheme. MVS : Multi Village Scheme)

२ ग्रामीण पाणी पुरवठा योजनांसाठी वरीलप्रमाणे दरडोई खर्चाचे निकष सुधारित करण्यात येत असल्याने शासन निर्णय क्र. ग्रापाधो-१२०८/प्र.क्र. ५२/पापु-०७, दिनांक ०९-१०-२०१३ व शासन शुद्धीपत्रक क्र. ग्रापाधो-१११४/प्र.क्र. ८१/पापु-०७, दिनांक २७-०३-२०१५ या शासन निर्णयान्वये अधिक्रमित करण्यात येत आहे.

३. दरडोई खर्चाच्या निकषात बसणाऱ्या ग्रामीण पाणी पुरवठा योजनांना पूर्वीप्रमाणेच या शासन निर्णय क्र. जजीमि-२०१९/प्र.क्र. १३८ (भाग-२)/पापु-१०, दिनांक १०-०३-२०२१ व शासन निर्णय क्र. जजीमि-२०१९/प्र. क्र. १३८/पापु-१०, दिनांक २५-०२-२०२२ अन्वये निश्चित केलेल्या सक्षम प्राधिकाऱ्यांमार्फत प्रशासकीय मान्यता देण्यात येईल.

४. प्रस्तूत शासन निर्णयात नमूद विहित दरडोई खर्चाच्या निकषात न बसणाऱ्या ग्रामीण पाणी पुरवठा योजनांतील दरडोई खर्चास खालील यंत्रणामार्फत मान्यता देण्याचे अधिकार राहतील—

(अ) वर नमूद करण्यात आलेल्या दरडोई खर्चाच्या निकषात न बसणाऱ्या परंतू रु. २५.०० लक्ष पर्यंतच्या अंदाजपत्रकीय किंमतीच्या योजनेतील दरडोई खर्चास जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन यांच्यामार्फत मान्यता देण्यात येईल.

(ब) उपरोक्त "अ" येथे नमूद करण्यात आलेली मान्यता वगळता दरडोई खर्चाच्या निकषात न बसणाऱ्या उर्वरित सर्व योजनांच्या अंदाजपत्रकीय किंमतीच्या दरडोई खर्चास ग्रापाधो-१११३/प्र.क्र. १६७/पापु-०७, दिनांक ०१-०८-२०१४ रोजीच्या शासन निर्णयान्वये करण्यात आलेल्या उच्चाधिकार समितीमार्फत मान्यता देण्यात येईल.

५. ज्या ग्रामीण पाणी पुरवठा योजनांच्या उद्भवाचे अंतर गावाजवळील प्रथम मुख्य साठवण टाकीपासून ३ कि. मी. पेक्षा जास्त असेल किंवा १०० मीटरपेक्षा जास्त उंचीवर पाणी न्यावे लागत असेल, अशा योजनांमधील ३ कि. मी. पासून पुढे किंवा १०० मीटर उंचीच्या वर पाणी नेण्यासाठी लागणारी पाईपलाईन, ब्रेक प्रेशर टँक व पंपिंग मशिनरी यांच्या वाढीव कामाचा खर्च दरडोई खर्च ठरवितांना विचारात घेण्यात येऊ नये.

६. बॅलंसिंग टँक, के. टी. विअर बंधारा, घरगुती नळ जोडणी, एक्सप्रेस फिडर, सोलर सिस्टिम स्वयंचलित यंत्रणा (Automation) या उपांगांचा खर्च दरडोई खर्चाची परिगणना करताना विचारात घेण्यात येऊ नये.

७. प्रगतीपथावरील किंवा अस्तित्वातील योजना Retrofit करतांना अनेक प्रकारची वेगवेगळी उपांगे प्रस्तावात येऊ शकतात, त्यामुळे त्यांचे मोजमाप व त्याबाबत मापदंड ठेवणे योग्य नसल्याने Retrofitting अंतर्गत प्रस्तावित योजनांबाबत दरडोई खर्च विचारात घेण्यात येऊ नये.

३.६ **ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमांतर्गत सर्व धोरणात्मक बाबीसंदर्भात एप्रिल २०२० ते आजतागायत घेण्यात आलेल्या शासन निर्णय/परिपत्रकाची माहिती खालीलप्रमाणे आहे.–**

(१) **शासन निर्णय क्रमांक ग्रापाधो-२०१९/प्र.क्र. १३८/पापु-०७, दिनांक ४-९-२०२०** नुसार केंद्र शासनाच्या कार्यरत मार्गदर्शक सूचनांनुसार जल जीवन मिशनची राज्यात अंमलबजावणी करण्यात आली असून जल जीवन मिशन अधिकाधिक परिणामकारक होण्याकरिता प्रचलित कार्यपध्दती व निकषांमध्ये सुधारणा करण्यात आली आहे.

(२) **शासन निर्णय क्रमांक ग्रापाधो-१११४/प्र.क्र. ५२/पापु-०७, दिनांक १७-१०-२०१४** नुसार ग्रामीण पाणी पुरवठा योजनांच्या देखभाल-दुरूस्तीची मुख्य जबाबदारी अंमलबजावणी यंत्रणांची पाणी पुरवठा व स्वच्छता समित्यांची असल्याने या यंत्रणा/समित्या त्यांची देखभाल-दुरूस्तीची प्रक्रिया राबविण्यासाठी मार्गदर्शक सूचना देण्यात आल्या आहेत.

(३) **शासन निर्णय क्रमांक ग्रापाधो-२०२१/प्र.क्र. १७/पापु-०७, दिनांक २०-५-२०२१** नुसार जल जीवन मिशन अंतर्गत शाश्वत कार्यात्मक नळ जोडणी देण्यासाठी पाण्याचा ताण असलेल्या कालावधीत कॅच द रेन या तत्वावर पिण्याचे पाणी उपलब्ध करून देण्याकरिता राज्यभरात स्व. मीनाताई ठाकरे ग्रामीण पाणी साठवण योजना राबविण्यास शासन मान्यता देण्यात आली आहे. तसेच सदर योजनेअंतर्गत मेटॅलीक पध्दतीच्या साठवण टाक्या, फॅरोसिमेंट अथवा आरसीसी साठवण टाक्या तसेच जलकुंभ/साठवण टाक्या या उपाययोजना राबविण्याबाबत मार्गदर्शक सूचना देण्यात आल्या आहेत. तद्नंतर समक्रमांकाच्या, दिनांक २०-८-२०२१ च्या शासन निर्णयान्वये पावसाचे पाणी/झरा आधारित साठवण तलाव (पाणी तळे), फेरोसिमेंटच्या छोट्या टाक्या (पागोळी विहिर) व बंद असलेली भूमिगत साठवण टाकी या उपाययोजना राबविण्याबाबत मार्गदर्शक सूचना देण्यात आल्या आहेत.

(४) **शासन निर्णय क्रमांक ग्रापाधो-२०२१/प्र.क्र. ५२/पापु-०७, दिनांक २३-६-२०२१** नुसार राज्याच्या पर्यटन धोरणानुसार केंद्र शासनाकडील पर्यटन मंत्रालयाकडे अथवा पर्यटन संचालनालयाकडे नोंदणीकृत असलेल्या हॉटेल व्यावसायिकांकडून औद्योगिक दराने पाणीपट्टी आकारण्याबाबत सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत.

(५) **शासन निर्णय क्रमांक जजीमि-२०१९/प्र.क्र. ८१/पापु-०७, दिनांक १५-२-२०२१** नुसार राज्यात "वस्तू व सेवा कर" प्रणाली लागू करण्यात आल्यानंतर पाणी पुरवठा योजनांमधील कंत्राटामधील कराच्या भारामध्ये वृध्दी वा घट होत असल्याने कंत्राटाच्या किंमतीत देखील वृध्दी वा घट होऊ शकते. या बाबी विचारात घेऊन, वस्तु व सेवा कराच्या अंमलबजावणीमुळे ग्रामीण पाणी पुरवठा योजनांच्या चालू व नवीन कामांच्या कंत्राटांबाबत मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत.

(६) **शासन निर्णय क्रमांक जजीमि-०६२०/प्र.क्र. २०/पापु-०७, दिनांक ३०-६-२०२१** नुसार जल जीवन मिशन अंतर्गत पूर्ण झालेल्या ग्रामीण पाणी पुरवठा योजनांच्या सुधारणात्मक पुनर्जोडणी (रेट्रोफिटिंग) संदर्भात मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत.

(७) **शासन निर्णय क्रमांक जजीमि-२०१८/प्र.क्र. १८१/पापु-०७, दिनांक २९-६-२०२२** नुसार केंद्र शासन पुरस्कृत "जल जीवन मिशन" या कार्यक्रमामध्ये समाविष्ट केला आहे. केंद्र शासनाच्या जल जीवन मिशननुसार प्रत्येक घरात वैयक्तिक नळ जोडणीद्वारे दरडोई किमान ५५ लीटर क्षमतेने गुणवत्तापूर्ण पाणी पुरवठा करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. त्यानुसार ग्रामीण पाणी पुरवठा योजनांच्या वर्गवारीत बदल देखील करण्यात आला आहे. ग्रामीण पाणी पुरवठा योजनांच्या दरडोई खर्चाच्या निकषात सुधारणा करण्याबाबत मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत.

(८) **शासन निर्णय क्रमांक ग्रापाधो-२०२१/प्र.क्र. १२२/पापु-०७, दिनांक २९-६-२०२२** नुसार पाणी पुरवठा व स्वच्छता योजनांच्या बाबनिहाय दरसूचीमध्ये होणाऱ्या बदलांच्या अनुषंगाने सदर धोरण पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग व नगर विकास विभागाअंतर्गत अमृत व नगरोत्थान कार्यक्रमांतर्गतच्या योजनांसाठी असलेल्या निविदांसाठी भावभिन्नता कलमाचा (Price Variation Clause) समावेश करणे व सद्याच्या अप्रत्याशित/असाधारण भाववाढीसाठी विशेष मदत (Special Relief) देण्याबाबत मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत.

(९) **शासन निर्णय क्रमांक ग्रापाधो-२०२२/प्र.क्र. ३७/पापु-०७, दिनांक १४-७-२०२२** नुसार पाणी पुरवठा व स्वच्छता विभागांतर्गत राबविण्यात येणाऱ्या जलस्वराज्य प्रकल्प, मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रम यासोबतच जल जीवन मिशन या कार्यक्रमांतर्गत राबविण्यात येणाऱ्या पाणी पुरवठा योजनांकरिता ही जलसंपदा विभागाच्या अखत्यारितील पाणी आरक्षणाच्या पूर्वमंजुरीची आवश्यकता राहणार नाही याबाबत मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत.

(१०) **शासन परिपत्रक क्रमांक ग्रापाधो-२०१९/प्र.क्र. ८१/पापु-०७, दिनांक २०-१०-२०२२** नुसार ग्रामीण पाणी पुरवठा योजनांच्या कंत्राटामधील वस्तू व सेवा कर १८ टक्के लागू करण्यात आला आहे.

**४. जल जीवन मिशन कार्यक्रमाची अंमलबजावणी- :—**

(१) पाणी पुरवठा योजनांच्या विशिष्ट उपांगाचे (पाण्याची टाकी, पंप हाऊस इ.) संभाव्य संकल्प चित्र आराखडे व त्यांची अंदाजपत्रके (भौगोलिक क्षेत्र आणि तेथील भौगोलिक परिस्थितीनुसार) राज्य पाणी व स्वच्छता मिशनकडून तयार करून उपलब्ध करून देण्यात येतील. त्याप्रमाणे सर्व यंत्रणांनी या आराखड्यानुसार पुढील कार्यवाही करावी.

(२) पाणी पुरवठा योजनेसाठी लागणाऱ्या दर्जेदार (भारतीय मानांकनाप्रमाणे) बांधकाम व अभियांत्रिकी साहित्य/यंत्रसामुग्रीचा (पाईप, विद्युत पंप, वॉल्व्हस्, सिमेंट स्टील वगैरे) आवश्यकतेप्रमाणे दरकरार करणे/एजन्सी नेमणे इ. कार्यवाही राज्य पाणी व स्वच्छता मिशनद्वारे करण्यात येईल. या दरपत्रकावर आधारित अंदाजपत्रके व आराखडे सर्व यंत्रणांनी करावेत.

(३) राज्य पाणी व स्वच्छता मिशनच्या कार्यकारी समितीमार्फत पाणी पुरवठा योजनांच्या जलद अंमलबजावणीसाठी मध्यवर्ती निविदा प्रक्रियेद्वारे नामांकित बांधकाम संस्था व पुरवठादार यांचे जिल्ह्यांसाठी पॅनेल तयार करण्यात येईल. जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन या पॅनेलमधून पाणी पुरवठा योजना करण्यासाठी एका योजनेकरिता एका संस्थेची निवड करेल. मात्र ग्राम पातळीवरील योजनांसाठी अशी निवड करतांना जिल्हा समिती, ग्राम पाणी समितीला विश्वासात घेऊन/विचारविनिमय करून अंमलबजावणी संस्थेची निवड करेल.

(४) जिल्ह्यातील पाणी पुरवठा योजनांसाठी प्रशासकीय मान्यता देण्यासंदर्भात राज्य पाणी व स्वच्छता मिशनकडून जिल्हा पाणी व स्वच्छता मिशनला वित्तीय मर्यादेचे अधिकार प्रदान केले जातील.

(५) पाणी पुरवठा योजनेच्या अंमलबजावणी दरम्यान आणि अंतिम देयक अदायगी करण्यापूर्वी जल जीवन मिशनच्या मार्गदर्शक सूचनांप्रमाणे त्रयस्थ संस्थेमार्फत तपासणी करण्यात येईल. राज्य पाणी व स्वच्छता मिशनच्या कार्यकारी समितीमार्फत नेमलेल्या त्रयस्थ तपासणी संस्थांचे पॅनेल मधील संस्थांमार्फत जिल्हा पाणी व स्वच्छता मिशनकडून या गावांच्या योजनांची त्रयस्थ तपासणी करण्यात येईल.

(६) स्वतंत्र योजनेसाठी जास्तीत जास्त १८ महिन्यांचा व अनेक गाव योजनांसाठी ३६ महिन्यांचा कालावधी अनुज्ञेय राहील. ज्या योजना पूर्ण करण्यास ३ वर्षाचा कालावधी लागणार आहे, अशा योजनांचे कार्यादेश/कार्यारंभ आदेश/करार (Contract) अंमलबजावणीकरिता मार्च, २०२२ पूर्वी देण्यात यावेत, यानुसार गाव कृती आराखडा (VAP) व जिल्हा कृती आराखडा (DAP) तयार करण्यात यावा.

**५. मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रम (MRDWP) :—**

❖ राज्यातील ग्रामीण भागातील पाणी पुरवठा क्षेत्रात सुधारणा करण्याच्या उद्देशाने व ग्रामीण जनतेस शुध्द आणि पुरेसे पिण्याचे पाणी उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने राज्य शासनाने, दिनांक ७ मे, २०१६ रोजीच्या शासन निर्णयान्वये स्वतःचा सर्वसमावेशक असा "मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रम" राबविण्याचा निर्णय घेतला आहे.

❖ सन २०१६-२०१७ ते २०१९-२०२० या चार वर्षांच्या कालावधीत सदर कार्यक्रमाच्या अंमलबजावणीकरिता राज्य शासनामार्फत रु. २५३०.८६ कोटी इतका निधी उपलब्ध करून देण्याचे प्रस्तावित होते. सदर कार्यक्रमाचे प्रामुख्याने खालील तीन घटकात वर्गीकरण करण्यात आले आहे.

१. MRDWP अंतर्गत घ्यावयाच्या नवीन योजना

२. बंद असलेल्या प्रादेशिक पाणी पुरवठा योजनांचे पुनरुज्जीवन

३. प्रादेशिक ग्रामीण पाणीपुरवठा योजनांना देखभाल दुरुस्ती प्रोत्साहन अनुदान.

❖ सदर कार्यक्रमाचा कालावधी, दिनांक ३१ मार्च, २०२० रोजी संपुष्टात आल्याने विभागाच्या दिनांक ३१ ऑगस्ट, २०२० रोजीच्या शासन निर्णयान्वये (मा. मंत्रीमंडळाच्या दिनांक ८ जुलै, २०२० रोजीच्या बैठकीत घेण्यात आलेल्या निर्णयानुसार) मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत मंजुरी देण्यात आलेल्या प्रगतीपथावरील/अपूर्ण पाणी पुरवठा योजनांची कामे पूर्ण करण्याकरिता प्रस्तुत योजनेस दोन वर्ष (सन २०२१-२०२२ पर्यंत) मुदतवाढ देण्यात आली होती. तसेच यासाठी रु. ४३०.०० कोटी इतका निधी उपलब्ध करून देण्यास मान्यता देण्यात आली होती.

❖ सदर कार्यक्रमाचा कालावधी दि. ३१-०३-२०२२ रोजी संपुष्टात आल्याने विभागाच्या दि. २९-०६-२०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये (मा. मंत्रीमंडळाच्या दिनांक ०६ जून, २०२२ रोजीच्या बैठकीत घेण्यात आलेल्या निर्णयानुसार) मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत मंजुरी देण्यात आलेल्या प्रगतीपथावरील/अपूर्ण पाणी पुरवठा योजनांची कामे पूर्ण करण्याकरिता प्रस्तुत योजनेस एक वर्षे (सन २०२२-२३ पर्यंत) मुदतवाढ देण्यात आली आहे. तसेच यासाठी रु. २१५.६७ कोटी इतका निधी उपलब्ध करून देण्यास मान्यता देण्यात आली आहे.

**१. मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत हाती घ्यावयाच्या नवीन योजना :—**

➢ मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत एकूण १००३ नवीन पाणी पुरवठा योजना राबविण्याचे व याकरिता चार वर्षाच्या कालावधीत रु. २००० कोटी इतका निधी उपलब्ध करून देण्याचे प्रस्तावित होते. या अंतर्गत सद्यःस्थितीत मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत मंजूर योजनांची संख्या ७४३ इतकी असून किंमत रु. ६०२.०७ कोटी इतकी आहे.

➢ मंजुरी देण्यात आलेल्या ७४३ पाणी पुरवठा योजनांपैकी ७२२ योजनांची कामे प्रगतीपथावर असून त्यापैकी ५३६ योजनांतून पाणी पुरवठा सुरु करण्यात आलेला आहे. उर्वरित १८६ योजनांतून मार्च-२०२३ पर्यंत पाणी पुरवठा सुरु करण्याचे नियोजन आहे.

**२. बंद असलेल्या प्रादेशिक पाणी पुरवठा योजनांचे पुनरुज्जीवन :—**

➢ अन्य कार्यक्रमांतर्गत राबविण्यात आलेल्या परंतु सद्यःस्थितीत बंद असलेल्या ८३ प्रादेशिक पाणी पुरवठा योजना मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत पुनरुज्जीवित करण्याकरिता रुपये १३०.८६ कोटी इतका निधी उपलब्ध करून देण्याचे प्रस्तावित होते.

➢ तथापि, सद्यःस्थितीत **रु. १२४.७८ कोटी इतक्या किंमतीच्या ३३ प्रादेशिक पाणी पुरवठा योजना पुररुज्जीवित करण्यास मंजुरी** देण्यात आली आहे. त्यापैकी ३ योजना रद्द करण्यात आल्या असून सदर योजनांचा लाभ ४३० गावे/वाड्यां-वस्त्यांमधील ९.३५ लाख नागरिकांना होणार आहे.

➢ १५ योजनांची कामे पूर्ण झाली असून १५ योजनांची कामे प्रगतीपथावर आहेत. या १५ प्रगतीपथावरील योजनांमधून पाणी पुरवठा सुरु करण्यात आला असून सर्व योजनांचे लेखे बंद करण्याची कामे सुरु आहेत.

➢ उपरोक्त योजना राज्य शासनामार्फत राबविली जाते. त्यामुळे सदर योजनेवर १०० टक्के निधी राज्य शासनामार्फत उपलब्ध करून दिला जातो.

**सन २०१६-१७ ते २०२१-२२ करीता झालेला खर्च तपशील–**

(रु. कोटीमध्ये)

| अ.क्र. | कार्यक्रमाचे घटक/वर्गीकरण | २०१६-१७ | २०१७-१८ | २०१८-१९ | २०१९-२० | २०२०-२१ | २०२१-२२ | २०२२-२३ नोव्हेंबर-२०२२ पर्यंत | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (अ) | नवीन योजना (२२१५-९९४२) | २५६.६३ | २२७.१३ | १२३.८९ | १५१.१२ | ६०.०० | १०२.१५ | ५४१७.९५ | ६३३८.८७ |
| (ब) | बंद प्रादेशिक पाणी पुरवठा योजनेचे पुनरूज्जी-वन (२२१५-९९५१) | २३.६४ | ०.८७ | ११.३१ | १९.३२ | १८.०० | १६.७३ | १११८.२४ | १२०८.११ |
| (क) | प्रादेशिक पाणी पुरवठा योजनांची देखभाल व दुरुस्ती (२२१५-९९६२) | ८०.०० | १२.०० | ८.०० | ... | ३०.०० | ... | ... | १३०.०० |
| | **एकूण ...** | **३६०.२७** | **२४०.००** | **१४३.२०** | **१७०.४४** | **१०८.००** | **११८.८८** | **६५३६.१९** | **७६७६.९८ (अ+ब+क)** |

**६. जलस्वराज्य-२ :—**

जागतिक बँकेच्या सहकार्याने जलस्वराज्य-२ कार्यक्रम राज्यातील ग्रामीण भागात राबविण्यास मंत्रीमंडळाने, दिनांक २० नोव्हेंबर, २०१३ च्या बैठकीत मान्यता दिलेली होती.

राज्यात जागतिक बँक अर्थसहाय्यीत जलस्वराज्य-२ कार्यक्रम राबविण्यास दिनांक ३० मे, २०१४ रोजी जागतिक बँकेबरोबर करार करण्यात आला होता, जलस्वराज्य-२ कार्यक्रमाची अंमलबजावणी (२०१४-२०२०) दरम्यान करण्यात आली होती. सदर कार्यक्रमासाठी ७० टक्के कर्ज जागतिक बँक व ३० टक्के राज्य शासनाचा हिस्सा होता. सद्यःस्थितीत जलस्वराज्य-२ कार्यक्रमाचा कालावधी दिनांक ३० सप्टेंबर, २०२० रोजी संपुष्टात आलेला आहे.

जलस्वराज्य-२ कार्यक्रमासाठी जागतिक बँकेकडून मिळणारे अर्थसहाय्य हे प्रोग्राम फॉर रिझल्ट या वित्तीय साधनांतर्गत उपलब्ध झाले असून उद्दिष्ट पूर्ती आधारित निधी संवितरण निर्देशांकाशी निगडीत आहे. सप्टेंबर, २०२० पर्यंत जलस्वराज्य-२ कार्यक्रमासाठी जागतिक बँकेकडून रुपये ५५६.९६ कोटी अर्थसाह्य प्राप्त झाले. तसेच मार्च, २०२२ अखेर राज्य शासनाद्वारे जलस्वराज्य-२ कार्यक्रमासाठी रुपये १९०.८४ कोटी इतका निधी उपलब्ध झालेला आहे. जलस्वराज्य-२ कार्यक्रमासाठी जागतिक बँक व राज्य शासनाकडून प्राप्त झालेला एकूण निधी रुपये ७४७.८० कोटी इतका खर्च करण्यात आलेला आहे.

**कार्यक्रमाची उद्दिष्टे :—**

६.१ राज्यातील ग्रामीण पाणी पुरवठा व स्वच्छता सेवांचे नियोजन, अंमलबजावणी संनियंत्रण व शाश्वतता या क्षेत्रातील संस्थांच्या कामगिरीचा दर्जा उंचाविणे.

६.२ निमशहरी गावांमध्ये आणि पाणी गुणवत्ता बाधित व पाणी टंचाईच्या गावांमध्ये गुणवत्तापूर्ण आणि शाश्वत पाणी पुरवठा सेवा पुरविणे.

**कार्यक्रमाचे घटक :–**

जलस्वराज्य-२ कार्यक्रमामधील गुंतवणूक ही तीन मुख्य घटकांतर्गत करण्यात आली.

**(अ) मुख्य भौतिक गुंतवणूक :—**

या अंतर्गत निमशहरी भागातील जनतेला वाढीव पाणी पुरवठा व स्वच्छता सेवा सुविधा पुरविणे, पाणी गुणवत्ता बाधित गावे/वाड्या/वस्त्यांसाठी कमी खर्चाच्या रासायनिक दुषितीकरण सौम्य करण्यासाठी करावयाच्या उपाययोजना, दुर्गम किंवा पाणी टंचाई असलेल्या भागांमध्ये पर्जन्यजल साठवण उपाययोजना आणि अतिशय पाणलोट क्षेत्रामध्ये जलभरण स्तरावर पाणी व्यवस्थापन विकसित करणे या बाबी समाविष्ट आहेत. निमशहरी गावे/शहरालगतच्या १० कि.मी. त्रिज्येतील झपाट्याने वाढणाऱ्या ग्रामपंचायतींना नागरी क्षेत्राप्रमाणे पाणी पुरवठा उपलब्ध करून देणे हा या योजनेचा उद्देश आहे.

या कार्यक्रमांतर्गत ६० निमशहरी गावाच्या नळ पाणी पुरवठा योजनांना प्रशासकीय मान्यता देण्यात आली असून त्यापैकी ५४ योजना कार्यान्वित झाल्या आहेत.

टंचाईग्रस्त गावे ५०० पेक्षा कमी लोकसंख्येचे दुर्गम भागातील सातत्याने टँकरग्रस्त असलेल्या गावे/वाड्या-वस्त्यांना टंचाई कालावधींकरिता २० लि./दिवस/माणसी या निकषाप्रमाणे पिण्याचे शुद्ध पाणी देण्यासाठी अभिनव प्रकारच्या मेटॅलीक सामुदायिक साठवण टाक्यांची योजना राबविण्यात आलेली आहे. सद्यःस्थितीत ७८ योजना कार्यान्वित करण्यात आल्या आहेत. ६३ गुणवत्ता बाधित गावांमध्ये पाणी शुद्धिकरणासाठी आर.ओ. आणि डिफ्लोरिडेशन युनिट या उपाययोजना राबविण्यात आल्या आहेत. जलस्वराज्य-२ कार्यक्रमांतर्गत जलधर निर्धारण व लोकसहभागातून भूजल व्यवस्थापन या अभिनव उपक्रमाची अंमलबजावणी करण्यात आली असून त्याअंतर्गत ११ अतिशोषित पाणलोटातील १२ जलधर आणि १०२ गावांमध्ये भूजल पुनर्भरणाची कामे करण्यात आली आहेत.

**(ब) इतर भौतिक गुंतवणूक :—**

या अंतर्गत सार्वजनिक आरोग्य विभागातील तसेच भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेमधील प्रयोगशाळांचे बळकटीकरण, महाराष्ट्र पर्यावरण अभियांत्रिकी प्रशिक्षण व संशोधन संस्था (मित्रा), नाशिक, पाणी व स्वच्छता क्षेत्रातील उत्कृष्टता केंद्र म्हणून विकसित करणे, जिल्हा परिषदांमधील ग्रामीण पाणी पुरवठा विभागातील उपविभागीय कार्यालयांमध्ये सोयी सुविधा विकसित करणे या बाबी समाविष्ट असून यापैकी बहुतांशी कामे पूर्ण झालेली असून उर्वरित कामे पूर्ण करण्यात येत आहेत.

**(क) मृदू घटकांसाठीची गुंतवणूक :—**

यामध्ये पाणी पुरवठा आणि स्वच्छता क्षेत्रातील संस्थांचे बळकटीकरण, क्षमता बांधणी, कार्यक्रम व्यवस्थापन तसेच पाणी पुरवठा व स्वच्छता विभागासाठी संनियंत्रण व मूल्यमापन प्रणाली विकसित करणे इत्यादी घटक समाविष्ट असून सदर कामे पूर्ण करण्यात आलेली आहेत.

**१. कार्यक्रमाचे कार्यक्षेत्र :—**

जलस्वराज्य-२ कार्यक्रमातील मुख्य भौतिक गुंतवणूक व अनुषंगिक बाबींची अंमलबजावणी राज्यातील ६ महसुली विभागातील प्रत्येकी २ अशा रायगड, रत्नागिरी, पुणे, सातारा, अहमदनगर, जळगाव, औरंगाबाद, नांदेड, अमरावती, बुलढाणा, नागपूर, चंद्रपूर अशा १२ जिल्ह्यांमध्ये राबविण्यात आली आहे. या व्यतिरिक्त इतर गुंतवणूक राज्यातील ३४ ग्रामीण जिल्ह्यामध्ये करण्यात आली.

**७. जल जीवन मिशन :—**

केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार राज्यातील पाणी व स्वच्छता सहाय्य संस्था यांचे विलिनीकरण करून एकंदर ग्रामीण पाणी पुरवठा व स्वच्छता कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी जल जीवन मिशनची स्थापना करण्यात आली आहे. सदर मिशनचे मुख्यालय सिडको भवन, बेलापूर, नवी मुंबई येथे आहे.

७.१ **राज्य पाणी व स्वच्छता मिशन :—**

पाणी पुरवठा व स्वच्छता विभागातील योजनांसाठी या विभागामार्फत दिनांक १०-०२-२०१० रोजी संस्था नोंदणी अधिनियम, १८६० अंतर्गत राज्य पाणी व स्वच्छता मिशनची नोंदणी करण्यात आली आहे. या मिशनमध्ये राज्याचे मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली शिखर समिती आहे. जल जीवन मिशन व स्वच्छताविषयक कार्यक्रमांचे राज्यातील नियोजन, अंमलबजावणी, संनियंत्रण याबाबत संपूर्ण जबाबदारी व अधिकार राज्य पाणी व स्वच्छता मिशनला आहेत. जल जीवन मिशनच्या मार्गदर्शक सूचनांप्रमाणे राज्य पाणी व स्वच्छता मिशनला कार्य करण्याचे संपूर्ण अधिकार आहेत. राज्य पाणी व स्वच्छता मिशनला जल जीवन मिशनसाठी कार्यान्वयन यंत्रणा म्हणून केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार कार्यवाही करण्यासाठी प्राधिकृत करण्यात आले आहे. राज्य पाणी व स्वच्छता समितीमध्ये शिखर समिती व कार्यकारी समिती आहे. जल जीवन मिशन मार्गदर्शक सूचनांनुसार शिखर समिती व कार्यकारी समितीची कार्यकक्षा निश्चित करण्यात आली आहे.

७.२ **जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन कक्ष :—**

केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचना विचारात घेता जिल्हा पाणी व स्वच्छता मिशनची नव्याने पुनर्रचना करण्यात आली आहे.

७.३ **जिल्हा पाणी पुरवठा व स्वच्छता मिशन कक्षाची कार्यकक्षा :–**

७.३.१. जिल्हा पाणी व स्वच्छता मिशनचे जिल्हाधिकारी हे अध्यक्ष असतील व संबंधित जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी हे सह अध्यक्ष असतील.

७.३.२. आरोग्य विभाग, शिक्षण विभाग, प्रकल्प संचालक, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, जलसंपदा विभाग, जलसंधारण विभाग, कृषी विभाग, वन विभाग तसेच माहिती व जनसंपर्क या विभागाचे त्या जिल्ह्याचे प्रमुख अधिकारी या मिशनचे सदस्य असतील. महाराष्ट्र जीवन प्राधिकरण व भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा यांचे जिल्ह्यातील प्रमुख अधिकारी हे या मिशनचे सदस्य असतील. पाणी व्यवस्थापन, समाज विकास, सामाजिक आरोग्य या क्षेत्रातील नामांकित व्यक्ती तसेच स्थानिक खासदार, आमदार यांना या मिशनवर मानद सदस्य म्हणून घेता येईल. कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा हे या मिशनचे सदस्य सचिव असतील.

७.३.३. जल जीवन मिशनचे जिल्हास्तरीय आराखडे, जिल्हा पाणी व स्वच्छता मिशनच्या मान्यतेनंतर, त्या जिल्ह्याचे मा. पालकमंत्री यांच्या अध्यक्षतेखालील जिल्हास्तरीय समितीसमोर सादर करण्यात येतील. या समितीमध्ये त्या जिल्ह्यांमधील सर्व मंत्री, तसेच मा. पालकमंत्री यांनी नेमलेले ३ आमदार हे सदस्य असतील. या समितीच्या सहमतीनंतर सदर आराखडे हे राज्य स्तरावरील समितीपुढे मान्यतेसाठी ठेवण्यात येतील. राज्यपातळीवर मा. मंत्री (पाणी पुरवठा व स्वच्छता), मा. राज्यमंत्री (पाणी पुरवठा व स्वच्छता), अपर मुख्य सचिव (पाणी पुरवठा व स्वच्छता) व मिशन संचालक, राज्य पाणी व स्वच्छता मिशन यांची समिती (राज्यस्तरीय योजना मंजुरी समितीच्या मान्यतेनंतर) आराखड्यांना अंतिम मान्यता देईल.

७.४ **गट संसाधन केंद्र (पाणी पुरवठा व स्वच्छता) :—**केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार, ग्रामीण पाणी पुरवठा व स्वच्छता कार्यक्रमाच्या ग्रामस्तरावरील अंमलबजावणीसाठी, ग्राम आरोग्य, पोषण, पर्यावरण, पाणी पुरवठा व स्वच्छता समित्यांना मार्गदर्शन व मदत करण्यासाठी, त्यांचा तालुकास्तरावरील पंचायत समित्यांशी योग्य समन्वय राखण्यासाठी, तालुकास्तरावर गट संसाधन केंद्र (Block Resource Centres) स्थापन करण्यात आली आहेत. तालुक्याच्या/गटाच्या लोकसंख्येच्या आधारे प्रत्येक गट संसाधन केंद्रामध्ये २ ते ४ कर्मचारी कार्यरत आहेत.

७.५ **गट संसाधन केंद्रांची कार्ये :—**

७.५.१. ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समिती स्थापन करण्याकरिता ग्रामस्थांना मदत करणे.

७.५.२. ग्रामपंचायत/ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समितीचे सदस्य आणि ग्रामस्थ यांच्यामध्ये पाणी पुरवठा व स्वच्छता कार्यक्रमाविषयी जाणीव व जागृती निर्माण करणे व त्यांची संवाद क्षमता विकसित करण्याच्या दृष्टीने कार्यवाही करणे.

७.५.३. पाणी पुरवठा व स्वच्छता कार्यक्रमाच्या विविध बाबींवर, ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समिती/ग्रामपंचायत सदस्य तसेच ग्राम पातळीवरील विविध कार्यकर्ते (उदा. ASHA/अंगणवाडी कामगार, शिक्षक, स्वयंसहायता गट महिला व युवक मंडळ इ. व ग्रामस्थ यांचेमध्ये माहिती, शिक्षण व संवाद (IEC) क्षमता वाढविण्यासाठी गट व ग्रामस्तरावर प्रशिक्षणाचे वार्षिक कार्यक्रम तयार करणे व त्यांची अंमलबजावणी करणे.

७.५.४. गट संसाधन केंद्राच्या कार्यक्षेत्रातील पिण्याच्या पाण्याचे स्त्रोत व उपाययोजनांचे व स्वच्छता विषयक उपाययोजनांचे प्राथमिक सर्वेक्षण (BASELINE SURVEY) करण्यासाठी ग्रामपंचायती व पाणी पुरवठा व स्वच्छता समित्यांना मदत करणे.

७.५.५. ग्रामस्थ, ग्रामपंचायती व पाणी पुरवठा व स्वच्छता समित्यांना वार्षिक गाव कृती आराखडा तयार करण्यासाठी व त्यास ग्राम सभेची मंजुरी मिळविण्यासाठी मदत करणे, आराखड्यामध्ये प्रस्तावित केल्यानुसार, पाणी पुरवठा योजना व स्वच्छतेच्या कामांची अंमलबजावणी व संनियंत्रण करण्याकरीता पाणी पुरवठा व स्वच्छता समित्यांना मार्गदर्शन करणे.

७.५.६. पाणी पुरवठा, पाणी गुणवत्ता तपासणी व सर्वेक्षण यामध्ये प्रशिक्षित झालेल्या गाव पातळीवरील कार्यकर्त्यांमध्ये समन्वय साधणे व ते पाणी गुणवत्ता चाचणी व सर्वेक्षण कार्यक्रम राबवित आहेत याची खात्री करण्यासाठी पाठपुरावा करणे.

७.५.७. पाणी पुरवठा, पाणी गुणवत्ता तपासणी व सर्वेक्षण तसेच स्वच्छता यांच्याशी संबंधित बाबींवर नियमितपणे लक्ष केंद्रीत केले जात आहे याची खात्री करण्यासाठी ग्रामपंचायती ASHA/अंगणवाडी कामगार, शिक्षक, स्वयंसहायता गट महिला व युवक मंडळे यांच्याशी नियमित संवाद साधणे.

७.५.८. शिक्षक व विद्यार्थी यांच्यामध्ये आरोग्य व स्वच्छता विषयक चांगल्या सवयींची जाणीव निर्माण व्हावी यासाठी शाळांना भेटी देऊन आरोग्य व स्वच्छता या विषयावर व्याख्याने देणे.

७.५.९. ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समित्यांना सामाजिक लेखापरीक्षण आयोजित करण्यासाठी मदत करणे.

७.५.१०. पाणी गुणवत्ता चाचणीच्या अहवालानुसार, पाणी पिण्यायोग्य ठेवण्यासाठी परिणामकारक उपाययोजना करण्याकरिता ग्रामपंचायती/ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समिती/सार्वजनिक आरोग्य विभाग यांना सावधान करणे व त्यांच्यात समन्वय साधून उपाययोजना करण्याबाबत त्यांना मार्गदर्शन करणे.

७.५.११. गट संसाधन केंद्रांची लेखाविषयक माहिती तसेच त्यांच्या भौतिक व आर्थिक प्रगतीची माहिती केंद्र शासनाच्या IMIS वर भरणे. त्याचप्रमाणे गावे/वाड्या-वस्त्या यांची अद्ययावत माहिती IMIS वर भरण्याकरीता माहिती गोळा करण्यासाठी यंत्रणेस मदत करणे.

८. **पाणी गुणवत्ता कार्यक्रम :—**

८.१ राज्यात केंद्र पुरस्कृत जल जीवन मिशन अंतर्गत ग्रामीण पाणी गुणवत्ता संनियंत्रण व सर्वेक्षण कार्यक्रम राबविण्यात येत आहे. सदर कार्यक्रमांतर्गत ग्रामीण भागातील जनतेला शुध्द पाणी पुरवठा करणे हे महत्वाचे उद्दिष्ट आहे. तसेच कार्यक्रमाचे खालील प्रमुख उद्देश आहेत.

- ग्रामीण भागातील सर्व सार्वजनिक पिण्याच्या पाण्याच्या स्त्रोतांचे व घरगुती नळाद्वारे उपलब्ध होणाऱ्या पाण्याचे गुणवत्ता परीक्षण करणे.
- ग्रामीण भागातील सर्व सार्वजनिक पिण्याच्या पाण्याच्या स्त्रोतांची देखरेख व स्वच्छता सर्वेक्षणामध्ये लोकांचा सहभाग वाढविणे.
- पाणी गुणवत्ता तपासणीमध्ये सोप्या पध्दतीने पाणी तपासणी संचाचा वापर करणे.
- ग्रामपंचायतीमधील ५ महिलांची निवड करून, त्यांना प्रशिक्षण देवून, त्यांचा पाणी गुणवत्ता सर्वेक्षणामध्ये सहभाग नोंदविणे.
- ग्रामपंचायतींना या कार्यक्रमाच्या अंमलबजावणीमध्ये सहभागी करून घेणे व त्यांना सक्षम बनविणे.
- पाणी पुरवठा यंत्रणेतील वेळोवेळी उद्भवणारे दोष व दुरुस्त्या लोकसहभागातून करणे.
- लोकांमध्ये स्वच्छ व सुरक्षित पाणी पुरवठ्याबाबत व अशुध्द पाण्यामुळे आरोग्यावर होणाऱ्या दुष्परिणामांबाबत जनजागृती करणे.

८.२ या कार्यक्रमांतर्गत ग्राम पातळीपर्यंत लोकांना पिण्याच्या पाण्याची गुणवत्ता, देखरेख व संनियंत्रण यशस्वीरित्या कशा प्रकारे करावे याबाबत माहिती देण्यासाठी राज्यस्तर/जिल्हास्तर/तालुकास्तर या तीनही स्तरावर प्रशिक्षण कार्यक्रम हाती घेण्यात आलेला आहे. त्यामध्ये उपमुख्य कार्यकारी अधिकारी, कार्यकारी अभियंता, अति. जिल्हा आरोग्य अधिकारी, गटविकास अधिकारी, तालुका आरोग्य अधिकारी, वैद्यकीय अधिकारी, शिक्षण, विस्तार अधिकारी (आरोग्य)/(पंचायत), महिला व बालकल्याण पर्यवेक्षक व प्रयोगशाळा अधिकारी, तांत्रिक कर्मचारी, सरपंच, ग्रामसेवक, आरोग्य सेवक, पाणी पुरवठा कर्मचारी, जलसुरक्षक, बचतगट इत्यादींचा समावेश आहे.

८.३ पाणी गुणवत्ता व संनियंत्रण कार्यक्रमामध्ये स्वच्छता सर्वेक्षणाचे महत्व अनन्य साधारण आहे. स्वच्छता सर्वेक्षणातून स्त्रोताभोवतालचा परिसर, पाणी पुरवठा संरचना व व्यवस्थापनातील जे काही दोष आढळून येतात त्यांचे निराकरण वेळेत करता येऊन, संभाव्य साथीस प्रतिबंध करता येतो. केंद्र शासन व जागतिक आरोग्य संघटना यांच्या नवीन निकषाप्रमाणे प्रत्येक पिण्याच्या पाण्याच्या स्त्रोतांचे सर्वेक्षण करणे आवश्यक आहे. या विभागाच्या, दिनांक २९-८-२०१२ रोजीच्या शासन निर्णयानुसार दरवर्षी दिनांक १ एप्रिल ते ३० एप्रिल (मान्सूनपूर्व) व दिनांक २ ऑक्टोबर ते ३१

ऑक्टोबर (मान्सूनपश्चात) या कालावधीत, पिण्याच्या पाण्याच्या स्त्रोतांचे सर्वेक्षण व त्या आधारे दिल्या जाणाऱ्या लाल कार्ड, हिरवे कार्ड प्रणालीचे बळकटीकरण व सुसुत्रता आणण्यासाठी शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे. आरोग्य विभागामार्फत ग्रामपंचायतींना वितरीत करण्यात आलेले लाल कार्ड म्हणजे संपूर्ण ग्रामपंचायत परिसरात अथवा सर्व स्त्रोतांचा पाण्याचा साठा दुषित झाला आहे. तो असुरक्षित झालेला आहे. असुरक्षिततेच्या कारणांकडे लक्ष देवून ते दूर करण्याची गरज आहे. लाल कार्ड हे त्या ग्रामपंचायतीस संभाव्य साथरोगांबाबत पूर्व सूचना देत असते. लाल कार्ड देण्यात आलेल्या त्रुटी दूर केल्या असता पाण्याची गुणवत्ता चांगली राखता येते. सन २०२१-२२ या आर्थिक वर्षात एकूण ३८८१९६ पाणी स्त्रोतांचे स्वच्छता सर्वेक्षण करण्यात आले.

८.४ राज्यातील एकूण २३९७१५ सार्वजनिक पिण्याच्या पाण्याच्या स्त्रोतांची माहिती WSSD पोर्टलवर नोंदीत करण्यात आली आहे.

८.५ सन २०२१-२२ या आर्थिक वर्षामध्ये सार्वजनिक पिण्याच्या पाण्याच्या स्त्रोतांच्या क्षेत्रिय तपासणीसाठी खरेदी करण्यात आलेल्या २६५०८१ जैविक FTK H2s vials द्वारे २३४८९४ पाणी नमूने तपासणी करण्यात आले.

८.६ सन २०२१-२२ या आर्थिक वर्षामध्ये, ४०४९५ गावांमधून निवड केलेल्या २०२४७५ महिलांपैकी एकूण १९४७६२ (९६.१९ टक्के) महिलांच्या पाणी गुणवत्ता विषयक, FTK द्वारे पाणी तपासणी प्रशिक्षणाच्या नोंदी केंद्र शासनाच्या संकेतस्थळावर घेण्यात आल्या.

८.७ पिण्याच्या पाण्याची गुणवत्ता तपासण्यासाठी सध्या राज्यात १ राज्यस्तरीय, ६ विभागीय, २८ जिल्हास्तरीय व १४८ उपविभागीय प्रयोगशाळा अशा एकूण १८३ प्रयोगशाळा भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणामार्फत कार्यरत आहेत. त्यामध्ये राज्यात उपलब्ध असलेल्या एकूण २३९७१५ नोंदित स्त्रोतांची दिनांक २०-०७-२०२२ रोजीच्या शासन निर्णयानुसार वर्षातून १ वेळा रासायनिक तपासणी (दि. ०१ ऑक्टो. ते ३१ मार्च) व २ वेळा जैविक तपासणी (दि. ०१ जुन ते ३१ ऑक्टो. व १ नोव्हें. ते ३१ मे) केली जाते. सन २०२१-२२ या आर्थिक वर्षात ५९६३९२ पाणी नमुने भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेमार्फत तपासण्यात आले आहे.

८.८ पाणी गुणवत्ता सर्वेक्षण व संनियंत्रण कार्यक्रमांतर्गत प्रयोगशाळेमध्ये प्राप्त नमुन्यांचे पृथःकरण करण्यात येऊन नमुन्यांचे अहवाल केंद्र शासनाच्या संकेत स्थळावर online नोंदी करण्यात येत आहेत. पाणी गुणवत्ता संनियंत्रण व सर्वेक्षण कार्यक्रमांतर्गत प्रयोगशाळांमध्ये पृथःकरण करणाऱ्या नमुन्यांच्या तपासणी नुसार बाधित आढळलेल्या नमुन्यांचे अहवाल केंद्र शासनाच्या राष्ट्रीय पाणी गुणवत्ता संनियंत्रण व सर्वेक्षण कार्यक्रमाची Online data entry करण्याचा अहवाल संबंधित उप मुख्य कार्यकारी अधिकारी तथा अध्यक्ष पाणी गुणवत्ता संनियंत्रण कक्ष, जिल्हा (WATSON), जिल्हा आरोग्य अधिकारी, तसेच संबंधित ग्रामपंचायत यांना कळविण्यात येते. बाधित आढळलेल्या उद्‌भवाची उपाययोजना तालुका आरोग्य अधिकारी तसेच संबंधित ग्रामपंचायत यांनी करावयाची असते. सर्व प्रयोगशाळांमध्ये शासन निर्णयानुसार शुल्क आकारून खाजगी नमुने तपासणीबाबत जनजागृती करण्यात येत आहे. पाणी गुणवत्ता संनियंत्रण व सर्वेक्षण कार्यक्रमाची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी पिण्याच्या पाण्याची गुणवत्ता संनियंत्रणाची जबाबदारी जिल्हा पाणी गुणवत्ता सल्लागार, पाणी गुणवत्ता निरीक्षक यांना देण्यात आली आहे.

८.९ राज्यामध्ये नव्याने १ राज्यस्तरीय प्रयोगशाळा स्थापनेस मंजुरी देण्यात आली असून २७ जिल्हा प्रयोगशाळांचे बांधकाम पूर्ण झाले आहे. राज्यातील नवीन मंजूर असलेल्या राज्यस्तरीय प्रयोगशाळांचे बांधकाम प्रगतीपथावर आहे.

८.१० सन २०२१-२०२२ या आर्थिक वर्षात राज्यातील पुणे, कोंकण, नाशिक, अमरावती, औरंगाबाद व नागपूर या ६ विभागीय तपासणी प्रयोगशाळांना व २८ जिल्हास्तरीय प्रयोगशाळांना NABL अधिस्विकृती नुतनीकरण प्रमाणपत्र (Renewal of Accreditation) प्रमाणपत्र प्राप्त झाले आहे. तसेच चालू आर्थिक वर्षात १४३ उपविभागीय प्रयोगशाळांच्या NABL अधिस्विकृतीची प्रक्रिया प्रगतीपथावर असून ५१ उपविभागीय प्रयोगशाळांना NABL अधिस्वीकृती प्रमाणपत्र (NABL Recognition) प्राप्त झाले आहे.

**९. ग्रामीण पिण्याच्या पाण्याचा टंचाई कार्यक्रम :—**

९.१ प्रत्येक जिल्ह्यात दरवर्षी पावसाळा संपल्यानंतर पाणी टंचाई (२० लिटर्स/दिन/व्यक्तीपेक्षा कमी) झालेल्या पर्जन्यमानाचा आढावा घेऊन १ कि.मी. क्षेत्रात ज्या गावांमध्ये/वाड्यांमध्ये पिण्याच्या पाण्याचे नियमित स्त्रोत आटले किंवा कमी झाल्याने दरडोई, प्रतिदिनी २० लिटर्सपेक्षा कमी पाणी पुरवठा होईल असा अंदाज आहे, अशा गावे/वाड्यांमध्ये पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांकडून मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद व वरिष्ठ भूवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा यांच्याशी विचार विनिमय करून (१) ऑक्टोबर ते डिसेंबर, (२) जानेवारी ते मार्च, (३) एप्रिल ते जून अशा तीन स्वतंत्र तिमाहीसाठी टंचाई कृती आराखडे तयार करण्यात येतात. पिण्याच्या पाण्याच्या टंचाई निवारणार्थ खालील अनुज्ञेय उपाययोजनांपैकी योग्य त्या उपाययोजनेची निवड करण्यात येते.

(१) बुडक्या घेणे.

(२) विहिरी खोल करणे/गाळ काढणे.

(३) खाजगी विहिरी अधिग्रहीत करणे,

(४) टँकर/बैलगाड्यांव्दारे पाणी पुरवठा करणे.

(५) प्रगतीपथावरील पाणी पुरवठा योजनेची कामे तातडीने पूर्ण करणे.

(६) नळ योजनांची विशेष दुरुस्ती करणे,

(७) विंधण विहिरींची विशेष दुरुस्ती,

(८) नवीन विंधन विहिरी घेणे,

(९) तात्पुरत्या पूरक नळ योजना घेणे,

(१०) धरणामध्ये अथवा तलावामध्ये चर खणणे.

९.२ टँकरने पाणी पुरवठा करणे ही उपाययोजना अधिक खर्चिक व तात्पुरत्या स्वरूपाची आहे. जेथे अन्य उपाययोजना शक्य नाही, तेथेच ही उपाययोजना अनिवार्य ठरते. जिल्हाधिकाऱ्यांची खात्री पटल्यास टँकर लावण्यास मान्यता दिली जाते. दिनांक १ ऑक्टोबर, २००६ पासून पाणी टंचाई कार्यक्रमांतर्गत घेण्यात येणाऱ्या नळ योजनांची विशेष दुरुस्ती करणे, विंधण विहिरींची विशेष दुरुस्ती करणे. विहित आर्थिक व भौतिक निकषात न बसणाऱ्या टंचाई निवारक उपाययोजनांना शासन स्तरावर सचिव स्तरीय स्थायी समिती मार्फत मंजुरी देण्यात येते.

९.३ राज्यात दरवर्षी निर्माण होणाऱ्या पाणी टंचाईवर मात करण्यासाठी, गावात पिण्याच्या पाण्याची टंचाई निर्माण झाल्यानंतर, पाणी टंचाई कार्यक्रमाअंतर्गत कोणतीही उपाययोजना घेतल्यास त्याबरोबरच, पुढील वर्षी त्या गावात पिण्याच्या पाण्याची टंचाई निर्माण होऊ नये म्हणून, ग्रामस्तरावरुन जलसंधारणाच्या विविध उपाययोजनांबरोबरच शिवकालीन पाणी साठवण योजना, जलपुनर्भरण कार्यक्रम इत्यादी प्रतिबंधात्मक उपाययोजना ग्रामस्तरावर राबविण्याबाबतचे आदेश, दिनांक २७ फेब्रुवारी, २००८ च्या शासन निर्णयान्वये निर्गमित करण्यात आले आहे.

९.४ खाजगी टँकर्स व ट्रक्सचे दर पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाच्या, शासन निर्णय क्रमांक टंचाई-२०१८/प्र.क्र. १६७/पापु-१४, दिनांक १९-१२-२०१८ अन्वये खाजगी टँकर्स व ट्रक्सचे दर पुढीलप्रमाणे सुधारित करण्यात आले आहेत.

| टँकर व ट्रकवरील टाकीची पाणी वहन करण्याची क्षमता व क्षेत्र | कमाल प्रतिदिन प्रति मे. टन भाडे (रुपये) | कमाल प्रति किलोमीटर प्रति मे. टन भाडे (रुपये) |
|---|---|---|
| सर्वसाधारण | २७० | ३.४० |
| दुर्गम व अतिदुर्गम भागामध्ये अतितीव्र घाट असलेल्या ठिकाणी (३००० ते ५००० लिटर) | ३३८ | ४.३० |

वरीलप्रमाणे टँकरचे दर निर्धारित केले असले तरी, जिल्हाधिकाऱ्यांनी निविदा मागवून कमीत कमी दरात टँकर उपलब्ध करून घ्यावयाचे आहेत.

९.५ पाणी टंचाईविषयी उपाययोजनांची अंमलबजावणी करण्यासाठी जिल्हाधिकारी व विभागीय आयुक्तांचे वित्तीय मंजुरीचे अधिकार शासन निर्णय, दिनांक ४ मे, २०१६ अन्वये खालीलप्रमाणे सुधारित करण्यात आले आहेत—

| अ.क्र. | उपाययोजनेचे नाव | जिल्हाधिकाऱ्यांचे अधिकार | विभागीय आयुक्तांचे अधिकार |
|---|---|---|---|
| (अ) | तात्पुरती पूरक नळ पाणी पुरवठा योजना | रु. २०.०० लक्ष पर्यंत | रु. ५०.०० लक्ष पर्यंत |
| (ब) | नळ पाणी पुरवठा योजनांची विशेष दुरुस्ती | रु. ३०.०० लक्ष पर्यंत | रु. ५०.०० लक्ष पर्यंत |
| (क) | जुन्या विहिरीची दुरुस्ती विहीरी खोल | रु. ०२.०० लक्ष पर्यंत | रु. ०३.०० लक्ष पर्यंत |
| (ड) | धरणामध्ये अथवा तलावामध्ये चर खणणे | रु. ०५.०० लक्ष पर्यंत | रु. १०.०० लक्ष पर्यंत |
| (इ) | पिण्याच्या पाण्याचे टँकर भरण्यासाठी आवश्यक ती तात्पुरती उपाययोजना. | रु. ००.५० लक्ष पर्यंत | रु. ०१.०० लक्ष पर्यंत |
| (ई) | बैलगाडीने पाणी पुरवठा करणे | प्रती दिन प्रती बैलगाडी रु. ५०० पर्यंत | |

९.६ नागरी व ग्रामीण भागातील पिण्याच्या पाण्याच्या टंचाई निवारणार्थ पाणी पुरवठा व स्वच्छता विभागास प्रदान करण्यात आलेल्या आर्थिक मर्यादेपेक्षा जास्त किंमतीच्या तसेच विहित निकषात न बसणाऱ्या तातडीच्या उपाययोजनांना तातडीने प्रशासकीय मंजुरी देता यावी म्हणून प्रधान सचिव यांच्या अध्यक्षतेखाली सचिवस्तरीय समिती स्थापन करण्यात आलेली आहे.

९.७ मागील ३ वर्षामध्ये टंचाई अंतर्गत घेतलेल्या विविध उपाययोजनांवर झालेला खर्च व हाताळलेली गावे व वाड्या यांची संख्या पुढीलप्रमाणे आहे.

**(अ) विविध उपाययोजनांवर झालेला खर्च** (रुपये कोटीत)

| अ.क्र. | उपाययोजना | २०१९-२०२० | २०२०-२०२१ | २०२१-२०२२ |
|---|---|---|---|---|
| १. | टँकर/बैलगाडीने पाणी पुरवठा करणे | ६४.१७ | १९.४६ | २७.२८ |
| २. | विहिर अधिग्रहीत करणे | १४.२१ | १२.११ | १०८७ |
| ३. | विहिरी खोल करणे/गाळ काढणे | ४.०५ | ०.९८ | १.९२ |
| ४. | बुडकी घेणे | ... | ... | ... |
| ५. | विंधण विहिर/कुपनलिका घेणे | २२.१० | १७.४६ | २३.८८ |
| ६. | नळ योजनांची विशेष दुरुस्ती करणे | ९७.३३ | ८२.१२ | ३९.६२ |
| ७. | विंधण विहिरींची विशेष दुरुस्ती करणे | २.८९ | १.४७ | ४.५१ |
| ८. | तात्पुरत्या पूरक नळ योजना घेणे | ३१.४१ | १४.०२ | १२.०४ |
| | एकूण ... | २३६.१८ | १४७.६२ | १२०.१२ |

**(ब) विविध उपाययोजनेद्वारे टंचाई कार्यक्रमांतर्गत हाताळलेली गावे/वाड्या**

| अ.क्र. | उपाययोजना | २०१९-२०२० | २०२०-२०२१ | २०२१-२०२२ |
|---|---|---|---|---|
| १. | टँकर/बैलगाडीने पाणी पुरवठा करणे | ३६३३ | १४५२ | १८६२ |
| २. | विहिर अधिग्रहीत करणे | २८८४ | २१५६ | २२९८ |
| ३. | विहिरी खोल करणे/गाळ काढणे | ३७० | ५८ | २९६ |
| ४. | बुडकी घेणे | ... | ... | ... |
| ५. | विंधण विहिर/कुपनलिका घेणे | २६०२ | १८२५ | २२४९ |
| ६. | नळ योजनांची विशेष दुरुस्ती करणे | १७७७ | १५६४ | ६८५ |
| ७. | विंधण विहिरींची विशेष दुरुस्ती करणे | १६७४ | १२५७ | १६०९ |
| ८. | तात्पुरत्या पूरक नळ योजना घेणे | ३८८ | २२८ | १४७ |
| | एकूण ... | १३३३७ | ८५४० | ९१४६ |

**१०. निधीची उपलब्धता :—**

१०.१ विभागाच्या दि. ०४-०९-२०२१ रोजीच्या शासन निर्णयान्वये राज्यात केंद्र शासन पुरस्कृत जल जीवन मिशन राबविण्यात येत आहे. जल जीवन मिशन अंतर्गत केंद्र व राज्य वित्तीय आकृतीबंध १:१ आहे.

१०.२ जल जीवन मिशन मार्गदर्शक सूचनेनुसार केंद्र व राज्य हिश्श्यांतर्गत प्राप्त होणारा निधी विभागाद्वारे राज्य पाणी व स्वच्छता मिशनला PFMS प्रणालीच्या Single Nodal Account वर उपलब्ध करून दिला जातो. केंद्र शासनाच्या निर्देशानुसार सन २०२१-२०२२ वर्षापासून वित्त विभागाच्या मान्यतेने जल जीवन मिशन अंतर्गत Escrow Account कार्यान्वित करण्यात आला आहे.

१०.३ जल जीवन मिशन अंतर्गत सन २०१९-२०२० पासून केंद्र शासनाकडून प्राप्त निधी व त्या समरूप राज्य हिश्श्यांतर्गत वितरित निधीचा तपशील खालीलप्रमाणे आहे.—

| वर्ष | | केंद्र हिश्श्याचा प्राप्त निधी | केंद्र हिश्श्याचा वितरित निधी | समरूप राज्य हिश्श्यांतर्गत देय निधी (सहाय्यिकृत बाबी व पाणी गुणवत्ता संनियंत्रण व सर्वेक्षण घटकाकरीता केंद्र व राज्य प्रमाण ६०:४० विचारात घेऊन) | राज्य हिश्श्याचा वितरित निधी |
|---|---|---|---|---|---|
| २०१९-२०२० | ... | ३४५.२७७० | ३४५.२७७० | ३३७.२२२३ | २१३.५१८७१ |
| २०२०-२०२१ | ... | ४५७.२३०२ | ४५७.२३०२ | ४४६.५६१४९५३ | ३९१.४०७२८६ |
| २०२१-२०२२ | ... | १६६६.६३६८ | १६६६.६३६८ | १६२७.७३६८ | १८०६.५९४५९९३ |
| २०२२-२०२३ | ... | १७०१.१०६९ | १७०१.१०६९ | १६५५.४२४६३ | ८६१.६३२५* |
| एकूण | ... | ४१७०.२५०९० | ४१७०.२५०९० | ४०६६.९४५२३ | ३२७३.१५३१ |

* दि. २३-०१-२०२३ रोजीच्या स्थितीस अनुसरुन

तक्ता क्रमांक-२

## पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग

(रुपये हजारात)

| अ.क्र. | तपशील | | प्रत्यक्ष रकमा २०२०-२०२१ | अर्थसंकल्पीय अंदाज २०२१-२०२२ | सुधारित अंदाज २०२१-२०२२ | अर्थसंकल्पीय अंदाज २०२२-२०२३ |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | | ३ | ४ | ५ | ६ |
| **प्रधान शीर्षवार सारांश :** | | | | | | |
| **ए - महसुली लेख्यावरील खर्च—** | | | | | | |
| | २०४९, व्याज प्रदाने ... | भारित | ७,५०,०० | २५,००,०० | २४,००,०० | २५,००,०० |
| | २२१५, पाणी पुरवठा व स्वच्छता ... | भारित | ... | ६०,०० | ४५,०० | ६०,०० |
| | | दत्तमत | १८७८,९७,५० | ५३८९,९७,६८ | ६९४९,९५,०५ | १०८६१,८४,८१ |
| | २२३५, सामाजिक सुरक्षा व कल्याण ... | दत्तमत | ... | ६,०० | ४,५० | ६,०० |
| | २४०६, वनीकरण व वन्यजीवन ... | दत्तमत | ... | ६,८६ | ५,८३ | १०,०० |
| | २७०२, लहान पाटबंधारे ... | दत्तमत | ३७,७१,३४ | ५२,४७,६५ | ४९,६९,०८ | ५२,५५,०० |
| | ३४५१, सचिवालयीन - आर्थिक सेवा ... | दत्तमत | १२,५३,२० | ३०,९२,४० | २०,४८,५९ | २३,८६,३६ |
| | **एकूण - ए - महसुली लेख्यावरील खर्च ...** | **भारित** | **७,५०,००** | **२५,६०,००** | **२४,४५,००** | **२५,६०,००** |
| | | **दत्तमत** | **१९२९,२२,०४** | **५४७३,५०,५९** | **७०२०,२३,०५** | **१०९३८,४२,१७** |
| | **एकूण ...** | | **१९३६,७२,०४** | **५४९९,१०,५९** | **७०४४,६८,०५** | **१०९६४,०२,१७** |
| **बी - भांडवली लेख्यावरील खर्च—** | | | | | | |
| | ४२१५, पाणी पुरवठा व स्वच्छता यावरील भांडवली खर्च. ... | दत्तमत | ... | २ | २ | २ |
| | ४४०२, मृद व जलसंधारण यावरील भांडवली खर्च. ... | भारित | २,५० | ५,०० | ५,०० | ५,०० |
| | | दत्तमत | २१,४१,२५ | ३१,६१,४० | ३०,१०,३७ | ३२,११,५१ |
| | ४७०२, लहान पाटबंधाऱ्यावरील भांडवली खर्च. | दत्तमत | ... | ... | ... | १ |
| | **एकूण - बी - भांडवली लेख्यावरील खर्च ...** | **भारित** | **२,५०** | **५,००** | **५,००** | **५,००** |
| | | **दत्तमत** | **२१,४१,२५** | **३१,६१,४२** | **३०,१०,३९** | **३२,११,५४** |
| | **एकूण ...** | | **२१,४३,७५** | **३१,६६,४२** | **३०,१५,३९** | **३२,१६,५४** |
| **सी - ऋण शीर्षाखालील खर्च—** | | | | | | |
| | ६२१५, पाणी पुरवठा व स्वच्छता यासाठी कर्जे. ... | दत्तमत | ... | २,८६,७८ | ५६२,८६,७८ | १ |
| | ७६१०, शासकीय कर्मचारी इत्यादिंना कर्जे. ... | दत्तमत | २०,५२ | ५,०८,१० | ३,८१,०८ | ५,०८,१० |
| | **एकूण - सी - ऋण शीर्षाखालील खर्च ...** | **भारित** | **...** | **...** | **...** | **...** |
| | | **दत्तमत** | **२०,५२** | **७,९४,८८** | **५६६,६७,८६** | **५,०८,११** |
| | **एकूण ...** | | **२०,५२** | **७,९४,८८** | **५६६,६७,८६** | **५,०८,११** |
| | **स्थूल बेरीज - ...** | **भारित** | **७,५२,५०** | **२५,६५,००** | **२४,५०,००** | **२५,६५,००** |
| | | **दत्तमत** | **१९५०,८३,८१** | **५५१३,०६,८९** | **७६१७,०१,३०** | **१०९७५,६१,८२** |
| | **एकूण ...** | | **१९५८,३६,३१** | **५५३८,७१,८९** | **७६४१,५१,३०** | **११००१,२६,८२** |

**तक्ता क्रमांक ३**

**जल जीवन मिशन अंतर्गत पाणी गुणवत्ता बाधित गावे/वाड्यांची दिनांक १ एप्रिल २०२२ रोजी व सन २०२१-२०२२ मध्ये साध्य केलेल्या गावे/वाड्यांची माहिती (IMIS वरील माहितीनुसार)**

| अ.क्र. | जिल्हा | | दि. १ एप्रिल २०२१ रोजी पाणी गुणवत्ता बाधित गावे/वाड्यांची संख्या | सन २०२१-२०२२ मध्ये साध्य केलेल्या गावे/वाड्यांची संख्या | दि. १ एप्रिल २०२२ रोजी पाणी गुणवत्ता बाधित गावे/वाड्यांची संख्या |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | | ३ | ४ | ५ |
| १. | पालघर | ... | ... | ... | ... |
| २. | ठाणे | ... | ... | ... | ... |
| ३. | रायगड | ... | ... | ... | ... |
| ४. | रत्नागिरी | ... | ... | ... | ... |
| ५. | सिंधुदूर्ग | ... | ... | ... | ... |
| | **कोकण विभाग** | **...** | **...** | **...** | **...** |
| ६. | पुणे | ... | ... | ... | ... |
| ७. | सातारा | ... | ... | ... | ... |
| ८. | सांगली | ... | ... | ... | ... |
| ९. | सोलापूर | ... | ... | ... | ... |
| १०. | कोल्हापूर | ... | ... | ... | ... |
| | **पुणे विभाग** | **...** | **...** | **...** | **...** |
| ११. | नाशिक | ... | ४ | ४ | ... |
| १२. | धुळे | ... | ... | ... | ... |
| १३. | नंदूरबार | ... | ... | ... | ... |
| १४. | जळगाव | ... | ४१ | ... | ४१ |
| १५. | अहमदनगर | ... | ... | ... | ... |
| | **नाशिक विभाग** | **...** | **४५** | **४** | **४१** |
| १६. | औरंगाबाद | ... | १ | ... | १ |
| १७. | जालना | ... | ... | ... | ... |
| १८. | परभणी | ... | ... | ... | ... |
| १९. | हिंगोली | ... | ... | ... | ... |
| २०. | नांदेड | ... | ... | ... | ... |
| २१. | उस्मानाबाद | ... | ... | ... | ... |
| २२. | बीड | ... | ... | ... | ... |
| २३. | लातूर | ... | ... | ... | ... |
| | **औरंगाबाद विभाग** | **...** | **१** | **...** | **१** |
| २४. | अमरावती | ... | ... | ... | ... |
| २५. | अकोला | .... | ... | ... | ... |
| २६. | वाशिम | ... | ... | ... | ... |
| २७. | बुलढाणा | ... | ... | ... | ... |
| २८. | यवतमाळ | ... | ... | ... | ... |
| | **अमरावती विभाग** | **...** | **...** | **...** | **...** |
| २९. | नागपूर | ... | ... | ... | ... |
| ३०. | वर्धा | ... | ३ | ... | ३ |
| ३१. | भंडारा | ... | ... | ... | ... |
| ३२. | गोंदिया | ... | ... | ... | ... |
| ३३. | चंद्रपूर | ... | १ | ... | १ |
| ३४. | गडचिरोली | ... | ... | ... | ... |
| | **नागपूर विभाग** | **...** | **४** | **...** | **४** |
| | **एकूण** | **...** | **५०** | **४** | **४६** |

# महाराष्ट्र जीवन प्राधिकरण

## महाराष्ट्र जीवन प्राधिकरण नागरी व ग्रामीण मंडळ

## तक्ता क्रमांक ४

## ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रम २०२३-२०२४ (सर्वसाधारण)

(रुपये लाखात)

| अनु-क्रमांक | जिल्हा | सन १९९७-९८ ते २०२०-२१ या कालावधीतील एकूण योजना | पूर्ण झालेल्या योजना | समाविष्ट गावे/वाड्या (संख्या) | योजनेसाठी मार्च २०२२ अखेर झालेला एकूण खर्च | अपूर्ण योजना (प्रगती-पथावर) | अपूर्ण योजनेसाठी मार्च २०२२ अखेर झालेला खर्च | अपूर्ण योजनेसाठी लागणारा आवश्यक निधी (२०२२-२३) | सन २०२३-२४ मधील अपेक्षित खर्च |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० |
| १. | ठाणे | २८ | ३ | ३/९ | ३५४७.४१ | २५ | २५५४.९९ | ३३९४६.०० | ३३६९८.०० |
| २. | पालघर | ६ | ३ | १५१ | १९८३२.७७ | ३ | १३४.१४ | १०९५.०० | ... |
| ३. | रायगड | ३१ | २ | ३८८ | २५८०.५८ | २९ | १९१८.७८ | ५०००.०० | ४०६७०.०० |
| ४. | रत्नागिरी | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... |
| ५. | सिंधुदूर्ग | १८५ | १८२ | २३६/२१९८ | १३८७९.८८ | ३ | १८२७५.७९ | ४७७१.४४ | ४७२०.५९ |
| ६. | पुणे | २३६ | ११७ | ५२६/२२९० | ४१८६०.८१ | ११९ | ४९७६.९० | १७८५८.०६ | १०३३२३.७० |
| ७. | सातारा | १६१ | १५८ | ४०३ | ५३७१.४२ | ३ | ९५७६.८४ | ९९६.०७ | १५०.०० |
| ८. | सांगली | ११७ | ८३ | ४९ | ५७५७८.३२ | ३४ | १३९८४.९२ | १५४९४.४९ | १७४२३.५० |
| ९. | कोल्हापूर | १५२ | १३८ | २०३/२४३ | ११६६८.०६ | १४ | ६८७.६३ | ११५००.०० | ११३८८.५० |
| १०. | सोलापूर | ४८४ | ४७९ | १२१४ | १५२१६.५७ | ५ | ६०६.५६ | २००.०० | २००.०० |
| ११. | नाशिक | १५५ | ११८ | ६३०/१०२ | ३३६९३.३४ | ३७ | १३०५०.१२ | ४९९७.५७ | ४०९२०.०६ |
| १२. | जळगाव | १८३ | १४७ | ३१० | १४३१६.९८ | ३३ | १४३१६.९८ | १६४२७.२२२ | ३५६०५.४४ |
| १३. | धुळे | ६८ | ५९ | १५५ | २१६९.८७ | ९ | २१६९.८७ | ११३७७.२८६ | २६२२७.३३ |
| १४. | नंदूरबार | ४० | ७ | ११७ | ... | ३३ | ... | १७९०९.०१ | ४१७८७.६९ |
| १५. | अहमदनगर | १४९ | ११५ | ६४४/१०३७ | ६५९०६.६३ | ३४ | ३५१५१.७० | २०५७२.७० | १८०००.८० |
| १६. | औरंगाबाद | ११० | १०२ | ८४३ | २९५०.७१ | ८ | ६८३२.५८ | ४३२२.०० | ६५१००.०० |
| १७. | जालना | ८८ | ८२ | ३५३ | ५२५१.२९ | ६ | २४६३०.४१ | १०८१५.२० | ६९८४.८२ |
| १८. | बीड | ११० | १०४ | १९७ | १८५६४.९६ | ६ | ... | १६११.१६ | ४७०.०० |
| १९. | नांदेड | ५३ | ६७ | ८४/१६ | २५७६.८७ | ३ | ८३२३.७५ | ३५०.०० | १८६.९४ |
| २०. | परभणी | ६९ | ६७ | १३६/१ | १३४५९.६२ | २ | ४११४.९६ | १४१७.४५ | ३५०.०० |
| २१. | हिंगोली | ३४ | ३४ | १०७/१४ | १११४६.५० | ... | ६०७.६४ | ... | ... |
| २२. | लातूर | ७६ | ७५ | १०५/१९ | १३९०२.०० | १ | २५३०.५० | १३७०.०० | १३७०.०० |
| २३. | उस्मानाबाद | ५९ | ५८ | ९६ | ९०७२.५१ | ३ | ७१२.८८ | ४०.९९ | २९.७१ |
| २४. | नागपूर | १७७ | १७० | २३६/३ | २३६३९.५७ | ३१ | १८५७५.१३ | १७१८९.८५ | १२७८५.९२ |
| २५. | भंडारा | ८१ | ८१ | १६५/६ | १३४४७.१७ | २ | १२३.४६ | १२.०० | २.०० |
| २६. | गोंदिया | ८० | ५० | २७७/९५ | १५१७६.७५ | ४ | ... | ५९.०० | ८६.०० |
| २७. | चंद्रपूर | १४८ | १३५ | ४४७/३ | ४१३५७.०० | २० | १२८५५.८० | ५६६०.०० | ७५६७.८८ |
| २८. | गडचिरोली | ५० | ४६ | ९१ | ६९३१.५५ | ५ | २४३१.५४ | १४९०.५४ | १०२०.०० |
| २९. | वर्धा | १४४ | १४१ | १४७ | १२४४३.८५ | ३ | १८५२.३५ | ७२५४.३८ | ३१६७.१५ |
| ३०. | अमरावती | ५३ | १७ | ५१५ | १७४११.७१ | ... | २१९१०.६७ | २७८८५.२६ | ५६५२१.७० |
| ३१. | यवतमाळ | १३५ | १२५ | १९० | १३८२७.२९ | ... | ६२१.७९ | १०९८३.१७ | १०९२३.१७ |
| ३२. | अकोला | १०२ | ८७ | ३८७ | २२५५१.३२ | १५ | ... | १००००.०० | १९२००.०० |
| ३३. | बुलढाणा | ६ | २ | १५९ | २७४३७.२२ | ४ | ६३५४.०६ | ३०१.४१ | ... |
| ३४. | वाशिम | २४५ | २२० | २४१ | १६४७२.३३ | २१ | ... | ५०००.५० | ११४७४.५२ |
| | **एकूण ...** | **३८१५.००** | **३२७४.००** | **९५०४/६०२४** | **५७५२४२.८६** | **५१५.००** | **२२९८८२.७४** | **२६७९०७.७६** | **५७१३५५.४२** |

# महाराष्ट्र जीवन प्राधिकरण

## महाराष्ट्र जीवन प्राधिकरण नागरी व ग्रामीण मंडळ

### तक्ता क्रमांक ५

### ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रम २०२३-२४ (विशेष घटक योजना)

(रुपये लाखात)

| अनु-क्रमांक | जिल्हा | सन १९९८-९९ ते २०२०-२१ या कालावधीतील एकूण योजना | पूर्ण झालेल्या योजना | समाविष्ट गावे/वाड्या (संख्या) | योजनेसाठी मार्च २०२२ अखेर झालेला एकूण खर्च | अपूर्ण योजना (प्रगती-पथावर) | अपूर्ण योजनेसाठी मार्च २०२२ अखेर झालेला खर्च | अपूर्ण योजने-साठी लागणारा आवश्यक निधी (२०२२-२३) | सन २०२३-२४ मधील अपेक्षित खर्च |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० |
| १. | ठाणे | ... | ... | ... | ... | निरंक | ... | ... | ... |
| २. | पालघर | ... | ... | ... | ... | निरंक | ... | ... | ... |
| ३. | रायगड | ... | ... | ... | ... | निरंक | ... | ... | ... |
| ४. | रत्नागिरी | ... | ... | ... | ... | निरंक | ... | ... | ... |
| ५. | सिंधुदूर्ग | ४ | ४ | ४/१० | ६५.८६ | ... | ... | ... | ... |
| ६. | पुणे | ... | ... | ... | ... | निरंक | ... | ... | ... |
| ७. | सातारा | ... | ... | ... | ... | निरंक | ... | ... | ... |
| ८. | सांगली | ४० | ४० | ४० | ३१०.७० | ... | ... | ... | ... |
| ९. | कोल्हापूर | ... | ... | ... | ... | निरंक | ... | ... | ... |
| १०. | सोलापूर | १० | १० | १० | ४५५.४२ | ... | ... | ... | ... |
| ११. | नाशिक | ... | ... | ... | ... | निरंक | ... | ... | ... |
| १२. | जळगाव | ... | ... | ... | ... | निरंक | ... | ... | ... |
| १३. | धुळे | ... | ... | ... | ... | निरंक | ... | ... | ... |
| १४. | नंदूरबार | ... | ... | ... | ... | निरंक | ... | ... | ... |
| १५. | अहमदनगर | ... | ... | ... | ... | निरंक | ... | ... | ... |
| १६. | औरंगाबाद | ... | ... | ... | ... | निरंक | ... | ... | ... |
| १७. | जालना | ... | ... | ... | ... | निरंक | ... | ... | ... |
| १८. | बीड | ... | ... | ... | ... | निरंक | ... | ... | ... |
| १९. | नांदेड | ... | ... | ... | ... | निरंक | ... | ... | ... |
| २०. | परभणी | ... | ... | ... | ... | निरंक | ... | ... | ... |
| २१. | हिंगोली | ... | ... | ... | ... | निरंक | ... | ... | ... |
| २२. | लातूर | ... | ... | ... | ... | निरंक | ... | ... | ... |
| २३. | उस्मानाबाद | ... | ... | ... | ... | निरंक | ... | ... | ... |
| २४. | नागपूर | १ | १ | १ | २७.०३ | ... | ... | ... | ... |
| २५. | भंडारा | ... | ... | ... | ... | निरंक | ... | ... | ... |
| २६. | गोंदिया | ... | ... | ... | ... | निरंक | ... | ... | ... |
| २७. | चंद्रपूर | ... | ... | ... | ... | निरंक | ... | ... | ... |
| २८. | गडचिरोली | ... | ... | ... | ... | निरंक | ... | ... | ... |
| २९. | वर्धा | ... | ... | ... | ... | निरंक | ... | ... | ... |
| ३०. | अमरावती | ६ | ६ | ९ | १९०.४७ | ... | ... | ... | ... |
| ३१. | यवतमाळ | १ | १ | २ | १५.०८ | ... | १५.०८ | ... | ... |
| ३२. | अकोला | १५ | ... | ५२३ | ... | १५ | ... | ३००० | ६००० |
| ३३. | बुलढाणा | ... | ... | ... | ... | निरंक | ... | ... | ... |
| ३४. | वाशिम | ८८ | ७३ | ८८ | ५४३.७२ | १५ | ६८.४३ | १८१.५७ | ... |
| | एकूण ... | १६५ | १३५ | ६७७/१० | १६०८.२८ | ३० | ८३.५१ | ३१८१.५७ | ६०००.०० |

# महाराष्ट्र जीवन प्राधिकरण

## महाराष्ट्र जीवन प्राधिकरण नागरी व ग्रामीण मंडळ

### तक्ता क्रमांक ६

### ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रम २०२३-२४ (आदिवासी उपाययोजना)

(रुपये लाखात)

| अनु-क्रमांक | जिल्हा | सन १९९८-९९ ते २०२०-२१ या कालावधीतील एकूण योजना | पूर्ण झालेल्या योजना | समाविष्ट गावे/वाड्या (संख्या) | योजनेसाठी मार्च २०२२ अखेर झालेला एकूण खर्च | अपूर्ण योजना (प्रगती-पथावर) | अपूर्ण योजनेसाठी मार्च २०२२ अखेर झालेला खर्च | अपूर्ण योजने-साठी लागणारा आवश्यक निधी (२०२२-२३) | सन २०२३-२४ मधील अपेक्षित खर्च |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० |
| १. | ठाणे | ... | ... | ... | निरंक | ... | ... | ... | ... |
| २. | पालघर | ... | ... | ... | निरंक | ... | ... | ... | ... |
| ३. | रायगड | ... | ... | ... | निरंक | ... | ... | ... | ... |
| ४. | रत्नागिरी | ... | ... | ... | निरंक | ... | ... | ... | ... |
| ५. | सिंधुदूर्ग | ... | ... | ... | निरंक | ... | ... | ... | ... |
| ६. | पुणे | ... | ... | ... | निरंक | ... | ... | ... | ... |
| ७. | सातारा | ... | ... | ... | निरंक | ... | ... | ... | ... |
| ८. | सांगली | ... | ... | ... | निरंक | ... | ... | ... | ... |
| ९. | कोल्हापूर | ... | ... | ... | निरंक | ... | ... | ... | ... |
| १०. | सोलापूर | ... | ... | ... | निरंक | ... | ... | ... | ... |
| ११. | नाशिक | ... | ... | ... | निरंक | ... | ... | ... | ... |
| १२. | जळगाव | ... | ... | ... | निरंक | ... | ... | ... | ... |
| १३. | धुळे | ... | ... | ... | निरंक | ... | ... | ... | ... |
| १४. | नंदूरबार | ... | ... | ... | निरंक | ... | ... | ... | ... |
| १५. | अहमदनगर | ... | ... | ... | निरंक | ... | ... | ... | ... |
| १६. | औरंगाबाद | ... | ... | ... | निरंक | ... | ... | ... | ... |
| १७. | जालना | ... | ... | ... | निरंक | ... | ... | ... | ... |
| १८. | बीड | ... | ... | ... | निरंक | ... | ... | ... | ... |
| १९. | नांदेड | ७ | ७ | १२ | १३७.११ | ... | ... | ... | ... |
| २०. | परभणी | ... | ... | ... | निरंक | ... | ... | ... | ... |
| २१. | हिंगोली | ... | ... | ... | निरंक | ... | ... | ... | ... |
| २२. | लातूर | ... | ... | ... | निरंक | ... | ... | ... | ... |
| २३. | उस्मानाबाद | ... | ... | ... | निरंक | ... | ... | ... | ... |
| २४. | नागपूर | ४ | ४ | ५ | ३०१.२९ | ... | ... | ... | ... |
| २५. | भंडारा | ... | ... | ... | निरंक | ... | ... | ... | ... |
| २६. | गोंदिया | ... | ... | ... | निरंक | ... | ... | ... | ... |
| २७. | चंद्रपूर | ... | ... | ... | निरंक | ... | ... | ... | ... |
| २८. | गडचिरोली | ... | ... | ... | निरंक | ... | ... | ... | ... |
| २९. | वर्धा | ... | ... | ... | निरंक | ... | ... | ... | ... |
| ३०. | अमरावती | ... | ... | ... | निरंक | ... | ... | ... | ... |
| ३१. | यवतमाळ | १० | १० | १३ | ३६६.९० | ... | ... | ... | ... |
| ३२. | अकोला | १५ | ... | ५२३ | ... | १५ | ... | २४०० | ४८०० |
| ३३. | बुलढाणा | ... | ... | ... | निरंक | ... | ... | ... | ... |
| ३४. | वाशिम | ... | ... | ... | निरंक | ... | ... | ... | ... |
| | एकूण ... | ३६ | २१ | ५५३ | ८०५.३० | १५ | ... | २४०० | ४८०० |

**तक्ता क्रमांक ७**

**जिल्हा परिषदांकडील पाणी पुरवठा विभागातील नियमित कर्मचारी वर्गाचा तपशील**

| अनुक्रमांक | पदनाम | ६ व्या वेतन आयोगातील वेतनश्रेणी (वेतन बँड | + ग्रेड वेतन) | ७ व्या वेतन आयोगातील सुधारित वेतनश्रेणी (Pay Level in Revised Pay Matrix) | मंजूर पदे |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | | ४ | ५ |
| | **राजपत्रित गट—अ** | | | | |
| १. | कार्यकारी अभियंता | १५,६००–३९,१०० | ६,६०० | S-२३ : ६७७००-२०८७०० | ३४ |
| २. | उपअभियंता (स्थापत्य) | १५,६००–३९,१०० | ५,४०० | S-२० : ५६१००-१७७५०० | ३८९ |
| ३. | उपअभियंता (यांत्रिकी) | १५,६००–३९,१०० | ५,४०० | S-२० : ५६१००-१७७५०० | ६८ |
| | **राजपत्रित गट—ब** | | | | |
| ४. | सहायक भू-वैज्ञानिक | ९,३००–३४,८०० | ५,००० | S-१९ : ५५१००-१७५१०० | ३४ |
| ५. | कनिष्ठ भू-वैज्ञानिक | ९,३००–३४,८०० | ४,९०० | S-१६ : ४४९००-१४२४०० | ६८ |
| | **अराजपत्रित गट—क** | | | | |
| ६. | कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) | ९,३००–३४,८०० | ४,३०० | S-१४ : ३८६००-१२२८०० | २२६६ |
| ७. | कनिष्ठ अभियंता (यांत्रिकी) | ९,३००–३४,८०० | ४,३०० | S-१४ : ३८६००-१२२८०० | १०२ |
| ८. | सहायक लेखाधिकारी | ९,३००–३४,८०० | ४,३०० | S-१४ : ३८६००-१२२८०० | ३४ |
| ९. | कक्ष अधिकारी | ९,३००–३४,८०० | ४,३०० | S-१४ : ३८६००-१२२८०० | ३४ |
| १०. | सहायक आवेदक | ५,२००–२०,२०० | २,४०० | S-८ : २५५००-८११०० | ३४ |
| ११. | वरिष्ठ सहायक | ५,२००–२०,२०० | २,४०० | S-८ : २५५००-८११०० | ३८९ |
| १२. | वरिष्ठ सहायक (लेखा) | ५,२००–२०,२०० | २,४०० | S-८ : २५५००-८११०० | ३४ |
| १३. | यांत्रिकी | ५,२००–२०,२०० | २,४०० | S-८ : २५५००-८११०० | ३४ |
| १४. | रिंगमन | ५,२००–२०,२०० | २,४०० | S-७ : २१७००-६९१०० | ३४ |
| १५. | कनिष्ठ सहायक | ५,२००–२०,२०० | १,९०० | S-६ : १९९००-६३२०० | ५९३ |
| | | | | **एकूण (अ+ब+क)** | **४१४७** |

**जिल्हा परिषदांकडील बाह्ययंत्रणेमार्फत भरावयाच्या कर्मचारी वर्गाचा तपशील**

| अनुक्रमांक | पदनाम | मंजूर पदे |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| | **अराजपत्रित गट—ड** | |
| १. | वाहन चालक | ४२३ |
| २. | चतुर्थ श्रेणी कर्मचारी (नाईक, परिचर/शिपाई, चौकीदार, मदतनीस) | ८८० |
| ३. | माहिती शिक्षण व सुसंवाद तज्ञ (MSW) | ३४ |
| ४. | डाटा एन्ट्री ऑपरेटर | ४२३ |
| | **एकूण (१+२+३+४)** | **१७६०** |

## स्वच्छ भारत अभियान (ग्रामीण)

राज्यात दिनांक २ ऑक्टोबर, २०१४ पासून स्वच्छ भारत अभियान (ग्रामीण) ही केंद्र पुरस्कृत महत्वाकांक्षी योजना पाणी पुरवठा व स्वच्छता विभागांतर्गत राबविण्यात येत आहे.

**२.** सन २०१२ मध्ये झालेल्या पायाभूत सर्वेक्षणानुसार, महाराष्ट्रातील एकूण १,१०,५५,४६२ कुटुंबांपैकी ६०,४२,९१३ कुटुंबांकडे वैयक्तिक शौचालये नव्हती. अशा कुटुंबांपैकी दारिद्र्य रेषेखालील सर्व कुटुंबे व दारिद्र्यरेषेवरील अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, लघु शेतकरी, सिमान्त शेतकरी, भूमिहीन शेतमजूर, शारीरिकदृष्ट्या अपंग आणि महिला कुटुंब प्रमुख यांनी, वैयक्तिक स्वच्छतागृह बांधून वापर सुरू केल्यास, रु. ४६०० इतके प्रोत्साहन पर अनुदान केंद्र व राज्य शासनाकडून देण्यात येत होते. दिनांक २ ऑक्टोबर, २०१४ पासून केंद्र शासनाने तेव्हा सुरु केलेल्या निर्मल भारत अभियानाचे नामकरण स्वच्छ भारत अभियान (ग्रामीण) असे केले. केंद्र शासनाने ऑक्टोबर, २०१५ मध्ये वैयक्तिक शौचालयांच्या प्रोत्साहन अनुदानाच्या हिस्स्यामध्ये ७५:२५ (केंद्र व राज्य) वरून ६०:४० (केंद्र व राज्य) असा बदल केला आहे. त्यानुसार वैयक्तिक शौचालयाच्या लाभार्थी घटकांना रु. १२००० (केंद्र हिस्सा रु. ७२०० व राज्य हिस्सा रु. ४८००) प्रोत्साहन अनुदान देण्यात येत आहे.

**३.** स्वच्छ भारत अभियान (ग्रामीण) संकेतस्थळावरील नोंदीनुसार सन २०१२ च्या पायाभूत सर्वेक्षणातील शौचालये नसलेल्या कुटुंबांपैकी एकूण ५९,३८,३३६ पात्र कुटुंबांना शौचालय सुविधा उपलब्ध करण्यात आली आहे. उरलेल्या कुटुंबांना त्यावेळी सामायिक व सार्वजनिक शौचालय सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या. दिनांक १८ एप्रिल, २०१८ रोजी संपूर्ण ग्रामीण महाराष्ट्र राज्य पायाभूत सर्वेक्षणानुसार हागणदारीमुक्त झाल्याचे घोषित करण्यात आले आहे. ग्रामीण महाराष्ट्र हागणदारीमुक्त घोषित झाल्यानंतरसुद्धा विविध घटकांच्या वैयक्तिक शौचालयांची एकूण १३,२४,११२ बांधकामे पूर्ण करण्यात आली आहेत. यामध्ये,

- पायाभूत सर्वेक्षणातून सुटलेली कुटुंबे (LOB)– ६,९६,००२
- पायाभूत सर्वेक्षणाबाहेरील वैयक्तिक शौचालय सुविधा उपलब्ध नाहीत अशी कुटुंबे (NLOB)– ३,५३,१६५ आणि
- पहिल्या टप्प्यामधून सुटलेली व नव्याने निर्माण झालेली कुटुंबे (New IHHL)– २,७४,९४५ अशी कुटुंबे होती.

**स्वच्छ भारत अभियान (ग्रामीण) टप्पा-२ :-**

केंद्र शासनाने जुलै, २०२० मध्ये स्वच्छ भारत अभियान (ग्रामीण) टप्पा-२ च्या (२०२०-२१ ते २०२४-२५) मार्गदर्शक सूचना निर्गमित केल्या असून, सदर मार्गदर्शक सूचनांनुसार या योजनेंतर्गत कार्यवाही करावयाची आहे. संपूर्ण ग्रामीण स्वच्छता व स्वच्छता शाश्वत टिकविण्याच्या अनुषंगाने स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) दुसऱ्या टप्प्यांतर्गत ग्रामीण भागातील घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापनाचे नियोजन करण्यात येत आहे.

राज्य मंत्रीमंडळाच्या दि. २८ जूलै, २०२१ च्या बैठकीत राज्यात केंद्र पुरस्कृत स्वच्छ भारत अभियान (ग्रामीण), टप्पा-२ ही योजना आर्थिक वर्ष २०२०-२१ ते २०२४-२५ या कालावधीत राबविण्यास मान्यता देण्यात आली आहे. त्याअंतर्गत एकूण रु. १०७७१३८.४८ लक्ष इतक्या रकमेचा प्रकल्प अंमलबजावणी आराखडा तयार करण्यात आला आहे. यामध्ये स्वच्छ भारत अभियान (ग्रा), १५ वा वित्त आयोग, मनरेगा व इतर योजना यांच्या कृतीसंगमाने निधी घ्यावयाचा आहे. त्यानुषंगाने स्वच्छ भारत अभियान (ग्रामीण) टप्पा-२ च्या अंमलबजावणीबाबत, पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाच्या दि. ११ ऑक्टोबर, २०२१ च्या शासन निर्णयान्वये मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत.

स्वच्छ भारत अभियान (ग्रामीण) टप्पा-२ अंतर्गत गावात वैयक्तिक शोचालय व सार्वजनिक शौचालय बांधकाम, घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापन, मैला गाळ व्यवस्थापन, प्लॅस्टिक कचरा व्यवस्थापन या बाबींचे उद्दिष्ट पूर्ण करून गाव हागणदारीमुक्त अधिक (ODF +) घोषित करावयाचे आहे. तसेच तालुकास्तरावर प्लॅस्टीक कचरा व्यवस्थापन युनिट व जिल्हास्तरावर गोबरधन प्रकल्प कार्यान्वित करावयाचे आहे.

सन २०२२-२३ या आर्थिक वर्षात २७,६५९ गावांतील घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापनाची (SLWM) कामे पूर्ण करण्याचे नियोजन असून १५,५०० गावे हागणदारीमुक्त अधिक (ODF +) घोषित करण्याचे उद्दिष्ट केंद्र शासनास कळविण्यात आले आहे. तथापि, राज्याने २२,३३० गावे हागणदारीमुक्त अधिक (ODF +) घोषित करण्याचे नियोजन केले आहे. दिनांक ३१-०१-२०२३ पर्यंत १४०६८ गावांतून घनकचरा तर १३६२७ गावातून सांडपाणी व्यवस्थापनाची कामे सुरू होवून, त्यापैकी ६२८६ गावात घनकचरा व्यवस्थापनाची व ६०२३ गावात सांडपाणी व्यवस्थापनाची कामे पूर्ण करण्यात आलेली आहेत.

माहे, जानेवारी-२०२३ अखेरपर्यंत ३४५६ गावे हागणदारीमुक्त अधिक (ODF +) घोषित करण्यात आलेली आहेत व त्यांची नोंद SBM-MIS संकेतस्थळावर नोंद घेण्यात आलेली आहे. जिल्हानिहाय हागणदारीमुक्त अधिक (ODF +) घोषित गावांची यादी सोबत जोडण्यात आलेली आहे.

सन २०२२-२३ या आर्थिक वर्षात दिनांक ३१-०१-२०२३ पर्यंत नव्याने निर्माण झालेली कुटुंबे (New IHHL) यांतर्गत ७८,५२० वैयक्तिक शौचालय व सार्वजनिक शौचालयांतर्गत (CSC) ३,२२४ सार्वजनिक शौचालयांचे बांधकाम पूर्ण करण्यात आले असून २७३४ सार्वजनिक शौचालयांचे बांधकामे प्रगतीपथावर आहेत. शाळा व अंगणवाड्यांमध्ये शौचालये बांधण्याची जबाबदारी ही अनुक्रमे शालेय शिक्षण व क्रिडा विभागाकडे आणि महिला व बालविकास विभागामार्फत हाताळण्यात येते.

सन २०२२-२३ या आर्थिक वर्षात जानेवारी-२०२३ अखेर पर्यंत केंद्र हिस्सा रु. ७८०६.६१ लक्ष व राज्य हिस्सा रु. ५३१६.२२ लक्ष रुपये असा एकूण रु. १३१२२.८३ लक्ष खर्च झालेला आहे. स्वच्छ भारत मिशन (ग्रामिण) योजनेंतर्गत, सन २०२२-२३ या आर्थिक वर्षासाठी सर्वसाधारण घटक, अनुसूचित जाती घटक व अनुसूचित जमाती घटक या तीन घटकांच्या केंद्र हिश्श्यापोटी अनुक्रमे रु. १४१०६०.०० लक्ष, रु. ११८८.०० लक्ष व रु. १०८०.०० लक्ष इतका निधी व राज्य हिश्श्यापोटी अनुक्रमे रु. ४००००.०० लक्ष, रु. ७९२.०० लक्ष व रु. ५००.०० लक्ष इतका निधी अर्थसंकल्पित करण्यात आलेला आहे.

स्वच्छ भारत अभियान (ग्रामीण) टप्पा-२ अंतर्गत विविध कामांकरिता घटकनिहाय निधी अनुज्ञेयता विगतवारी खालील प्रमाणे आहे—

| अ. क्र. | घटक | विवरण | निधीची विगतवारी | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | केंद्र हिस्सा | राज्य हिस्सा | लाभार्थी हिस्सा |
| १. | माहिती, शिक्षण, संवाद, सुरुवातीची कामे, क्षमता बांधणी (IEC) | एकूण प्रकल्पाच्या ५ टक्के पर्यंत (३ टक्के पर्यंत निधी राज्य/जिल्हा स्तराकरिता व २ टक्के पर्यंत निधी केंद्र स्तराकरिता) | ६० टक्के | ४० टक्के | ०० टक्के |
| २. | प्रशासकीय खर्च | एकूण प्रकल्प किंमतीच्या १ टक्के पर्यंत | ६० टक्के | ४० टक्के | ०० टक्के |
| ३. | फिरता निधी | एकूण प्रकल्प किंमतीच्या ५ टक्के (प्रती जिल्हा रु. १.५० कोटीपर्यंत) | ६० टक्के | ४० टक्के | ०० टक्के |

| अ. क्र. | घटक | विवरण | निधीची विगतवारी | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | केंद्र हिस्सा | राज्य हिस्सा | लाभार्थी हिस्सा |
| ४. | वैयक्तिक शौचालय | तरतुदीनुसार सर्वांना सहभागी करून घेण्यासाठी प्रत्यक्ष देण्यात येणारे एकूण प्रति शौचालय अनुदान रु. १२,०००/– | रु. ७,२००/– ६० टक्के | रु. ४,८००/– ४० टक्के | ... ०० टक्के |
| ५. | सार्वजनिक शौचालय/ सामुदायिक शौचालय (CSC) | तरतुदीनुसार सर्वांना सहभागी करून घेण्यासाठी प्रत्यक्ष येणारा एकूण खर्च (प्रती रुपये तीन लाखाच्या मर्यादेत) | ६० टक्के | ४० टक्के | ३० टक्के CSC करिता मंजूर रु. ३ लक्ष रकमेपैकी ३०% हिस्सा संबंधित ग्रामपंचायतीने १५ व्या वित्त आयोगातून उपलब्ध करावा. उर्वरित ७०% रक्कम केंद्र व राज्य हिस्स्यात ६०:४० प्रमाणात लागू राहील. |
| ६. | ग्रामपंचायत स्तरावरील घनकचरा/ सांडपाणी व्यवस्थापन (भांडवली किंमत) | ५००० पर्यंत लोकसंख्या गावांकरिता घनकचरा व्यवस्थापनाकरिता रु. ६० प्रति व्यक्ती. सांडपाणी व्यवस्थापनाकरिता रु. २८० प्रति व्यक्ती. | ६० टक्के | ४० टक्के | स्वच्छ भारत अभियान (ग्रा) टप्पा-२ अंतर्गत घनकचरा/ सांडपाणी व्यवस्थापन करिता अनुज्ञेय अनुदानातून कामासाठी लागणाऱ्या मजुरीची रक्कम (मजुरी भाग मनरेगा वा इतर स्त्रोतातून) वजा केल्यानंतर, उरणाऱ्या रकमेकरिता सदर ग्रामपंचायतीने १५ व्या वित्त आयोगातून ३० टक्के तरतूद भागवावयाची आहे. उर्वरित ७० टक्के रक्कम केंद्र व राज्य हिस्स्यात ६०:४० प्रमाणात लागू राहील. |
| | | ५००० पेक्षा जास्त लोकसंख्या गावांकरिता घनकचरा व्यवस्थापनाकरिता रु. ४५ प्रति व्यक्ती. सांडपाणी व्यवस्थापनाकरिता रु. ६६० प्रति व्यक्ती. | ६० टक्के | ४० टक्के | |
| ७. | जिल्हास्तरावरील घनकचरा/ सांडपाणी व्यवस्थापन | प्लॅस्टीक कचरा व्यवस्थापन युनिटकरीता रु. १६.०० लक्षपर्यंत (प्रत्येक तालुक्यामध्ये १). | ६० टक्के | ४० टक्के | ०० टक्के |
| | | मैला गाळ व्यवस्थापन प्रति व्यक्ती रु. २३० पर्यंत. | ६० टक्के | ४० टक्के | ०० टक्के |
| | | गोबरधन प्रकल्प रु. ५०.०० लक्षपर्यंत (प्रति जिल्हास्तरावर १). | ६० टक्के | ४० टक्के | ०० टक्के |

**संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियान :–**

ग्रामीण जनतेचे आरोग्यमान उंचावण्यासाठी सन २०००-२००१ पासून संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियान राबविण्यात येत आहे. या अभियानांतर्गत जन जागृतीचा व्यापक कार्यक्रम अंमलात आणण्यात आला. त्यामधून लोकांच्या पुढाकारामध्ये शासनाचा सहभाग असा नवीन विचार विकास योजनांना देण्यात आला. लोकांना प्रोत्साहन देण्यासाठी या अभियानांतर्गत राष्ट्रसंत तुकडोजी महाराज स्वच्छ ग्राम स्पर्धा सुरु केली आहे. या अभियानास लोकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाल्याने, हा कार्यक्रम आता कायमस्वरुपी राबविण्यात येत आहे.

२. स्वच्छ भारत मिशन (ग्रा) टप्पा-२ तसेच विविध उपक्रम व कार्यक्रमांतून सार्वजनिक व वैयक्तिक स्वच्छतेच्या मालमत्ता व साधन-सुविधा निर्माण करण्यात आल्या आहेत. तसेच यापूढेही निर्माण करण्यात येणार आहेत. सदर स्वच्छतेच्या मत्तांची व साधन-सुविधांची निगा राखणे, सुस्थितीत ठेवणे व त्याचा सतत सुयोग्य वापर करणे. यासाठी मनुष्यबळ व निधी उपलब्ध करून, स्वच्छता मत्तांची निर्मिती, दुरुस्ती व देखभाल करणाऱ्या ग्रामस्थ व ग्रामपंचायतींच्या प्रयत्नांची दखल घेवून, त्यांच्या प्रयत्नांकरिता ग्रामपंचायतींना रोख बक्षिसे व सन्मानचिन्ह देवून, त्यांचा गौरव या अभियानांतील स्पर्धेतून करण्यात येतो. स्वच्छतेसंबंधित विहीत बाबी या अभियानातील विविध स्पर्धेत समाविष्ट करण्यात आल्या आहेत. त्यानुषंगाने कार्यपद्धती, गुणांकन निकष, तपासणी पद्धती यांत यथोचित बदल करून, सन २०२२-२३ व त्यापुढील कालावधीत संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियान राबविण्यासाठी नव्याने एकत्रित मार्गदर्शक सूचना दिनांक ०७ ऑक्टोबर, २०२२ च्या शासन निर्णयान्वये निर्गमित करण्यात आल्या आहेत.

३. यानुसार संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियानातील राष्ट्रसंत तुकडोजी महाराज स्वच्छ ग्राम स्पर्धेअंतर्गत जिल्हा परिषद गट स्तर, जिल्हा परिषद स्तर, विभाग स्तर व राज्य स्तरावर पात्र ग्रामपंचायतींना पुरस्कार देण्यात येतात. या अभियानांतर्गत सांडपाणी व्यवस्थापन, पाणी गुणवत्ता व पाणी व्यवस्थापन आणि शौचालय व्यवस्थापन या स्पर्धांमध्ये पात्र ठरणाऱ्या ग्रामपंचायतींना जिल्हा, विभाग व राज्यस्तरावर विशेष पुरस्कारही प्रदान करण्यात येतात. संत गाडगेबाबा सन २०२२-२३ या वर्षाकरिता ग्राम स्वच्छता अभियानाकरिता रु. ४९००.०० लक्ष इतका निधी अर्थसंकल्पित करण्यात आलेला आहे. तसेच अभियानांतर्गत स्वच्छतेसंदर्भातील विविध उपक्रमांमध्ये (प्रत्येक बाबीमध्ये) सर्वोत्तम कामगिरी करणाऱ्या ग्रामपंचायतीचे ग्रामसेवक, पंचायत समिती व जिल्हा परिषदमधील घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापन तज्ञ (SWM/LWM/SLWM तज्ञ) पंचायत समितीचे गटविकास अधिकारी, पंचायत समिती तसेच, जिल्हास्तरावर जिल्हा समन्वयक (स्वच्छ भारत अभियान) व प्रकल्प संचालक (जल जीवन मिशन)/उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पाणी व स्वच्छता) यांना राज्यस्तरावरून प्रशस्तीपत्रक व मानचिन्ह देण्यात येणार आहे.

४. संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियानात प्रामुख्याने खालील पुरस्कारांचा समावेश आहे.

**(अ) राष्ट्रसंत तुकडोजी महाराज स्वच्छ ग्राम स्पर्धा पुरस्कार :-**

या स्पर्धेअंतर्गत प्रत्येक स्तरावरील पुरस्कार प्राप्त ग्रामपंचायतींना खालीलप्रमाणे रकमा प्रदान करण्यात येतात :-

| अ.क्र. | पुरस्कार स्तर | पुरस्कार रक्कम | | |
|---|---|---|---|---|
| | | प्रथम | द्वितीय | तृतीय |
| १. | जिल्हा परिषद गट | रु. ६०,००० | ... | ... |
| २. | जिल्हास्तर | रु. ६ लक्ष | रु. ४ लक्ष | रु. ३ लक्ष |
| १९. | नांदेड | ७ | ७ | ३५९६.१९ | २३३३.६२ | १२६२.५७ | कामे प्रगतीपथावर. |
| २०. | परभणी | २ | १ | ३४५.८२ | ३२३.११ | २२.७१ | कामे प्रगतीपथावर. |
| २१. | हिंगोली | ... | ... | ... | ... | ... | ... |
| २२. | लातूर | ... | ... | ... | ... | ... | ... |
| २३. | उस्मानाबाद | २ | २ | १०५६२.०६ | ७४२९.४७ | १४१७.८१ | कामे प्रगतीपथावर. |
| २४. | नागपूर | ११ | १० | ८२२.२५ | ६२६.८२ | १९३.२४ | कामे पूर्ण. |
| २५. | भंडारा | १ | १ | १३१०.४३ | ७२८.०८ | ५०.०० | कामे पूर्ण. |
| २६. | गोंदिया | २ | २ | ९४६७.८९ | ९१३३.०० | १००.०० | कामे प्रगतीपथावर. |
| २७. | चंद्रपूर | ५ | ५ | १३९५४.५७ | ८४११.८२ | २६५०.०० | कामे प्रगतीपथावर. |
| २८. | गडचिरोली | ३ | ३ | ६०८.८० | ३०६.५२ | २४५.१० | कामे प्रगतीपथावर. |
| २९. | वर्धा | २ | २ | ४८५६.८२ | ३०४५.०१ | ८००.०० | ... |
| ३०. | अमरावती | ... | ... | ... | ... | ... | ... |
| ३१. | यवतमाळ | ८ | ५ | १७६४.४६ | ३५३.०९ | १५९.०० | कामे प्रगतीपथावर. |
| ३२. | अकोला | ८ | ८ | २०७५.९२ | १४९०.३६ | ६१८.२२ | कामे पूर्ण. |
| ३३. | बुलढाणा | १ | १ | ९९.८९ | ९९.८९ | ... | कामे पूर्ण. |
| ३४. | वाशिम | २ | २ | ४६३.८८ | २२.१६ | २४१.१२ | कामे प्रगतीपथावर. |
| | **एकूण...** | **७८** | **६८** | **१६८८७५.५६** | **६३१५२.६०** | **७३४०७.८९** | |

**तक्ता क्रमांक ११**

**महाराष्ट्र जीवन प्राधिकरण**

## महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामधील नियमित आस्थापनेवरील मंजूर पदे दर्शविणारे प्रपत्र (२०२३-२४)

| अ. क्र. | संवर्ग | ६ व्या वेतन आयोगातील वेतनश्रेणी | | ७ व्या वेतन आयोगातील सुधारीत वेतनश्रेणी | एकूण पदे |
|---|---|---|---|---|---|
| | | वेतन बॅन्ड Pay Band | ग्रेड वेतन Grade Pay | Pay Level in Revised Pay Matrix | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १. | सदस्य सचिव (प्रशासन) | पीबी-४ः ३७,४००-६७,००० | १०,००० | एस-३० : १,४४,२००-२,१८,२०० | १ |
| २. | मुख्य अभियंता | पीबी-४ः ३७,४००–६७,००० | ८,९०० | एस-२९ : १,३१,१००-२,१६,६०० | ६ |
| ३. | संचालक (वित्त) | पीबी-४ः ३७,४००–६७,००० | ८,९०० | एस-२९ : १,३१,१००-२,१६,६०० | १ |
| ४. | मुख्य प्रशासकीय अधिकारी | पीबी-३ः १५,६००–३९,१०० | ७,६०० | एस-२५ : ७८,८००-२,०९,२०० | १ |
| ५. | उप मुख्य लेखाधिकारी | पीबी-३ः १५,६००–३९,१०० | ७,६०० | एस-२५ : ७८,८००-२,०९,२०० | २ |
| ६. | अधीक्षक अभियंता (स्थापत्य) | पीबी-३ः १५,६००–३९,१००<br>पीबी-४ः ३७,४००–६७,०००<br>(२० टक्के पदांसाठी निवडश्रेणी) | ७,६००<br>८,७०० | एस-२५ : ७८,८००-२,०९,२००<br>एस-२७ : १,१८,५००-२,१४,१००<br>(२० टक्के पदांसाठी निवडश्रेणी) | २१ |
| ७. | अधीक्षक अभियंता (यांत्रिकी) | पीबी-३ः १५,६००–३९,१००<br>पीबी-४ः ३७,४००–६७,०००<br>(२० टक्के पदांसाठी निवडश्रेणी) | ७,६००<br>८,७०० | एस-२५ : ७८,८००-२,०९,२००<br>एस-२७ : १,१८,५००-२,१४,१००<br>(२० टक्के पदांसाठी निवडश्रेणी) | २ |
| ८. | आस्थापना अधिकारी (दक्षता) | पीबी-३ : १५,६००–३९,१०० | ६,६०० | एस-२३ : ६७,७००-२,०८,७०० | १ |
| ९. | कार्यकारी अभियंता (स्थापत्य) | पीबी-३ : १५,६००–३९,१०० | ६,६०० | एस-२३ : ६७,७००-२,०८,७०० | ५७ |
| १०. | कार्यकारी अभियंता (यांत्रिकी) | पीबी-३ : १५,६००–३९,१०० | ६,६०० | एस-२३ : ६७,७००-२,०८,७०० | १४ |
| ११. | प्रशासकीय-नि-आस्थापना अधिकारी | पीबी-२ : ९,३००–३४,८०० | ५,४०० | एस-२० : ५६,१००-१,७७,५०० | १ |
| १२. | वरिष्ठ लेखा अधिकारी | पीबी-३ : १५,६००–३९,१०० | ५,४०० | एस-२० : ५६,१००-१,७७,५०० | ३ |
| १३. | अंतर्गत लेखापरीक्षा अधिकारी | पीबी-३ : १५,६००–३९,१०० | ५,४०० | एस-२० : ५६,१००-१,७७,५०० | ६ |
| १४. | कायदा व कामगार अधिकारी | पीबी-२ : ९,३००–३४,८०० | ४,६०० | एस-१६ : ४४,९००-१,४२,४०० | १ |
| १५. | कक्ष अधिकारी/विशेष अधीक्षक | पीबी-२ : ९,३००–३४,८०० | ४,४०० | एस-१५ : ४१,८००-१,३२,३०० | ८ |
| १६. | लेखा अधिकारी | पीबी-२ : ९,३००–३४,८०० | ४,४०० | एस-१५ : ४१,८००-१,३२,३०० | १९ |
| १७. | उप अभियंता/सहायक कार्यकारी अभियंता/सहायक अभियंता अभियंता श्रेणी-१ (स्थापत्य) | पीबी-३ : १५,६००–३९,१०० | ५,४०० | एस-२० : ५६,१००-१,७७,५०० | २४१ |
| १८. | उप विभागीय अधिकारी/ उप अभियंता (यांत्रिकी) | पीबी-३ : १५,६००–३९,१०० | ५,४०० | एस-२० : ५६,१००-१,७७,५०० | ३४ |
| १९. | उच्च श्रेणी लघुलेखक | पीबी-२ : ९,३००–३४,८०० | ४,४०० | एस-१५ : ४१,८००-१,३२,३०० | १८ |
| २०. | सहायक अभियंता (श्रेणी-२) (स्थापत्य) | पीबी-२ : ९,३००–३४,८०० | ४,४०० | एस-१५ : ४१,८००-१,३२,३०० | २३५ |
| २१. | सहायक अभियंता (श्रेणी-२) (यांत्रिकी) | पीबी-२ : ९,३००–३४,८०० | ४,४०० | एस-१५ : ४१,८००-१,३२,३०० | ३१ |
| २२. | कार्यासन अधिकारी/अधीक्षक | पीबी-२ : ९,३००–३४,८०० | ४,३०० | एस-१४ : ३८,६००-१,२२,८०० | २० |
| २३. | भांडार अधीक्षक | पीबी-२ : ९,३००–३४,८०० | ४,३०० | एस-१४ : ३८,६००-१,२२,८०० | ४ |
| २४. | सहा. लेखाधिकारी/मुख्य लेखापाल | पीबी-२ : ९,३००–३४,८०० | ४,३०० | एस-१४ : ३८,६००-१,२२,८०० | २९ |
| २५. | कनिष्ठ अभियंता/शाखा अभियंता (स्थापत्य) | पीबी-२ : ९,३००–३४,८००<br>पीबी-२ : ९,३००–३४,८०० | ४,३००<br>४,४०० | एस-१४ : ३८,६००-१,२२,८००<br>एस-१५ : ४१,८००-१,३२,३००<br>(विहीत कालावधीच्या सेवेनंतर) | ७०७ |
| २६. | कनिष्ठ अभियंता/शाखा अभियंता (यांत्रिकी) | पीबी-२ : ९,३००–३४,८००<br>पीबी-२ : ९,३००–३४,८०० | ४,३००<br>४,४०० | एस-१४ : ३८,६००-१,२२,८००<br>एस-१५ : ४१,८००-१,३२,३००<br>(विहीत कालावधीच्या सेवेनंतर) | ८७ |
| २७. | विभागीय लेखापाल | पीबी-२ : ९,३००–३४,८०० | ४,२०० | एस-१३ : ३५,४००-१,१२,४०० | ५१ |
| २८. | वीज पर्यवेक्षक | पीबी-२ : ९,३००–३४,८०० | ४,२०० | एस-१३ : ३५,४००-१,१२,४०० | १ |
| २९. | प्रथम लिपिक | पीबी-२ : ९,३००–३४,८०० | ४,२०० | एस-१३ : ३५,४००-१,१२,४०० | ६४ |
| ३०. | निम्न श्रेणी लघुलेखक | पीबी-२ : ९,३००–३४,८०० | ४,३०० | एस-१४ : ३८,६००-१,२२,८०० | २९ |
| ३१. | उप लेखापाल | पीबी-२ : ९,३००–३४,८०० | ४,२०० | एस-१३ : ३५,४००-१,१२,४०० | ३७ |
| ३२. | भांडारपाल | पीबी-२ : ९,३००–३४,८०० | ४,२०० | एस-१३ : ३५,४००-१,१२,४०० | ३३ |
| ३३. | उभारक (इरेक्टर) | पीबी-२ : ९,३००–३४,८०० | ४,२०० | एस-१३ : ३५,४००-१,१२,४०० | २ |
| ३४. | गाळणी निरीक्षक | पीबी-१ : ५,२००–२०,२०० | २,८०० | एस-१० : २९,२००-९२,३०० | १ |

**तक्ता क्र. ११ *(चालू)***

| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
|---|---|---|---|---|---|
| ३५. | आरेखक | पीबी-१ : ५,२००–२०,२०० | २,८०० | एस-१० : २९,२००-९२,३०० | २० |
| | | पीबी-२ : ९,३००–३४,८०० | ४,३०० | एस-१४ : ३८,६००-१,२२,८०० | |
| | | (४ वर्षांच्या अर्हताकारी सेवेनंतर) | | (४ वर्षांच्या अर्हताकारी सेवेनंतर) | |
| ३६. | सहा. आरेखक | पीबी-१ : ५,२००–२०,२०० | २,४०० | एस-८ : २५,५००-८१,१०० | १४८ |
| | | पीबी-२ : ९,३००–३४,८०० | ४,२०० | एस-१३ : ३५,४००-१,१२,४०० | |
| | | (५ वर्षांच्या अर्हताकारी सेवेनंतर) | | (५ वर्षांच्या अर्हताकारी सेवेनंतर) | |
| ३७. | वरिष्ठ लिपिक | पीबी-१ : ५,२००–२०,२०० | २,४०० | एस-८ : २५,५००-८१,१०० | ३८१ |
| ३८. | पाणीपट्टी अधीक्षक | पीबी-१ : ५,२००–२०,२०० | २,४०० | एस-८ : २५,५००-८१,१०० | १ |
| ३९. | स्थापत्य अभियांत्रिकी सहायक | पीबी-१ : ५,२००–२०,२०० | २,४०० | एस-८ : २५,५००-८१,१०० | १५१ |
| ४०. | विजतंत्री | पीबी-१ : ५,२००–२०,२०० | २,४०० | एस-८ : २५,५००-८१,१०० | १७ |
| ४१. | पाणी अभियंता | पीबी-१ : ५,२००–२०,२०० | २,४०० | एस-८ : २५,५००-८१,१०० | १ |
| ४२. | प्रमुख मीटर दुरुस्तीकार | पीबी-१ : ५,२००–२०,२०० | २,४०० | एस-८ : २५,५००-८१,१०० | १ |
| ४३. | अनुरेखक | पीबी-१ : ५,२००–२०,२०० | २,००० | एस-७ : २१,७००-६९,१०० | १९७ |
| | | पीबी-१ : ५,२००–२०,२०० | २,४०० | एस-८ : २५,५००-८१,१०० | |
| | | (७ वर्षानंतर) | | (७ वर्षानंतर) | |
| ४४. | यांत्रिकी | पीबी-१ : ५,२००–२०,२०० | २,००० | एस-७ : २१,७००-६९,१०० | १ |
| ४५. | प्रयोगशाळा सहायक | पीबी-१ : ५,२००–२०,२०० | २,००० | एस-७ : २१,७००-६९,१०० | १ |
| ४६. | लिपिक-नि-टंकलेखक/ कनिष्ठ लिपिक | पीबी-१ : ५,२००–२०,२०० | १,९०० | एस-६ : १९,९००-६३,२०० | ८७४ |
| ४७. | सहा. भांडारपाल | पीबी-१ : ५,२००–२०,२०० | १,९०० | एस-६ : १९,९००-६३,२०० | ६० |
| ४८. | मीटर वाचक | पीबी-१ : ५,२००–२०,२०० | १,९०० | एस-६ : १९,९००-६३,२०० | १६ |
| ४९. | मिस्त्री | पीबी-१ : ५,२००–२०,२०० | १,९०० | एस-६ : १९,९००-६३,२०० | १० |
| ५०. | वाहन चालक | पीबी-१ : ५,२००–२०,२०० | १,९०० | एस-६ : १९,९००-६३,२०० | १३१ |
| ५१. | पंपचालक (पंप ऑपरेटर) | पीबी-१ : ५,२००–२०,२०० | १,९०० | एस-६ : १९,९००-६३,२०० | ३७ |
| ५२. | जोडारी | पीबी-१ : ५,२००–२०,२०० | १,९०० | एस-६ : १९,९००-६३,२०० | ३८ |
| ५३. | मीटर दुरुस्तीकार | पीबी-१ : ५,२००–२०,२०० | १,९०० | एस-६ : १९,९००-६३,२०० | १ |
| ५४. | गवंडी | पीबी-१ : ५,२००–२०,२०० | १,९०० | एस-६ : १९,९००-६३,२०० | १ |
| ५५. | तारतंत्री | पीबी-१ : ५,२००–२०,२०० | १,९०० | एस-६ : १९,९००-६३,२०० | ५ |
| ५६. | लाईनमन | पीबी-१ : ५,२००–२०,२०० | १,९०० | एस-६ : १९,९००-६३,२०० | १ |
| ५७. | पाणीपट्टी वसुलीकार | पीबी-१ : ५,२००–२०,२०० | १,९०० | एस-६ : १९,९००-६३,२०० | ४ |
| ५८. | बांधणीकार | पीबी-१ : ५,२००–२०,२०० | १,८०० | एस-५ : १८,०००-५६,९०० | २ |
| ५९. | तेलवाला | १ एस : ४,४४०–७,४४० | १,६०० | एस-३ : १६,६००-५२,४०० | १ |
| ६०. | दप्तरी | १ एस : ४,४४०–७,४४० | १,६०० | एस-३ : १६,६००-५२,४०० | १६ |
| ६१. | नाईक | १ एस : ४,४४०–७,४४० | १,६०० | एस-३ : १६,६००-५२,४०० | ३ |
| ६२. | लोहमुद्रक-नि-चक्रमुद्रक यंत्रचालक (फेरोप्रिंटर) | १ एस : ४,४४०–७,४४० | १,६०० | एस-३ : १६,६००-५२,४०० | २ |
| ६३. | माळी | १ एस : ४,४४०–७,४४० | १,३०० | एस-१ : १५,०००-४७,६०० | ६ |
| ६४. | शिपाई | १ एस : ४,४४०–७,४४० | १,३०० | एस-१ : १५,०००-४७,६०० | ४७९ |
| ६५. | चौकीदार | १ एस : ४,४४०–७,४४० | १,३०० | एस-१ : १५,०००-४७,६०० | ९५ |
| ६६. | हमाल | १ एस : ४,४४०–७,४४० | १,३०० | एस-१ : १५,०००-४७,६०० | ६ |
| ६७. | मदतनीस | १ एस : ४,४४०–७,४४० | १,३०० | एस-१ : १५,०००-४७,६०० | ८ |
| ६८. | मजूर | १ एस : ४,४४०–७,४४० | १,३०० | एस-१ : १५,०००-४७,६०० | १११ |
| ६९. | चावीवाला/व्हॉल्वमन | १ एस : ४,४४०–७,४४० | १,३०० | एस-१ : १५,०००-४७,६०० | ९ |
| ७०. | सफाईगार | १ एस : ४,४४०–७,४४० | १,३०० | एस-१ : १५,०००-४७,६०० | २ |
| ७१. | स्वच्छक | १ एस : ४,४४०–७,४४० | १,३०० | एस-१ : १५,०००-४७,६०० | २ |
| ७२. | खलाशी | १ एस : ४,४४०–७,४४० | १,३०० | एस-१ : १५,०००-४७,६०० | २ |
| | | | | **एकूण ...** | **४६१५** |
| ७३. | कार्यकारी अभियंता (स्था.) (जिल्हा परिषद) | पीबी-३ : १५,६००–३९,१०० | ६,६०० | एस-२३ : ६७,७००-२,०८,७०० | ३४ |
| ७४. | उप अभियंता (स्था.) (जिल्हा परिषद) | पीबी-३ : १५,६००–३९,१०० | ५,४०० | एस-२० : ५६,१००-१,७७,५०० | ३८९ |
| | | | | **एकूण ...** | **४२३** |
| | | | | **सर्व एकूण ...** | **५०३८** |

## भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा

### १. यंत्रणेची रचना :–

१.१ महाराष्ट्र शासनाने आंतरराष्ट्रीय विकास संस्थेशी (जागतिक बँक प्रकल्प) केलेल्या कृषी पत प्रकल्प कराराची परिणिती म्हणून भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा दिनांक १६ जुलै, १९७१ पासून अस्तित्वात आली. कृषी विभाग, भू-विज्ञान व खनिकर्म संचालनालय तसेच पाटबंधारे विभाग यांचेमार्फत करण्यात येणाऱ्या भूजल सर्वेक्षण व विकास याबाबतची कामे सदर यंत्रणेकडे सोपविण्यात आली. सुरुवातीला ही यंत्रणा भू-विज्ञान व खनिकर्म संचालनालयाचा एक घटक होता. परंतु, दिनांक १५ नोव्हेंबर, १९७२ पासून ह्या यंत्रणेला पद्धतशीर व शास्त्रीय तत्वावर खालील योजना कार्यान्वित करण्यासाठी संचालनालयाचा स्वतंत्र दर्जा देण्यात आला :–

(अ) भूजल विषयक सर्वेक्षण करणे.

(ब) भूजलाचे मूल्यांकन, भूजल संवर्धन, भूजल व्यवस्थापन.

१.२ भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेचे मुख्यालय पुणे येथे आयुक्तांच्या नियंत्रणाखाली आहे. पुणे, नागपूर, औरंगाबाद, नाशिक, अमरावती व कोकण नवी मुंबई येथे उपसंचालकांची विभागीय कार्यालये असून, त्यांच्या नियंत्रणाखाली त्या विभागातील जिल्हे आहेत. या यंत्रणेची सर्व जिल्ह्यात कार्यालये आहेत.

**भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणेच्या मुख्यालयात खालील शाखांचा समावेश आहे—**

(अ) सर्वेक्षण शाखा

(ब) संशोधन व विकास कक्ष

(क) जलविज्ञान प्रकल्प

(ड) आवेधन शाखा

### (अ) सर्वेक्षण शाखा

**सर्वेक्षणाच्या प्रमुख योजना—**

१. सिंचन विहिरींसाठी अर्थसहाय्य बँकांची प्रकरणे

२. स्थानिक भूजल सर्वेक्षण

३. वाळू उत्खनन सर्वेक्षण प्रकरणे

४. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना

५. राज्यातील टंचाई सदृष्य स्थितीचा अभ्यास

**१. सिंचन विहिरींसाठी अर्थसहाय्य बँकांची प्रकरणे :–**

सिंचन विहिरी खोदण्यासाठी महाराष्ट्र राज्य सहकारी कृषि व ग्रामीण विकास बँकेमार्फत तसेच राष्ट्रीय बँकेमार्फत अर्थसहाय्य दिले जाते. विहीर खोदण्यासाठी जागा निवडीकरिता मार्गदर्शक तत्वे सर्व बँकांना कळविण्यात आली आहेत. तथापि, काही विशिष्ट क्षेत्रात पाणी उपलब्धतेबाबत खात्री नसल्यास अशी प्रकरणे जिल्हा वरिष्ठ भू-वैज्ञानिक कार्यालयाकडे कळविली जातात. त्यानुसार प्रत्यक्ष सर्वेक्षण करून योग्यतेबाबत दाखला दिला जातो. सर्वसाधारणपणे रब्बी हंगामाअखेर विहिरींना पाणी उपलब्ध राहण्याच्या शक्यतेचा अभ्यास करून दाखले देण्यात येतात.

ऑगस्ट २०२२ अखेरपर्यंत एकूण ३४,९८२ प्रकरणांचे दाखले देण्यात आले आहेत.

**२. स्थानिक भूजल सर्वेक्षण :–**

जिल्ह्यातील शासकीय, अशासकीय तसेच इतर संस्था अगर वैयक्तिकरित्या मागणी केल्याप्रमाणे प्रत्यक्ष सर्वेक्षण करून भूजल उपलब्धतेचा अहवाल दिला जातो. भूजल सर्वेक्षणासाठी रुपये १,०००/- व भूभौतिक सर्वेक्षणासाठी रुपये १,५००/- शुल्क आकारणी केली जात होती. पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाकडील शासन निर्णय क्रमांक संकीर्ण क्र. ०११९/प्रक्र-६५/पापु-१५, दिनांक २४ जानेवारी २०२२ अन्वये भूजल सर्वेक्षणासाठी रु. २,५००/- व भूभौतिक सर्वेक्षणासाठी रु. ५,०००/- शुल्क आकारणी केली जात आहे.

सन १९९२-१९९३ पासून ते ऑक्टोबर २०२२ अखेरपर्यंत एकूण रुपये ५५६.१५ लक्ष इतके सर्वेक्षण शुल्क यंत्रणेला प्राप्त झाले आहे.

**३. वाळू उत्खनन सर्वेक्षण प्रकरणे :–**

नदीतील वाळूचे उत्खनन करतांना अस्तित्वातील भूजल स्त्रोतावर त्याचा परिणाम होतो की नाही, याबाबत जिल्हा वरिष्ठ भू-वैज्ञानिक कार्यालयाकडून सर्वेक्षण करून संबंधित जिल्हाधिकारी यांना दाखले देण्यात येतात. ऑगस्ट २०२२ अखेरपर्यंत ८६,१३१ प्रकरणे प्राप्त झाली. त्यापैकी ७७,९३३ प्रकरणांचे सर्वेक्षण करून ५८,८२१ प्रकरणांचे दाखले जिल्हाधिकारी यांना सादर करण्यात आले.

महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्रमांक गौखनि-१०/२०८/प्र. क्र.-३२/ख, दिनांक २५ ऑक्टोबर २०१० अन्वये लिलाव झालेल्या वाळू स्थळांचे (प्रकरण) प्रत्येकी रुपये ५,०००/- याप्रमाणे सर्वेक्षण शुल्क लिलाव धारकाकडून यंत्रणेकडे जमा होते. ऑगस्ट २०२२ अखेरपर्यंत एकूण रुपये १०८६.०२ लक्ष जमा होणे अपेक्षित आहे.

**४. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना :–**

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत अनुसूचित जाती/जमाती अल्पभूधारक आणि सिमांत शेतकऱ्यांसाठी सिंचन विहिरींचा कार्यक्रम राज्यात राबविण्यात येत आहे. भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेकडे माहे ऑगस्ट २०२२ अखेर १,९५,५५१ प्रकरणे प्राप्त झाली. त्यापैकी १,७०,८६६ प्रकरणांची प्रमाणपत्र देण्यात आली आहेत.

**५. राज्यातील टंचाई सदृष्य स्थितीचा अभ्यास :–**

दरवर्षी राज्यात माहे ऑक्टोबर अखेर झालेले पर्जन्यमान आणि निरीक्षण विहिरीतील भूजल स्थिर पातळी याचा अभ्यास करून संभाव्य पाणी टंचाई अहवाल जिल्हा वरिष्ठ भू-वैज्ञानिक यांचेमार्फत तयार करून सदर अहवाल जिल्हाधिकारी यांना सादर केला जातो. या अहवालानुसार माहे ऑक्टोबर ते जून या कालावधीतील टप्पानिहाय (ऑक्टोबरपासून, जानेवारीपासून, एप्रिल ते जून) संभाव्य टंचाई भासणारी गावे/वाड्यांची यादी जिल्हाधिकाऱ्यांना सादर करण्यात येते.

राज्यात पाणी टंचाई काळात भूजलावरच अवलंबून राहावे लागते. अशावेळी पिण्याच्या पाण्यासाठी किमान भूजल उपलब्ध करून देता यावे, यासाठी विशिष्ट कालावधीकरिता जिल्हा प्राधिकरणामार्फत पाणी टंचाई क्षेत्र घोषित करण्याची महाराष्ट्र भूजल (विकास व्यवस्थापन) अधिनियम, २००९ मधील कलम २५ नुसार तरतूद करण्यात आलेली आहे. तसेच त्या काळात सार्वजनिक पिण्याच्या पाण्याचे स्त्रोत घोषित करणे व स्त्रोताचा प्रभाव क्षेत्रामधील किंवा सार्वजनिक पिण्याच्या पाण्याच्या स्त्रोतापासून १ कि.मी. अंतरामध्ये, यापैकी जे अधिक असेल अशा क्षेत्रातील अशा विहिरी तात्पुरत्या स्वरुपात बंदीची तरतूद कलम-२६ नुसार करण्यात आलेली आहे.

## (ब) संशोधन व विकास कक्ष

**१. भूजल उपलब्धता :—**

भौगोलिक परिस्थिती व भूपृष्ठीय स्थितीच्या आधारे राज्यातील संपूर्ण भूभागाची प्राथमिक स्वरुपाची विभागणी १५३५ पाणलोट क्षेत्रात करण्यात आलेली आहे. ही पाणलोट क्षेत्रे १५ नद्यांच्या उपखोऱ्यांत विभागण्यात आलेली असून, भूजल मूल्यांकन पाणलोट क्षेत्र संकल्पनेवरच करण्यात येत आहे. केंद्र शासनाच्या मार्गदर्शक तत्वांनुसार प्रत्येक पाणलोट क्षेत्रातील भूजलाचे वार्षिक पुनर्भरण व उपसा, या बाबींचा अभ्यास करून भूजलाचा अंदाज बांधण्यात येतो. भारत सरकारच्या भूजल अंदाज समिती २०१५ च्या मार्गदर्शक तत्वांनुसार वर्ष २०२० मध्ये बांधण्यात आलेल्या भूजल अंदाजानुसार १५३५ पाणलोट क्षेत्रांपैकी ६३ पाणलोट क्षेत्रे अतिशोषित (Over Exploited), २८ शोषित (Critical ) व २८२ अंशतः विकसीत (Semi Critical) या वर्गवारीत मोडतात. भूजल अंदाजाचा गोषवारा खालीलप्रमाणे आहे—

| | | |
|---|---|---|
| १. | राज्यात भूजल मूल्यांकनासाठी विचारात घेण्यात आलेले जिल्हे ... ... ... | ३४ |
| २. | राज्यातील एकूण पाणलोट क्षेत्रांची संख्या ... ... ... | १५३५ |
| ३. | राज्यातील एकूण तालुके ... ... ... | ३५३ |
| ४. | निव्वळ वार्षिक उपलब्धी (दशलक्ष घन मीटर) ... ... ... | ३२.३० |
| ५. | एकूण वार्षिक उपसा (दशलक्ष घन मीटर) ... ... ... | १६.८७ |
| ६. | सिंचनासाठी वार्षिक भूजल उपसा (दशलक्ष घन मीटर) ... ... ... | १५.५१ |
| ७. | अस्तित्वातील सिंचन विहिरींची संख्या ... ... ... | २४,२०,३०५ |
| ८. | अतिशोषित पाणलोट क्षेत्रे (१०० टक्के उपसा होत आलेले पाणलोट क्षेत्र) ... ... | ६३ |
| ९. | शोषित पाणलोट क्षेत्रे (९० ते १०० टक्के उपसा होत आलेले पाणलोट क्षेत्र) ... ... | २८ |
| १०. | अंशतः शोषित पाणलोट क्षेत्रे (७० ते १०० टक्के उपसा होत आलेले पाणलोट क्षेत्र) ... | २८२ |
| ११. | सुरक्षित पाणलोट क्षेत्रे (७० टक्के पेक्षा कमी उपसा असलेले) ... ... ... | ११५८ |
| १२. | निकृष्ट गुणवत्ता असलेले पाणलोट क्षेत्रे ... ... ... | ४ |
| १३. | भूजल उपसाची टक्केवारी ... ... ... | ५४.९९ टक्के |

**२. जलवेधशाळा :—**

राज्यात वेगवेगळ्या कृषी हवामान क्षेत्रात व प्रातिनिधिक भूगर्भीय स्थिती असणाऱ्या क्षेत्रातील जलशास्त्रीय व भूजलशास्त्रीय परिमाणांची प्रत्यक्ष मोजणी करून विविध निष्कर्ष काढण्यासाठी व त्यानुसार भूजल अंदाजासाठीचे निकष निश्चित करण्यासाठी १९७४ साली ८ व तद्नंतर २ अशा एकूण १० जलवेधशाळांची स्थापना करण्यात आली असून, तेथे जलशास्त्रीय व भूजल शास्त्रीय परिमाणांची मोजणी दरवर्षी करण्यात येते.

**३. महाराष्ट्र भूजल (विकास व व्यवस्थापन)–अधिनियम २००९ :–**

पुरवठा व मागणी व्यवस्थापन उपाययोजनामार्फत वापरकर्त्यांच्या विविध प्रवर्गाकरिता विहित दर्जाच्या भूजलाचा कायम, समन्यायी आणि पुरेसा पुरवठा सुकर करणे आणि त्याची खातरजमा करणे, सार्वजनिक पिण्याच्या स्त्रोतांचे जतन करणे आणि महाराष्ट्र राज्यात भूजलाच्या समुपयोजनांचे सामुहिक

सहभागाने व्यवस्थापन व विनियमन करण्यासाठी राज्य भूजल प्राधिकरण आणि जिल्हास्तरीय प्राधिकरणे स्थापन करणे, त्यांच्याशी संबंधीत व अनुषंगाने बाबींची तरतूद करणे या सर्वंकष प्रयोजनास्तव महाराष्ट्र राज्यामध्ये महाराष्ट्र शासन राजपत्र, असाधारण भाग-४ दिनांक ३ डिसेंबर २०१३ (२०१३ चा अधिनियम क्र. २६) अन्वये अधिसूचना जारी होऊन महाराष्ट्र भूजल (विकास व व्यवस्थापन) अधिनियम २००९ हा कायदा, दिनांक १ जून २०१४ पासून राज्यात लागू झालेला आहे.

सदर अधिनियमाअंतर्गत भूजलाचा विकास, व्यवस्थापन व विनियमन करण्याकरिता **त्रिस्तरीय व्यवस्था** निर्माण करण्यात आलेली आहे. त्यानुसार राज्यस्तरावर मा. मुख्यमंत्री यांचे अध्यक्षतेखाली राज्य पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन परिषद, जिल्हा स्तरावर मा. पालकमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा पाणलोट क्षेत्र जलसंपत्ती समिती याप्रमाणे समित्यांची व्यवस्था असणार आहे. अंमलबजावणी योग्यरितीने व्हावी यासाठी राज्यस्तरावर राज्य भूजल प्राधिकरणाकडेच राज्य भूजल प्राधिकरणाची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. तर जिल्हास्तरावर महसूल विभागाच्या सर्व प्रांत अधिकाऱ्यांना जिल्हा प्राधिकारी म्हणून प्राधिकृत करण्यात आले आहे.

महाराष्ट्र भूजल विकास व व्यवस्थापन अधिनियम २००९ च्या प्रभावी अंमलबजावणीकरिता तांत्रिक समन्वयाची जबाबदारी भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेवर सोपविण्यात आली असून, यंत्रणेस खालील महत्वाच्या जबाबदाऱ्या सोपविण्यात आल्या आहेत.

(१) मूळ पाणलोट क्षेत्र किंवा जलप्रस्तर शोधून काढणे व त्यांचा आराखडा करणे.

(२) सार्वजनिक पिण्याच्या पाण्याच्या स्त्रोतांचे प्रभाव क्षेत्र शोधणे व त्याचा आराखडा तयार करणे.

(३) भूजल वापर योजना तयार करणे.

(४) एकात्मिक पाणलोट क्षेत्र विकास व व्यवस्थापन योजना तयार करणे.

(५) सर्व स्तरीय समित्यांना तांत्रिक सहाय्य करणे.

उपरोक्त सर्व स्तरीय समित्या व भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणेकडे अधिनियमाअंतर्गत सोपविण्यात आलेली कार्य पार पाडण्यासाठी राज्य शासन आवश्यकतेनुसार भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेला अनुदान व आगाऊ रकमा उपलब्ध करून देतील अशी तरतूद या अधिनियमाच्या अंमलबजावणीकरिता विविध स्तरावर झालेला व होणारा खर्च खालीलप्रमाणे आहे :–

(रु. लाखात)

| वर्ष | | २०१९-२०२० (अंदाजित) | २०२०-२०२१ (अंदाजित) | २०२१-२०२२ (अंदाजित) | २०२२-२०२३ (अंदाजित) | २०२३-२०२४ (अंदाजित) |
|---|---|---|---|---|---|---|
| खर्च | ... | ... | ... | ... | ... | ५०.२२ |

**४. महाराष्ट्र भूजल (विकास व व्यवस्थापन)-मसुदा नियम २०१८ :–**

महाराष्ट्र भूजल (विकास व व्यवस्थापन) २००९ ची प्रयोजने पार पाडण्याकरिता मसुदा नियम २०१८ तयार करण्यात आलेले आहे. सदर मसुदा नियम दिनांक २५-०७-२०१८ रोजी हरकती व सूचना प्राप्त करून घेण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आले होते. या मसुदा नियमात एकूण ४३ नियम व ११९ उपनियम असून त्या नियमांवर हरकती/सूचना देण्याकरिता दिनांक ३०-०९-२०१८ पर्यंत मुदत देण्यात आली होती. मसुदा नियमांवर शासनाला प्राप्त हरकती/सूचना विचारात घेण्यासाठी अभिप्राय देण्याकरिता पाणी व स्वच्छता विभागाच्या दिनांक १५-०९-२०१८ च्या शासन निर्णयाद्वारे समिती नेमून अहवाल सादर करण्याकरिता दिनांक ३०-११-२०१८ पर्यंत मुदत देण्यात आली होती. याबाबतचा अहवाल समितीने दिनांक ३०-११-२०१८ रोजी शासनाला सादर केला. प्राप्त झालेल्या हरकती/सूचनांनुसार विविध विभागांशी संबंधित मुद्यांबाबत संमती/अभिप्राय घेण्यात आले व त्यानुसार सुधारित मसुदा नियम तयार करण्यात आले. सुधारित मसुदा नियम शासनाला दिनांक १२-०२-२०२१ रोजी सादर करण्यात आलेले आहेत.

## अभियांत्रिकी शाखा

### जल जीवन मिशन कार्यक्रमांतर्गत सौर उर्जेवर आधारित दुहेरी पंप योजना

● ज्या वाड्या वस्त्यांजवळ विद्युत पुरवठा उपलब्ध नाही, विद्युत पुरवठा घेणे किफायतशीर नाही, तसेच ज्या ठिकाणचा विद्युत पुरवठा शाश्वत नाही, ज्या वाड्या वस्त्या पिण्याच्या पाण्याकरिता केवळ हातपंपावरच अवलंबून आहेत अशा वाड्या वस्त्यांकरिता ही अत्यंत उपयुक्त योजना आहे. या योजनेमध्ये विंधन विहिरीवर हातपंपासमवेत सौर पंपाची उभारणी करण्यात येते. सौर पंपाचा उत्सर्ग साठवण टाकीत साठवून पाईपलाईनद्वारे घरोघरी पाणी पुरवठा करण्यात येतो. एकाच विंधन विहिरीत हातपंप व सौर पंपाची उभारणी केली असल्याने, हातपंप नादुरुस्त झाल्यास, सौर पंपाद्वारे किंवा सौर पंप नादुरुस्त झाल्यास, हातपंपाद्वारे अव्याहतपणे पाणी पुरवठा सुरु राहतो. सदर योजना सौर उर्जेवर आधारित असल्याने विद्युतभाराचा खर्च "निरंक" आहे. या योजनेची देखभाल दुरुस्ती अत्यंत सुलभ आहे.

● या योजनेकरिता राष्ट्रीय पेयजल कार्यक्रमाअंतर्गत अनुदान उपलब्ध करून देण्यात येते होते. सदर योजना राबविण्याकरिता रु. ५.१० लक्ष एवढी खर्च मर्यादा होती. आता जल जीवन मिशन अंतर्गत रु. ७.०० लक्ष ची मर्यादा आहे.

● या योजना शासन निर्णय, क्र. ग्रापापु-५३१०/प्र.क्र. २१७/पापु-१५, दि. २९-१२-२०११ व शुद्धीपत्रक क्र. ग्रापापु-५३१०/प्र.क्र. २१७/पापु-१५, दि. १७-१०-२०१२ अन्वये तसेच शासन निर्णय क्रमांक लपापु-२०१६/प्र.क्र. ०६/पापु-१५, दि. २१-१-२०१६ अन्वये राबविण्यात येत होत्या. जल जीवन मिशन

अंतर्गत योजना शासन निर्णय क्र. जजीमि/०६२०/प्र.क्र.२०/पापु-७, दि. ३० जून, २०२० अन्वये शासनाच्या वेळोवेळी निर्गमित मार्गदर्शक सूचनांप्रमाणेच राबविण्याचे निर्देश आहेत त्यानुसार उपरोक्तप्रमाणे योजना राबविण्यात येत आहेत.

- या योजना वर्ष २००९-१० पासून राबविण्यात येत असून वर्ष २०२१-२२ पर्यंत ५,२७१ योजना राज्यात राबविण्यात आल्या आहेत.
- वर्ष २०२२-२३ करिता जल जीवन मिशन अंतर्गत सौर ऊर्जेवर आधारित योजनांकरिता रास्त खर्च जिल्हास्तरावर करण्यात येत आहे.

## राष्ट्रीय जलविज्ञान प्रकल्प

जलविज्ञान प्रकल्प टप्पा-२ चा पुढील टप्पा म्हणजेच **राष्ट्रीय जलविज्ञान प्रकल्प** आहे. राष्ट्रीय जलविज्ञान प्रकल्प हा जागतिक बँकेच्या अर्थसहाय्याने राबविण्यात येत आहे. या प्रकल्पातील महाराष्ट्र भूजल या घटकाची अंमलबजावणी करण्यासाठी भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा ही अंमलबजावणी यंत्रणा आहे. सदरील प्रकल्प हा ८ वर्षाच्या कालावधीसाठी असून त्यास रुपये २७.०० कोटीची केंद्र शासनाची मान्यता मिळालेली आहे. सदर प्रकल्पामध्ये खालील घटकांचा समावेश आहे.

Component A– जलसंपत्तीबाबत माहिती संपादित करणे (Water Resources Data Acquisition).

Component B– जलसंपत्ती माहिती प्रणाली तयार करणे (Water Resource Information System).

Component C– जलसंपत्तीचे नियोजन व व्यवस्थापन करणे (Water Resources Operation and Planning).

Component D– संस्थात्मक क्षमता उंचावणे (Institutions Capacity Enhancement).

वरील घटकांमध्ये समाविष्ट असलेल्या बाबींची माहिती खालील प्रमाणे आहे.

Component A– जलसंपत्तीबाबत माहिती संपादित करणे (Water Resources Data Acquisition) प्रकल्पांतर्गत प्राप्त निधी व त्यानुसार झालेला खर्च.

प्रकल्प सुरू झाल्यापासून वर्षनिहाय प्राप्त निधी, झालेला खर्च व शिल्लक याचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अनुक्रमांक | आर्थिक वर्ष | प्राप्त निधी (रु. लाखात) | झालेला खर्च (रु. लाखात) |
|---|---|---|---|
| १. | २०१६-२०१७ ... ... | ... | ... |
| २. | २०१७-२०१८ ... ... | ३८.५० | ०.४० |
| ३. | २०१८-२०१९ ... ... | १७७.०० | १.०० |
| ४. | २०१९-२०२० ... ... | ... | ४२.२९ |
| ५. | २०२०-२०२१ ... ... | ... | २८.४२ |
| ६. | २०२१-२०२२ ... ... | ३००.०० | ४३७.७० |
| ७. | २०२२-२०२३ ... ... | ३९२.०० | २२९.४५ |
| | एकूण ... | ९०७.५० | ७३९.२६ |

**(I) Procurement of ३३६ DWLR with Telemetry :—**

या घटकामध्ये ३३६ DWLR with Telemetry ची तालुकानिहाय खरेदी करावयाची आहे. पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाकडून सदरच्या खरेदीस दिनांक २४-०२-२०२१ रोजी प्रशासकीय मंजुरी प्राप्त झालेली आहे. याकरिता रु. ४७०.८० कोटी निधीची तरतूद आहे. त्या अन्वये दिनांक २०-०४-२०२१ रोजी निविदा महाईटेंडर वर प्रकाशित करण्यात आलेली होती. त्याबाबतची दिनांक २५-०६-२०२१ रोजी तांत्रिक निविदा उघडण्यात आलेली असून दिनांक ३०-१२-२०२१ रोजी आर्थिक निविदा उघडण्यात आलेली आहे. त्यानुसार सदर खरेदीच्या GST वगळून रु. ३६३६३६३६.०० (तीन कोटी, त्रेसष्ट लाख त्रेसष्ट हजार सहाशे छत्तीस रुपये फक्त) रकमेचे कार्यारंभ आदेश Mechatronics System Private Limited, Warje PUNE यांना देण्यात आलेले असून जिल्हानिहाय DWLR with Telemetry बसविणेकरिताचे काम प्रगतीपथावर आहे.

**(II) Construction of State Groundwater Informatics and Modelling Centre :—**

शिवाजीनगर, पुणे येथे भूसवियंच्या मुख्य इमारतीच्या परिसरात नव्याने बांधावयाच्या इमारतीकरिता रु. १०.७४ कोटीचे राज्य स्तरावरील भूजल माहिती व तंत्रज्ञान केंद्र विकसित करणे प्रस्तावित आहे. त्यास दिनांक ०६-०७-२०२१ रोजी प्रशासकीय मान्यता प्राप्त झालेली असून दिनांक १६-०६-२०२१ ला निविदा महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आली. सदर कामाची तांत्रिक व आर्थिक निविदेचे काम पूर्ण झालेले असून यशस्वी कंत्राटदारास पुरवठा आदेश देण्यात आलेले आहे. त्यानुसार भूजल माहिती केन्द्राचे व अस्तित्वातील इमारतीचे नूतनीकरणाचे काम प्रगतीपथावर आहे.

**(III) Vehicile Mounted equipment and software for aquifer performance test :—**

या खरेदी करीताचे Specification अंतिम झालेले असून खरेदी प्रक्रिया ई-जेम्स व दरपत्रकाद्वारे पूर्ण करण्यात येईल. या साहित्याने भूवैज्ञानिकाकडून खडकाची भूजल क्षमता तपासून त्याबाबतचा जिल्हानिहाय अहवाल तयार करण्यात येईल. सदर भूजल माहितीचा Decision Support System (DSS) प्रणालीमध्ये अंतर्भाव करण्यात येणार आहे. याकरिता रु. २५.०० लक्ष निधी प्रस्तावित आहे. त्यामधील काही साहित्याची खरेदी झालेली आहे जसे की PH Meter, Conductivity Meter आणि water level indicator, २ Generator व २ Submersible Pump व २ Utility Vehicle च्या खरेदीची ई-जेम्स वरील प्रक्रिया पूर्ण झालेली असून Water flow meter, ३ hp चे २ Submersible Pump व २ APT Software च्या खरेदीची कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

**(IV) Procurement of IT Equipment :—**

यामध्ये ५० Computers, २५ Printers व २० Scanner ची e-gem वरून खरेदी करावयाची प्रक्रिया पूर्ण झालेली आहे. या घटकामधून ARC GIS च्या Software ची खरेदी पूर्ण झालेली आहे. उर्वरीत IT Equipment ची खरेदी करण्याचे प्रस्तावित आहे. त्याकरिता अतिरिक्त निधीची मागणी राष्ट्रीय प्रकल्प व्यवस्थापन कक्ष, नवी दिल्ली यांना देण्यात आलेली आहे.

Component B– जलसंपत्ती माहिती प्रणाली तयार करणे (Water Resource Information System).

**(V) Data Digitization, Upgrading existing database :—**

या घटकामध्ये यंत्रणेकडून पूर्वी झालेले सर्वेक्षणानुसार जिल्हानिहाय, तालुकानिहाय व गावनिहाय सर्वेक्षण अहवालाची माहिती संचालनालयास मागविण्यात आलेली आहे. सदर विस्तृत भूजल सर्वेक्षण अहवाल (Task Force Report) Digitized करण्याचे कामाची निविदा ई-मार्केट्प्लेसवर प्रसिद्ध करण्यात आलेली होती. त्याकरिताचे विभागनिहाय Scanning चे काम प्रगतीपथावर आहे.

**(VI) Development of Atlases :—**

राज्यातील पाणलोटांचे पुनर्वर्गीकरण करण्यात येत असून या पाणलोटांचे विभागनिहाय, जिल्हानिहाय व तालुकानिहाय Atlas महाराष्ट्र रिमोट सेंसिंग अप्लिकेशन सेंटर, नागपूर यांचे सहभागितेने तयार करण्यात येणार आहेत. त्यानुसार महाराष्ट्र रिमोट सेन्सिंग अप्लिकेशन सेंटर, नागपूर यांचेकडून रु. ३५.०२ लाखाचे अंदाजपत्रक प्राप्त झालेले आहे. सदर कामाचे TOR (Terms of reference तयार करण्याचे काम प्रगतिपथावर आहे.

**(VII) Printing of Informational Broches :—**

या घटकामधून राज्यातील जनतेस भूजल विषयी अधिकाधिक माहिती देऊन जलसाक्षरता होण्याच्या दृष्टीकोनातून विविध साहित्याचे प्रकाशन करण्यात येत असते. माहे जानेवारी २०२१ पासून माहे फेब्रुवारी २०२२ पर्यंत भूजल-वार्ता या ई-बुलेटिन चे प्रकाशन करण्यात आले आहे. सदर ई-बुलेटिन मध्ये यंत्रणेच्या विशेष कामाबाबत व झालेल्या भूजल विषयक चालू घडामोडीचा अंतर्भाव करण्यात येत आहे.

यंत्रणेच्या ५० वर्षाच्या सुवर्ण महोत्सवानिमित्त भूजल माहिती पुस्तिका, भूजल विशेषांक, भूजल संवर्धन पुस्तिका व भूजलाविषयी तांत्रिक मार्गदर्शन करणेकरिता विशेष माहिती पुस्तिका व घडी पुस्तिका इत्यादिंची छपाई करण्यात आलेली आहे.

**(VIII) Hydrology Project Website :—**

यामध्ये यंत्रणेच्या संबंधित, चालू घडामोडी भूजलाशी संबंधित माहितीचा समावेश आहे. सदर Website भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेकडून तयार करण्यात आलेली असून सदर Website चे अद्यावतीकरण करणेकरिता ई-जेम्स वरील प्रक्रिया पूर्ण झालेली असून सदर निविदाकारास कार्यारंभ देण्यात आलेला असून लवकरच कामास सुरूवात होईल.

Component C– जलसंपत्तीचे नियोजन व व्यवस्थापन करणे (Water Resources Operation and Planning).

नागपूर विभागाकडून खालील विषयावर राष्ट्रीय जलविज्ञान प्रकल्पामधून विशेष अभ्यास राबविण्यात येणार आहे. सदर तीनही अभ्यासाचे पायाभूत सर्वेक्षणाचे व अंतरिम अहवाल तयार करण्याचे काम प्रगतीपथावर आहे.

१. Estimation of aquifer hydraulic parameters in different geological formation.

२. Identification of Cause for water level Depletion in Coal Mine Area of Nagpur District.

३. Study on conjunctive use of surface and groundwater for artifical recharge in over exploited area of Chauras in Bhandara District.

**(IX) Decision Support System निर्णय आधारित प्रणाली :—**

या घटकांतर्गत Decision Support System (DSS) for Groundwater Act– २००९ संगणक प्रणाली महाराष्ट्र रिमोट सेन्सिंग अप्लिकेशन सेंटर यांचे सहभागितेने विकसित करण्याचे प्रस्तावित आहे. यामध्ये नवीन सिंचन विहिर, औद्योगिक व पाणी पुरवठा विहिरींची ऑनलाईन नोंदणी करणे, मोबाईल अप्लिकेशन द्वारे विंधण यंत्रांचे ऑनलाईन ट्रॅकिंग करणे व नवीन झालेल्या सर्व विंधण विहिरींची नोंदणी करणे तसेच संभाव्य पेयजल टंचाई वर्तविण्याकरिता मॉडेल विकसित करणे इ. बाबींचा समावेश करण्यात आलेला आहे. या प्रणालीद्वारे एकूणच भूजल संसाधनाचा विकास व व्यवस्थापन करणे शक्य होणार आहे. याकरिता रु. ४००.०० लक्ष निधीची तरतूद आहे. त्याकरिताचे TOR (Terms of reference) ला मंजुरी मिळालेली असून त्याकरिताचे RFP (Request for proposal) चे राष्ट्रीय प्रकल्प व्यवस्थापन कक्ष, नवी दिल्ली यांचेशी चर्चा करून अंतिम करण्यात आलेला आहे. त्याअन्वये दिनांक २७-०६-२०२२ रोजी त्यानंतर महाराष्ट्र रिमोट सेन्सिंग अप्लिकेशन सेंटर, नागपूर व आयुक्त, भुसवियं पुणे यांच्यात करार झालेला असून Decision Support System (DSS) तयार करण्याचे काम प्रगतीपथावर आहे.

Component D– संस्थात्मक क्षमता उंचावणे (Institutions Capacity Enhancement).

**(X) Leased Line Connectivity/Video conferencing equipment/services :—**

सदर घटकांतर्गत Railtel Corporation of India यांचेकडून संचालनालय व ६ विभागाकरिता Internet Leased Line घेतलेले असून सद्यःस्थितीत

कार्यरत आहे. त्यामुळे या घटकामधील निधी सध्या असलेल्या इंटरनेट सेवेकरिताच्या खर्चाकरिता वापरण्यात येतो. या घटकामधून प्रशिक्षण व बैठक कक्षामध्ये Audio Visual System घेण्यात आलेली असून त्याकरिताची निविदा सार्वजनिक बांधकाम विभाग, विद्युत यांचेकडून निविदा प्रसिद्ध करण्यात आलेली आहे. प्रशिक्षण व बैठक कक्षाचे नूतनीकरण झाल्यानंतर सदर कास सुरूवात हाईल.

**(XI) National/International Training and Study Tour :—**

१. GIS Basic Training या विषयावरील भौगोलिक माहिती प्रणाली सहाय्यक यांचेकरिता व प्रकल्प सुरू झाल्यापासून यंत्रणेने विभागातील अधिकाऱ्यासाठी Groundwater Estimation– २०१५ व Aquifer Management माहे जून २०२१ मध्ये दोन बॅचेस मध्ये प्रशिक्षण आयोजित करण्यात आले होते.

२. सन २०२१-२२ व २०२२-२०२३ या आर्थिक वर्षामध्ये PFMS व जागतिक बँक कार्यप्रणाली या विषयावरील दोन बॅचेसमध्ये यशदा, पुणे येथे प्रशिक्षण आयोजित करण्यात आले होते.

३. सन २०२२-२३ या आर्थिक वर्षामध्ये ARC-GIS (Pro, Desktop and Enterprise) या विषयावरील विभागातील अधिकाऱ्याकरिता यशदा, पुणे येथे प्रशिक्षण आयोजित करण्यात आले होते.

विभागाच्या सुवर्ण महोत्सवानिमित्त प्रकल्पा अंतर्गत दिनांक ०५-०७-२०२१ ला भूजल शाश्वता व सुरक्षितता या विषयावरील राज्यस्तरीय कार्यशाळा आयोजित करण्यात आलेली होती. सदर कार्यशाळेस भूजलाशी संबंधित तज्ञांनी मार्गदर्शन केले व यामध्ये अधिकारी, ग्रामस्तरीय भूजलाशी संबंधित संस्था असे जवळपास २५० लोकांनी सहभाग नोंदविला.

दिनांक २८-०४-२०१९ ते ०२-०५-२०१९ या दरम्यान विजयावाडा आंध्रप्रदेश येथील भूजल पुनर्भरणाच्या कामांचा अभ्यास करण्याकरिता विभागातील १३ अधिकाऱ्यांकरिता अभ्यास दौरा आयोजित करण्यात आलेला होता. यशदा, पुणे येथे Procurement Procedure या विषयावरील सन २०२१-२२ या आर्थिक वर्षामध्ये प्रशिक्षण आयोजित करण्यात आलेले होते.

भविष्यात इतर राज्याने भूजलाशी संबंधित केलेल्या नाविन्यपूर्ण कामाचा अभ्यास करणेकरिता अभ्यास दौरा आयोजित करण्याचे नियोजन आहे.

**(XII) Hiring of Vehicle :—**

या घटकामध्ये वाहन कॉल बेसिस पद्धतीने वाहन भाड्याने लावण्यात आलेले आहे. सदर वाहनाचा वापर कामाच्या आवश्यकतेनुसार करण्यात येतो.

**(XIII) Operational Cost of SPMU :—**

या घटकामधून State Project Monitoring Unit (SPMU) चा कार्यालयीन खर्चाकरिताचा (वाहन भाड्याने लावणे प्रवास भत्ता) खर्च भागविण्यात येतो. यामधून प्रकल्पाकरिता बाह्यस्त्रोताकडून कंत्राटी पद्धतीने २ डेटा एन्ट्री ऑपरेटर, १ खरेदी प्रणाली विश्लेषक, Junior Research Fellow ही पदे भरण्यात आलेली आहे. त्यांच्या वेतनाकरिता लागणारा खर्च सदर मंजूर निधीमधून भागविण्यात येतो.

**(XIV) Setting of SPMU :—**

या घटकामध्ये State Project Monitoring Unit (SPMU) च्या कार्यालयीन वापराकरिता लागणारे फर्निचर व इतर आवश्यक बाबीकरिता करण्यात येतो. तसेच प्रशिक्षण व बैठक कक्षाचे नूतनीकरण-वातानुकुलीत यंत्र, भूजल माहिती व तंत्रज्ञान केन्द्राकरिता Access Control System, अस्तित्वातील व नवीन ईमारतीमध्ये Lan network इत्यादिची तरतूद करण्यात आलेली आहे.

**तक्ता क्र. १२**

## संचालनालय, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेतील कर्मचारीविषयक गोषवारा

| अनुक्रमांक | पदनाम | सुधारित वेतन मॅट्रिक्स मधील वेतन स्तर | मंजूर पदसंख्या |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| | **राजपत्रित गट--अ** | | |
| १. | संचालक ... ... | संवर्ग पद ... | १ |
| २. | अतिरिक्त संचालक ... ... | एस-२७ : १,१८,५००-२,१४,१०० ... | १ |
| ३. | सहसंचालक ... ... | एस-२६ : ८२,२००-२,११,५०० ... | २ |
| ४. | सहसंचालक (अभियांत्रिकी) ... ... | एस-२६ : ८२,२००-२,११,५०० ... | १ |
| ५. | उपसंचालक ... ... | एस-२३ : ६७,७००-२,०८,७०० ... | ८ |
| ६. | मुख्य खोदन अभियंता ... ... | एस-२३ : ६७,७००-२,०८,७०० ... | २ |
| ७. | वरिष्ठ भूवैज्ञानिक ... ... | एस-२२ : ६०,०००-१,९०,८०० ... | ५३ |
| ८. | मुख्य भूभौतिकतज्ञ ... ... | एस-२३ : ६७,७००-२,०८,७०० ... | १ |
| ९. | वरिष्ठ खोदन अभियंता ... ... | एस-२२ : ६०,०००-१,९०,८०० ... | ७ |
| १०. | वरिष्ठ भूभौतिक तज्ञ ... ... | एस-२१ : ५७,१००-१,८०,८०० ... | ६ |
| ११. | वरिष्ठ रसायनी ... ... | एस-२१ : ५७,१००-१,८०,८०० ... | १ |
| १२. | सहायक संचालक (मवि व लेसे) ... | एस-२० : ५६,१००-१,७७,५०० ... | १ |
| १३. | प्रशासन अधिकारी ... ... | एस-२० : ५६,१००-१,७७,५०० ... | १ |
| १४. | उपअभियंता (यांत्रिकी) ... ... | एस-२० : ५६,१००-१,७७,५०० ... | ८ |
| | | एकूण ... | ९३ |
| | **राजपत्रित गट--ब** | | |
| १५. | सहायक भूवैज्ञानिक ... ... | एस-१९ : ५५,१००-१,७५,१०० ... | ७९ |
| १६. | सहायक भूभौतिक तज्ञ ... ... | एस-१६ : ४४,९००-१,४२,४०० ... | ७ |
| १७. | कनिष्ठ भूवैज्ञानिक ... ... | एस-१६ : ४४,९००-१,४२,४०० ... | ११९ |
| १८. | सहायक रसायनी ... ... | एस-१६ : ४४,९००-१,४२,४०० ... | ६ |
| १९. | नियोजन अधिकारी ... ... | एस-१५ : ४१,८००-१,३२,३०० ... | १ |
| २०. | सहायक प्रशासन अधिकारी ... ... | एस-१५ : ४१,८००-१,३२,३०० ... | ६ |
| २१. | लेखा अधिकारी ... ... | एस-१६ : ४४,९००-१,४२,४०० ... | ७ |
| २२. | सहायक अभियंता (स्थापत्य) ... ... | एस-१५ : ४१,८००-१,३२,३०० ... | १ |
| २३. | सिस्टीम ॲनालिस्ट ... ... | एस-१५ : ४१,८००-१,३२,३०० ... | १ |
| | | एकूण ... | २२७ |
| | **अराजपत्रित गट--क** | | |
| २४. | कनिष्ठ भूभौतिक तज्ञ ... ... | एस-१५ : ४१,८००-१,३२,३०० ... | ६ |
| २५. | कनिष्ठ रसायनी ... ... | एस-१५ : ४१,८००-१,३२,३०० ... | १२ |
| २६. | वरिष्ठ सांख्यिकी सहायक ... | एस-१४ : ३८,६००-१,२२,८०० ... | ८ |
| २७. | लघुलेखक (उच्च श्रेणी) ... ... | एस-१५ : ४१,८००-१,३२,३०० ... | २ |
| २८. | उपलेखापाल (वित्त विभाग) ... ... | एस-१३ : ३५,४००-१,१२,४०० ... | ४२ |
| २९. | तांत्रिक अधिकारी ... ... | एस-१३ : ३५,४००-१,१२,४०० ... | ४२ |

**तक्ता क्र. १२**–(चालू)

| १ | २ | ३ | ४ | ५ |
|---|---|---|---|---|
| ३०. | लघुलेखक (निम्नश्रेणी) ... ... | एस-१४ : | ३८,६००-१,२२,८०० ... | १२ |
| ३१. | कार्यालय अधीक्षक ... ... | एस-१३ : | ३५,४००-१,१२,४०० ... | ४ |
| ३२. | कनिष्ठ अभियंता ... ... | एस-१४ : | ३८,६००-१,२२,८०० ... | ४१ |
| ३३. | प्रोग्रामर ... ... | एस-१४ : | ३८,६००-१,२२,८०० ... | १ |
| ३४. | सर्वेक्षक ... ... | एस-८ : | २५,५००-८१,१०० ... | ६१ |
| ३५. | यांत्रिकी ... ... | एस-८ : | २५,५००-८१,१०० ... | ६२ |
| ३६. | भौगोलिक माहिती प्रणाली अधिकारी ... | एस-१५ : | ४१,८००-१,३२,३०० ... | ७ |
| ३७. | भौगोलिक माहिती प्रणाली वरिष्ठ सहायक ...<br>(४ वर्षाच्या अर्हताकारी सेवेनंतर) | एस-१० :<br>एस-१४ : | २९,२००-९२,३०० ...<br>३८,६००-१,२२,८०० | ४१ |
| ३८. | रोखपाल ... ... | एस-८ : | २५,५००-८१,१०० ... | १ |
| ३९. | वरिष्ठ लिपिक ... ... | एस-८ : | २५,५००-८१,१०० ... | ५२ |
| ४०. | लघुटंकलेखक ... ... | एस-८ : | २५,५००-८१,१०० ... | ११ |
| ४१. | सहाय्यक आवेधक ... ... | एस-८ : | २५,५००-८१,१०० ... | ३० |
| ४२. | दोरखंडवाला (रिंगमन) ... ... | एस-७ : | २१,७००-६९,१०० ... | १६ |
| ४३. | भौगोलिक माहिती प्रणाली सहाय्यक ...<br>(७ वर्षाच्या अर्हताकारी सेवेनंतर) | एस-७ :<br>एस-८ : | २१,७००-६९,१०० ...<br>२५,५००-८१,१०० | ५८ |
| ४४. | दूरध्वनी चालक ... ... | एस-७ : | २१,७००-६९,१०० ... | १ |
| ४५. | कनिष्ठ लिपिक ... ... | एस-६ : | १९,९००-६३,२०० ... | १०५ |
| ४६. | वाहन चालक ... | एस-६ : | १९,९००-६३,२०० ... | १८६ |
| ४७. | प्रयोगशाळा सहाय्यक ... ... | एस-६ : | १९,९००-६३,२०० ... | ६ |
| ४८. | वेल्डर-कम-ड्रायव्हर ... ... | एस-७ : | २१,७००-६९,१०० ... | ६ |
| | | | एकूण ... | ८१३ |
| | **गट--ड** | | | |
| ४९. | नाईक ... ... | एस-३ : | १६,६००-५२,४०० ... | ११ |
| ५०. | शिपाई ... ... | एस-१ : | १५,०००-४७,६०० ... | ८५ |
| ५१. | पहारेकरी ... ... | एस-१ : | १५,०००-४७,६०० ... | ७३ |
| ५२. | मदतनीस ... ... | एस-१ : | १५,०००-४७,६०० ... | १९ |
| | | | एकूण ... | १८८ |
| | | **गोषवारा–** | | |
| | | | **राजपत्रित गट--अ** ... | ९३ |
| | | | **राजपत्रित गट--ब** ... | २२७ |
| | | | **अराजपत्रित गट--क** ... | ८१३ |
| | | | **अराजपत्रित गट--ड** ... | १८८ |
| | | | **एकूण ...** | **१,३२१** |

**मध्यवर्ती कारागृह मुद्रणालय**
**वर्धा रोड, नागपूर ४४० ०२०**

मकामुना (एच-१०६२)—३-२०२३—३०० पु.—पीए४*